# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग-१ : राज्यशास्त्र

# राजकीय समाजशास्त्र

## (Political Sociology)

**सत्र २ : पेपर DSE-20**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१९

सुधारित आवृत्ती : २०२३

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर DSE-20

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89345-02-5

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


## अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटन, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक DSE-20 सत्र दोन साठी 'राजकीय समाजशास्त्र' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

राजकीय समाजशास्त्र यामध्ये राजकीय समाजशास्त्राचा परिचय, राजकीय समाजशास्त्राची बौद्धिक अधिष्ठाने, भारतीय राजकीय समाजशास्त्र आणि भारतातील लिंगभाव आणि राजकारण या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शनही आम्हास उपयुक्त ठरले. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. रविंद्र भणगे, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. सुखदेव उंदरे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. नेहा वाडेकर**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. जयश्री कांबळे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. सुखदेव उंदरे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. सचिन भोसले**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुखदेव उंदरे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | राजकीय समाजशास्त्राचा परिचय | १ |
| २. | राजकीय समाजशास्त्राची बौद्धिक अधिष्ठाने | १९ |
| ३. | भारतीय राजकीय समाजशास्त्र | ३८ |
| ४. | भारतातील लिंगभाव आणि राजकारण | ५४ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र २ : घटक १
# राजकीय समाजशास्त्राचा परिचय

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ राजकीय समाजशास्त्राचा अर्थ

१.२.२ राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्या

१.२.३ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप

१.२.४ राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती

१.२.५ राजकीय समाजशास्त्राचे महत्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये

१) राजकीय समाजशास्त्राचा अर्थ व स्वरूप समजून घेणे.

२) राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती समजून घेणे.

३) राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व लक्षात घेणे.

४) राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी पार्श्वभूमी तयार करणे.

## १.१ प्रास्ताविक

अलिकडील काही दशकांपासून सामाजिक शास्त्रांमधील मुख्य विद्याशाखांमध्ये एक महत्त्वपूर्ण क्रांती घडत आहे. सामाजिक शास्त्रे ही मानवी जीवनाच्या अभ्यासाशी निगडीत असतात. मानवाच्या जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा विविध पैलूंवर भर देणाऱ्या समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा स्वतंत्र विद्याशाखा प्रस्थापित झाल्या परंतु मानवी जीवनाची ही क्षेत्रे स्वतंत्रपणे कार्यरत नसतात तर ती एकमेकांनी प्रभावीत होत असतात. त्यामुळेच या विद्याशाखांच्या अंतर्गत येणारे विचार किंवा समस्यांचा अभ्यास करत असताना तो केवळ सामाजिक अर्थशास्त्रीय किंवा राजकीय अशा चौकटीत करता येत नाही. त्यामुळेच एकापेक्षा अधिक विद्याशाखा एकत्र येऊन अभ्यास करणाऱ्या अनेक नवीन विद्याशाखा उदयास आल्या. या गरजेमधुनच आंतर विद्याशाखीय दृष्टीकोन सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासात मांडले जाऊ लागले आणि त्यातून पुढे विविध सामाजिक शास्त्रांच्या संयुक्त अभ्यासातून नवनवीन विद्याशाखा उदयास आल्या. यामध्ये प्रामुख्याने राजकीय समाजशास्त्र, राजकीय अर्थशास्त्र इत्यादींची उदाहरणे सांगता येतील.

## १.२ विषय विवेचन :

दुसऱ्या महायुध्दानंतर 'राजकीय समाजशास्त्र' या विषयाकडे स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून पाहिले जाऊ लागले. परंतु राज्यशास्त्र व समाजशास्त्र याचे संयुक्त अध्ययन करण्यास १८ व्या व १९ व्या शतकापासून सुरुवात झालेली दिसते. परंतु 'राजकीय समाजशास्त्र' ही एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून दुसऱ्या महायुध्दानंतरच कार्यरत झालेली दिसते.

उदयाची पार्श्वभूमी समजून घेत असताना असे दिसते कि प्राचीन काळी राज्यशास्त्रात समाज व राज्य यांच्यात भेद केला जात नसे. परंतु नंतरच्या काळात राज्यशास्त्रात सार्वभौमत्वाच्या सिध्दांताद्वारे हा भेद स्पष्टपणे मांडला जाऊ लागला. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे पारंपारिक समाजव्यवस्थेचे आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये रूपांतर होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे राज्य आणि समाज यांमधील परस्पर संबंध, एकमेकांवर पडणारा प्रभाव या विषयीच्या अभ्यासाची गरज पुढे येऊ लागली.

१९ व्या शतकामध्ये जगामध्ये बहुतांश राष्ट्रे प्रातिनिधिक लोकशाहीच्या दिशेने जाऊ लागली. प्रातिनिधिक लोकशाहीच्या या विकासामधून अनेक अभ्यास विषयांचे महत्त्व अधोरेखित होऊ लागले. उदा. निवडणुका, राजकीय पक्ष, प्रौढ मताधिकार, लोकमत इ. विषयांच्या राज्यशास्त्रीय पैलुंबरोबरच समाजशास्त्रीय पैलूंचाही अभ्यास करण्यास सुरुवात झाली. आणि अशा अभ्यासांच्या माध्यमातून राजकीय समाजशास्त्राच्या उदयासाठी अनुकुल अशी अभ्यास सामुग्री निर्माण होऊ लागली आणि राजकीय समाजशास्त्र ही स्वतंत्र विद्याशाखा म्हणून उदयास आली.

राजकीय समाजशास्त्राच्या उदय आणि विकासामध्ये अनेक विचारवंतांनी योगदान दिले. त्यामध्ये प्रामुख्याने कार्लमार्क्स, मॅक्स वेबर, हर्बर्ट स्पेन, रॉबर्ट मिचेन्स, गिटॉनो मोस्का, सिग्मंड फ्राईड, विल फ्रेंड, पॅरेटो, डरखिम यांसारख्या विचारवंतांनी राजकीय समाजशास्त्रासाठी सैध्दांतिक बैठकीची उभारणी केली.

अशा प्रकारे राजकीय समाजशास्त्र हे समकालीन समाजशास्त्र व राज्यशास्त्रामधून निर्माण झालेली एक उदयोन्मुख विद्याशाखा आहे. जरी अद्याप त्यामधील अभ्यासक्षेत्रे विकासाच्या प्रक्रियेत असली तरी अभ्यासकांनी राजकीय व समाजशास्त्रीय दोन्ही क्षेत्रांच्या संयुक्त अभ्यासाचे महत्त्व ओळखले आहे.

अशा प्रकारे राजकीय समाजशास्त्र राजकीय विश्लेषणामध्ये एक नवीन दृष्टी प्रदान करते. यामध्ये समाज आणि राजकारण, राजकीय व्यवस्था आणि तिचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वातावरण यांच्यामधील सहसंबंध, सामाईक दुवे यांचा अभ्यास केला जातो. एकुणच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अर्थिक आणि राजकीय घटकांचे परस्परावलंबन आणि परस्परप्रक्रिया हा राजकीय समाजशास्त्राचा केंद्रबिंदु राहिला आहे.

### १.२.१ राजकीय समाजशास्त्राचा अर्थ :

राजकीय समाजशास्त्र ही विद्याशाखा राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र या दोन विद्याशाखांमध्ये संयुक्त प्रारूप आहे. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राचा अर्थ समजून घेताना प्रथम राज्यशास्त्र व समाजशास्त्र याचा अर्थ समजून घ्यावा लागेल. राज्यशास्त्र विषयामध्ये प्रामुख्याने मानवी जीवनाच्या राजकीय पैलूंचा अभ्यास केला जातो. यामध्ये राजकीय संस्था, सिध्दांत संकल्पना, राजकीय घटना, क्रिया व प्रतिक्रिया मानवाचे राजकीय वर्तन याचा समावेश होतो. तर समाजशास्त्रामध्ये मानवी जीवनाच्या सामाजिक पैलूंवर भर दिला जातो. यामध्ये सामाजिक संस्था, सिध्दांत, संकल्पना, सामाजिक घटना, क्रिया प्रतिक्रिया मानवाचे सामाजिक वर्तन मानवांमधील सामाजिक परस्परसंबंध यांचा समावेश होतो. म्हणून या दोन शाखांचा संयोग असलेल्या राजकीय समाजशास्त्रामध्ये मानवी जीवनाच्या राजकीय आणि सामाजिक परस्परस्पर्शी क्रिया, आंतरक्रिया, प्रक्रिया, प्रतिक्रिया आणि मानवी वर्तनाचे राजकीय सामाजिक पैलु इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

### १.२.२ राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्या :

विषय विवेचनात म्हटल्याप्रमाणे दुसऱ्या महायुध्दानंतर सामाजिक शास्त्रांमध्ये एकीकडे विभिन्नीकरण आणि विशेषीकरणाची प्रक्रिया जोर धरत होती तर त्याचबरोबर युरोप व अमेरिकेतील अभ्यासांमध्ये आंतर विद्याशाखा दृष्टीकोनाचा प्रभाव आणि वापर वाढीस लागला होता. आणि राजकीय समस्यांची उकल समाजशास्त्रीय पध्दतीने करण्याचा प्रयत्न विचारवंत करू लागले. आणि याचाच परिणाम स्वरूप राजकीय समाजशास्त्रा सारख्या संयुक्त स्वरूप असलेल्या विद्याशाखा उदयास आल्या.

इतर कोणत्याही विद्याशाखेप्रमाणे राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्यांबाबतही याच्या अभ्यासकांमध्ये एकमत आढळत नाही. त्यांनी आपापल्या दृष्टिकोनातून राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यातील काही व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **एस. एम. लिपसेट –** समाज आणि राज्यव्यवस्था यातील व सामाजिक रचना आणि राजकीय संस्था यातील परस्पर संबंधांच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र असे म्हणता येईल.

S.M. Lipset: "Political Sociology can be defined as the study of the interrelationship between society and polity, between social structures and political institution".

२. **मायकल रश व फिलिप अल्थॉफ :** राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजकारण व समाज राजकीय व सामाजिक रचना आणि राजकीय सामाजिक वर्तणुक यांतील संबंध अभ्यासणारे शास्त्र होय.

**Michael Rush and Phillip Althoff:** "Political Sociology is a subject area which examines the links between politics and society, between social structure and Political structures and between social behaviorand political behavior".

३. **प्रा. ए. के. मुखोपाध्याय :** राजकीय समाजशास्त्र म्हणजे राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्परांवर वैचारीक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रस्ताव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथ्यांकडे सामाजिक संदर्भातून पहाण्यात येते.

**Prof. A. K. Mukhopadhya :** "Political Sociology may be defined as the product of cross fertilization between sociology and Political science that studies the impact of society on politics and also the reverse although viewing the substance of Political in a social form".

४. **लेविस ए. कोजर :** यांनी आपल्या "Political Sociology" या ग्रंथात पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. राजकीय समाजशास्त्र ही समाजशास्त्राची अशी शाखा आहे, जिचा संबंध समाजामध्ये किंवा समाजामधील सत्तेच्या प्राप्त वितरणाची कारणे आणि परिणाम तसेच सत्तेच्या वाटपामधील बदलांस कारणीभूत असणाऱ्या सामाजिक व राजकीय संघर्षाशी असतो.

**Levis A Coser:** "Political Sociology is that branch of sociology which is concerned with the social causes and consequences of given power distribution within or between societies, and with the social and political conflicts that lead to changes in the allocation of powers".

५. **रॉबर्ट ई डाऊझे आणि जॉन ह्युजेस:** समाजशास्त्राच्या चौकटीत केलेला राजकीय वर्तणुकीचा अभ्यास म्हणजे राजकीय समाजशास्त्र होय.

**Robert E. Dowse and John Hughes:** They define Political Sociology as "the study of Political behavior within a sociological perspective of framework."

राजकीय समाजशास्त्राच्या वरिल व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, राजकीय समाजशास्त्राच्या अर्थाबद्दल विविध विचारवंतांनी केलेल्या व्याख्यांमध्ये मतैक्य दिसून येत नाही. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राची सर्वसंमत अशी व्याख्या करणे शक्य होणार नाही. वरील विवेचनात चर्चा केल्याप्रमाणे ही विद्याशाखा नवीनतम असल्यामुळे पुढीलकाळात या संकल्पना अधिक विकसित होऊन विचारवंतांमध्ये एकमत साधले जाईल असा अशावाद मात्र या व्यांख्यांमधून प्रतिबिंबित होतो. वरिल

व्याख्यांमध्ये विचारवंतांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रांचा उल्लेख करून ही दोन्ही परस्परांमध्ये मिसळलेली असल्याचेही मान्य केलेले दिसून येते. त्यामुळेच राजकीय समाजशास्त्रीय घटक व त्यांतील परस्परसंबंध, आंतरक्रिया आणि एकमेकांवरील प्रभावाचा अभ्यास व विश्लेषण या विद्याशाखेत केले जाते.

### १.२.३ राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप:

राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप समजून घेत असताना या विद्याशाखेचे अभ्यासविषय आणि अभ्यास पध्दतींबद्दलचे चर्चाविश्व अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. अगोदर म्हटल्याप्रमाणे हि विद्याशाखा दोन विद्याशाखांमधील अभ्यासघटकांच्या संयोगातून, परस्परसंबंधातून निर्माण झाली. त्यामुळे राजकीय समाजशास्त्रामधील राज्यशास्त्राशी निगडीत अभ्यास घटक व अभ्यास पध्दती तसेच समाजशास्त्राशी निगडीत अभ्यासघटक व अभ्यासपध्दती यांतील विविधतेमुळे ही विद्याशाखा समाजशास्त्र किंवा राज्यशास्त्र यांतील कोणाच्या परिक्षेत्रात येते याविषयी मुलभुत प्रश्न निर्माण झाला.

या विद्याशाखेच्या उदयाची चर्चा प्रस्तावनेत केली आहे. त्याप्रमाणे राजकीय समाजशास्त्राच्या सुरुवातीच्या काळात समाजशास्त्रज्ञांनी मोठ्या प्रमाणावर लेखन केले त्यामुळे या विषय अभ्यासामध्ये सामाजिक घटकांना प्राधान्य मिळणे साहजिक होते. या विचारवंतांनी शासनसंस्था, राजकारण आणि राजकीय घटकांवर सामाजिक स्तरिकरण, गटाचे वर्तन, सामाजिक स्थित्यंतरे यांचा परिणाम कशा पध्दतीने होतो त्याचे विश्लेषण केले. ज्यामधून सामाजिक घटक हे स्वतंत्र आहेत तर राजकीय घटक हे दुसऱ्या घटकांनी प्रभावीत होत असल्याने परतंत्र किंवा परावलंबी आहेत या भुमिकेला राजकीय समाजशास्त्रात प्राधान्य दिले गेले परंतु ह्या भुमिकेवर अनेक अभ्यासकांनी टिका केली व आक्षेप नोंदवले. एस. एम. लिपसेट यांनी म्हटल्याप्रमाणे, राज्यशास्त्राचा आरंभ राज्याने होतो आणि ते समाजाला कसे प्रभावित करते याचा अभ्यास त्यात केला जातो. तर राजकीय समाजशास्त्राचा आरंभ समाजाने होतो व त्याचा राज्यावर कसा प्रभाव पडतो हे त्यात अभ्यासले जाते. राज्य श्रेष्ठ कि समाज श्रेष्ठ या वादविवादाला काही अर्थ नाही कारण दोन्हीही घटक स्वतंत्र व परस्परपुरक आहेत. अशा प्रकारे राज्यासारख्या राजकीय संस्था आणि समाजासारख्या सामाजिक संस्थांचा अभ्यास परस्परसंबंधांच्या समानतेच्या पातळीवर करणे हे राजकीय समाजशास्त्राचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. असे लिपसेट यांनी स्पष्ट केले. लिपसेट यांनी राजकीय आणि सामाजिक घटकांपैकी श्रेष्ठ कोण ही वादविवादाची भुमिका नाकारली आणि दोन्ही घटकांना समन्वयकारी आणि समान महत्व देणारी भूमिका मांडली व राजकिय समाजशास्त्राच्या विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

राजकीय घटक स्वावलंबी की परावलंबी या राजकीय समाजशास्त्रातील वादाच्या विषयाचे विवेचन करताना जिओव्हानी सारतोरी यांचे मत लक्षात घेणे आवश्यक आहे. सारतोरीच्या मते राजकीय पक्ष, मतदान, प्रक्रिया आणि शासनसंस्था यांसारख्या घटकांचा सामाजिक वर्तनावर प्रभाव पडतो म्हणुनच राजकीय घटकांचा सामाजिक घटकांप्रमाणेच स्वतंत्र घटक म्हणुन विचार करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादीत केली.

'राज्यशास्त्रीय विषयांचा समाजशास्त्रीय अभ्यास हे राज्यशास्त्राचे समाजशास्त्रीय अवहेलन आहे' असे मत सारतोरी यांनी व्यक्त केले. अशाप्रकारे राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र विषयाचे अभ्यास हेतू, अभ्यासपध्दती परस्परांपासून स्वतंत्र आणि स्वायत्त वाटत असले तरी राजकीय समाजशास्त्र विषयात दोन्ही शाखांचे एकत्रीकरण वा संयोग असल्याचे दिसते.

राजकीय समाजशास्त्र या विद्याशाखेत वापरले जाणारे दृष्टीकोन समाजशास्त्राशी निगडीत असल्यामुळे ही समाजशास्त्राची ज्ञानशाखा आहे हे मत प्रचलित झाले होते. परंतु या मताचे खंडन करताना अभ्यासकांनी असे मांडले की, सामाजिकशास्त्रे आणि नैसर्गिक शास्त्रे यांमध्ये अनेकवेळा अभ्यासपध्दती व दृष्टिकोनांची देवाण घेवाण होताना दिसते. परंतु त्यामुळे त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले जात नाही. त्यामुळे राजकिय समाजशास्त्राला अभ्यासपध्दती आणि दृष्टिकोनाच्या आधारावर वेगळा न्याय लावणे योग्य होणार नाही. त्यामुळे अभ्यासकांनी अध्ययन क्षेत्रासाठी निवडलेले विषय घटक स्वावलंबी आहेत की परावलंबी आहेत यावरून ज्ञानशाखेंची स्थाननिश्चिती करणे अधिक योग्य ठरेल हा विचार अभ्यासकांनी मांडला. या विचाराला अभ्यासकांमधून मान्यता मिळाल्याने राजकीय समाजशास्त्र ही समाजशास्त्राची किंवा राज्यशास्त्राचीही शाखा नाही हे वास्तव मान्य झाले. राजकीय समाजशास्त्रात राजकीय आणि सामाजिक घटकांचा परस्परांच्या संबंधात विचार अभ्यास केला जातो. त्यामुळेच राजकीय समाजशास्त्र ही ज्ञानशाखा राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा संयोग आहे हे मान्य करण्यात आले.

राजकीय समाजशास्त्राचे अस्तित्व स्वायत्त की परतंत्र ह्या प्रश्नाची उकल झाल्यानंतर त्या विषयाच्या आंतरविद्याशाखीय स्वरूपास मान्यता मिळू लागली. राजकीय समाजशास्त्र हे राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांना जोडणारा दुवा मानला जाऊ लागले. त्याअनुषंगानेच सारतोरी यांनी 'राजकीय समाजशास्त्र म्हणजे सामाजिक व राजकीय स्वरूपाचे आधारभूत घटक एकत्रित आणण्याचा प्रयत्न करणारे आंतरशास्त्रीय संकर आहे' असे वास्तववादी स्वरूप मांडले. या ज्ञानशाखेत राज्यशास्त्र व समाजशास्त्र या दोन्ही शास्त्रांना समान दर्जा देण्यात आला. त्यांच्या त्यांच्यातील आदानप्रदानाला मान्यता देण्यात आली. राजकीय व सामाजिक दोन्ही प्रकारची तथ्ये व यांच्या अभ्यासाला समान महत्व देण्यात आले. त्यांच्यातील आंतरक्रिया, प्रभाव आणि कार्यत्मक संबंधाचे वर्तवादाच्या आधारावर अभ्यास करण्यात प्राधान्य देण्यात आले. राज्यशास्त्रीय विषय घटकांचा तसेच समाजशास्त्रीय विषय घटकांचा परस्परांच्या संदर्भात अभ्यास होऊ लागला. व्यक्ती आणि व्यक्तिसमूहाच्या राजकीय वर्तणुकीचा अभ्यास करताना सामाजिक वास्तव ध्यानात घेऊन अभ्यास होऊ लागला. संशोधनाच्या अनेक पातळ्यांवर म्हणजेच तथ्य संकलन, तथ्य संकरण, पडताळा, मूल्यनिरपेक्षता, संख्यात्मक चाचण्या, आशय विश्लेषण, प्रमाणीकरण इत्यादी पातळ्यांवर वर्तनवादी तत्वांच्या आधारावर अभ्यास केला जाऊ लागला. अशा प्रकारे राजकीय समाजशास्त्राला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले.

अशा प्रकारे राजकिय समाजशास्त्र हि एक स्वतंत्र ज्ञानशाख असून तिचे स्वरूप अवलोकनात्मक, वर्तनवादी आणि आंतरविद्याशाखीय असल्याचे दिसून येते. हे स्वरूप प्राप्त होण्यास संख्याशास्त्र, सामाजिकशास्त्र आणि नैसर्गिक शास्त्राची मदत सहाय्यभूत बनली. या प्रभावामधुनच व्यवस्था,

सामाजिकरण, संस्कृती अशा अनेक संकल्पनांचे अध्ययन आणि नवनवीन संकल्पनांची मांडणी यामुळे राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती व महत्व वाढू लागले आणि भविष्यात राजकीय समाजशास्त्र ही देखील महत्वपूर्णविद्याशाखा मानली जाईल. अशाप्रकारे समाजशास्त्राने प्रभावीत अभ्यास स्वरूपापासून ते स्वतंत्र आणि स्वायत्त स्वरूपाचे अस्तित्व असा राजकीय समाजशास्त्राच्या स्वरूपाचा प्रवास अनेक आव्हानांनी व वाद विवादांनी भरलेला होता. परंतु आता या आव्हानांचे आणि वादविवादांचे निरसन होऊन त्याचे स्वरूप अवलोकनात्मक, वर्तनवादी, विश्लेषणात्मक आणि आंतरविद्याशाखीय बनले.

## १.२.४ राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती:

राजकीय समाजशास्त्र ही विद्याशाखा अगदी नवीनतम असल्यामुळे त्याच्या अभ्यासविषयाची व्याप्ती निश्चित करणे कठीण कार्य आहे. पारंपारिक राज्यशास्त्राचे क्षेत्र राज्य व शासन यांसारख्या औपचारिक राजकीय संस्थेच्या अभ्यासापुरते मर्यादित होते. परंतु राज्यशास्त्रात झालेल्या वर्तनवादी क्रांतीनंतर राजकीय व्यवहार, हितसंबंधी समुहाची क्रिया आणि विभिन्न हितसंबंधी समुहांतील संघर्षात्मक व समाधानात्मक संबंध यांचा अभ्यास होऊ लागला. डेव्हिड ईस्टनने समाजातील मूल्यांचे अधिकृत निर्धारण व वितरण संबंधित क्रियेला राजकीय मानल्यामुळे राज्यशास्त्राचे अध्ययन क्षेत्र राज आणि शासनसंस्थेच्या पलिकडेही विस्तारले गेले. सर्व प्रकारचे सामाजिक संबंध राजकारणाने प्रभावित होतात तसेच राजकीय पक्ष, दबाव गट, निवडणुका या सर्व राजकीय संस्थांवर सामाजिक घटकांचा प्रभाव पडतो ही जाणीव झाल्याने या विषय घटकांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात होऊ लागला.

राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्ती च्या निश्चितीबाबत अनेक विचारवंतांनी विचार व्यक्त केले आहेत. त्यामध्ये सारतोरी, लिपसेट, बैडिक्स, सेल्झनिक, ग्रोअर व ऑरलियन्स, मिचेल, बी एस बाविस्कर, लेविस ए कॉजर, रीचर्ड जी, ब्रनबर्ड, डाउज आणि हयुज यांचा समावेश होतो. यामधील काही विचारवंतांनी व्याप्ती विषयांचे विवेचन पुढील प्रमाणे पहाता येईल.

**१) ग्रीअर व ऑरलिन्स :** त्यांच्यामते राजकीय समाजशास्त्रामध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टींचा अभ्यास केला जातो.

i) राज्याची संरचना

ii) सनद शिस्तेचे स्वरूप व त्यामागील परिस्थिती

iii) बळाच्या मक्तेदारीचे स्वरूप आणि राज्याकडून होणारा त्याचा वापर

iv) राज्याच्या उपघटकांचे स्वरूप आणि त्यांचा राज्याशी संबंध. हेच घटक सारांश रूपाने मांडताना त्यांनी असे म्हटले कि, सहमती आणि सनदशीरता, सहभाग आणि प्रतिनिधित्व, आणि आर्थिक विकास आणि राजकीय बदल यांचा संबंध याचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**२) लिपसेट व वेंडिक्स :** यांनी राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासात पुढील गोष्टींचा समावेश होत असल्याचे मत व्यक्त केले.

i) समुदायामधील आणि राष्ट्रामधील लोकांची मतदान प्रवृत्ती

ii) अर्थसत्तेचे केंद्रिकरण व राजकीय निर्णय प्रक्रिया

iii) राजकीय चळवळी व हितसंबंधी गटांच्या विचारप्रणाली

iv) राजकीय पक्ष, ऐच्छिक संघटना, अल्पजनशाहीच्या समस्या आणि राजकीय वर्तनाचे मानसशास्त्रीय सहसंबंध

v) शासनसंस्था आणि नोकरशाही.

**३) सेक्झनिक :** सेक्झनिक यांनी राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्ती बद्दल पुढील पाच गोष्टींच्या अभ्यासाचा उल्लेख केला.

i) राजकीय व्यवस्थेच्या सामाजिक आधारांचा अभ्यास

ii) राजकीय वर्तणुकीमागील सामाजिक आधारांचा अभ्यास

iii) राजकीय प्रक्रियेचा सामाजिक पैलुंचा अभ्यास

iv) राजकीय निर्णयांचा सामाजिक प्रक्रियांवर कसा व कोणता प्रभाव पडतो त्याचा अभ्यास

v) समाजातील किंवा गटांमधील संघर्षाचा राजकीय प्रक्रियेवर कसा प्रभाव पडतो, त्यामुळे तडजोड व समन्वय कसा घडून येतो व कोणते संघर्ष निर्माण होतात त्याचा अभ्यास.

अशा रितीने अनेक अभ्यासकांनी राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

वरील विवेचनाच्या आधारे राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती पुढील मुद्दांमध्ये मांडता येईल.

**१. राजकीय वर्तणुकीचा अभ्यास –** उदारमतवादी लोकशाहीच्या वाढत्या प्रसारातून व्यक्ती आणि व्यक्तिगटांचा राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येतो. दबाव गट, राजकीय पक्ष, निवडणुका, राजकीय चळवळी, राजकीय प्रतिकार इत्यादींच्या माध्यमातून हा सहभाग घडून येतो. व्यक्तींच्या वर्तनाचा परिणाम राजकीय निर्णय प्रक्रियेवर घडून येतो त्यामुळे व्यक्तिंचे राजकीय वर्तन हा राजकीय समाजशास्त्राचा अभ्यासाचा विषय बनला.

**२. राजकीय समाजिकरणचा अभ्यास –** व्यक्तिची राजकीय वर्तणुक ही त्याव्यक्तिवर होणाऱ्या राजकीय संस्कारातून घडत असते. यामध्ये कुटुंब, समाज विविध सामाजिक संस्था, प्रसार माध्यमे, राजकीय संस्था भूमिका बजावत असतात. म्हणजेच राजकीय वर्तणूक ही ह्या घटकांमुळे घडून येणाऱ्या सामाजिकरण प्रक्रियेतून घडत असते. म्हणून राजकीय सामाजिकरणाचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**३. राजकीय संस्कृतीचा अभ्यास –** प्रत्येक देशाची सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी वेगवेगळी असते. त्यामुळे राजकीय संस्कृतीत देखील विविधता आढळते. राजकीय संस्कृतीतूनच राजकीय व्यवस्थेला अधिमान्यता प्राप्त करुन देणारी मुख्य व्यवस्था आकाराला येत असते. त्यामुळे राजकीय समाजशास्त्रात राजकीय संस्कृतीचा अभ्यास केला जातो.

**४. सत्ता, प्रभाव, अधिकार, अधिमान्यता इ. संकल्पनांचा अभ्यास** – राज्य आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करत असताना या संकल्पनांचा अभ्यास करणे आवश्यक मानले जाते. त्यामुळे या संकल्पनांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**५. नोकरशाहीचा संसूचनाचा अभ्यास –** राज्याच्यामध्ये विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी नोकरशाही पार पाडत असते. आणि यशस्वीरित्या होण्यासाठी संसूचनाची आवश्यकता असते. त्यामुळे राजकीय समाजशास्त्रात नोकरशाही व संसुचन याचा अभ्यास करणे आवश्यक बनते.

**६. सामाजिक राजकीय गतिमानतेचा अभ्यास** – सामाजिक राजकीय गतिमानतेच्या अनुषंगाने राजकीय स्थिरता, संघर्ष, राजकीय विकास, राजकीय बदल, राजकीय आधुनिकीकरण, विचारसरणी या घटकांचे योगदान अभ्यासणे राजकीय समाजशास्त्रामध्ये आवश्यक बनते.

**७. सामाजिक राजकीय नियंत्रण** – आधुनिक काळात राज्यव्यवस्थेवरील सामाजिक राजकीय नियंत्रणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामध्ये हितसंबंधी गट, दबाव गट, राजकीय पक्ष, श्रेष्ठीजन यांची भूमिका महत्त्वाची ठरते त्यामुळे त्यांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**८. राजकीय व्यवस्थेचा अभ्यास** – यामध्ये जगातील विविध राजकीय व्यवस्था त्यांची वैशिष्ट्ये, कार्यपध्दती व तेथे चालणाऱ्या प्रक्रिया यांचा अभ्यास केला जातो.

**९. गैर राजकीय समस्यांचा अभ्यास** – राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. समाजातील सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, गैर राजकीय गोष्टींचा प्रभाव राजकारणावर तसेच निर्णय प्रक्रियेवर वाढू लागला आहे. या सर्व महत्त्वाच्या समस्यांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

**१०. राजकीय भरतीचा अभ्यास** – कल्याणकारी राज्य संकल्पनेमुळे शासन आणि प्रशासनाचा आकार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. शासन व प्रशासनामध्ये सातत्याने राजकीय भरती केली जाते. आणि या माध्यमातून राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य टिकवून ठेवले जाते. त्यामुळे राजकीय समाजशास्त्रात राजकीय भरतीचा अभ्यास केला जातो.

अशा प्रकारे विविध विचारवंतांनी राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. हि ज्ञानशाखा राजकीय व सामाजिक दोन्ही ज्ञानशाखांचा एक संयोग असल्याने राजकीय व सामाजिक दोन्ही परिक्षेत्रांतील विषयघटकांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. आंतरविद्याशाखीय स्वरूपामुळे राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असताना दिसते.

**राजकीय समाजशास्त्राच्या विकासाचे टप्पे :**

राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप व व्याप्ती समजून घेत असताना या विद्याशाखेचा विकासही समजून घेणे आवश्यक आहे. मानव हा समाजशील प्राणी असून त्याचे अस्तित्व हे सामुहिक कृती व परिवर्तन यामधून घडताना दिसते.

आपण वरील मुद्यांमधील विवेचनात पाहिल्याप्रमाणे प्राचीनकाळी राज्य व समाज असा भेद केला जात नव्हता. परंतु नंतरच्या काळात म्हणजे साधारण मध्ययुगाच्या अखेरीस राज्याचे आधार केवळ धार्मिक नसून प्रादेशिक सार्वभौमत्त्व असते असे सिद्धांत मांडले गेले. आणि त्यामुळे पुढील काळात राज्य व समाज यात फारकत केली जाऊ लागली. आणि राज्य व समाजामधील विविध क्षेत्रांमधील जसे की आर्थिक, धार्मिक, भाषिक, सामाजिक, प्रादेशिक, सांस्कृतिक अशा क्षेत्रांमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करण्याच्या आवश्यकतेतून राजकीय समाजशास्त्राची शाखा उदयास आली. या विविध पैलूंमुळे या विद्याशाखेला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले. या सामाजिक राज्यशास्त्राचा विकास खालील चार टप्प्यांमध्ये पहाता येईल.

**१) राजकीय समाजशास्त्राचा अभिजात कालखंड :**

प्लेटो, ॲरिस्टॉटल, सिसेरो, सेंट-ॲक्विनास इ. राजकीय समाजशास्त्राच्या अभिजात कालखंडाचे प्रतिनिधित्व करतात. या काळात विविध विचारवंतांनी विविध समाजातील फरकाचा अभ्यास केला तसेच फरकांचा राजकारणाशी व राजकीय प्रक्रियेशी कसा संबंध येतो याचा अभ्यास केला. प्लेटो व ॲरिस्टॉटल ह्या दोन्ही विचारवंतांनी राज्याच्या सामाजिक उदयाबाबत विचार मांडले.

१. प्लेटो ने त्याच्या 'रिपब्लिक' या ग्रंथात राज्याचा उदय माणसाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजेतून झाला असे मत मांडले. राज्याचा मुख्य उद्देश हा सर्वांचे हित हा असून ते न्याय व सुव्यवस्था या आदर्श तत्त्वांवर आधारलेले आहे. प्लेटोचे आदर्श राज्य हे तीन स्तरांमध्ये विभागलेले होते - श्रमिक जे उत्पादनाचं कार्य करतात, सैनिक जे रक्षण करण्याचे कार्य करतात आणि तत्त्वज्ञ राजा जे राज्यकरण्याचे कार्य करतात.

२. ॲरिस्टॉटलने त्याच्या 'पॉलिटिक्स' या ग्रंथात राज्य निर्मितीचा संबंध कुटुंब निर्मितीच्या प्रक्रियेशी जोडला आहे. कुटुंबाने आपल्या सदस्यांच्या दैनंदिन गरजा पुरवून त्यांचे वैयक्तिक अस्तित्व टिकवून ठेवले तर गाव हा पहिला सामाजिक-राजकीय समुदाय बनला ज्यामध्ये त्यातील सदस्यांचे सामुहिक अस्तित्व टिकवून ठेवले. अशी अनेक गावे मिळून ॲरिस्टॉटल ज्याला राज्य म्हणतो ते निर्माण झाले. प्लेटो व ॲरिस्टॉटल या दोघांनीही राजकारणाला मानवाची नैसर्गिक निर्मिती मानली आणि अशाप्रकारे माणसाला राजकीय मानवाचा दर्जा दिला.

३. सिसेरो नगर राज्यांचा अभ्यास करणाऱ्या ग्रीक विचारवंतांपेक्षा वेगळं सिसेरो या रोमन विचारवंताने समाजाची 'देव व मानव यांनी एकत्रितरित्या बनलेले वैश्विक नगर' अशी संकल्पना मांडली. 'द

लॉज'मध्ये सिसेरोने असा युक्तिवाद केला आहे की समाज हा वैश्विक नियमांवर म्हणजेच ''योग्य विवेक'' याच्याशी सुसंगत असणाऱ्या नैसर्गिक कायद्यावर आधारित होता. नैसर्गिक कायद्याने संपूर्ण इतिहासातील सर्व प्रमाणांची पूर्तता केली असल्याने तो अधिक विचारस्थायी राजकीय व्यवस्थेचा पाया बनणे आवश्यक आहे.

४. याच विचारांचा आधार घेत सेंट ऑगस्टीन व ॲक्वीनास या मध्ययुगीन तत्त्वज्ञांनी दैवी तत्त्वांवर आधारलेल्या समाजाची मांडणी केली. ऑगस्टीन व ॲक्वीनासच्या मते, दैवी शक्ती समाजात मार्गनर्शन करते. ही दैवी शक्ती चर्चमध्ये असते. मानवाचे भवितव्य राज्य व चर्चशिही जोडलेले असते. समाजाच्या उत्क्रांतीत नसते. परंतु नंतरच्या कालखंडामध्ये या गृहितकाला आव्हाने देण्यात आले.

**२) भिन्न विचारांवरील चर्चेचा कालखंड :**

दुसरा कालखंड महत्त्वाचा आहे कारण या काळात दोन भिन्न मतप्रवाहांवर चर्चा झाली. पहिल्या प्रवाहामध्ये लॉक, मॉन्टेस्क्यू, रूसो, सेंट सायमन, कॉम्टे आणि कार्ल मार्क्स यांचा समावेश होतो. त्यांच्या मते राज्य व समाज वेगळे आहेत. दुसऱ्या प्रवाहात मॅकाव्हली, हॉब्ज, बर्क, हेगेल, बोनाल्ड, मेस्त्रे यांचा समावेश होतो. त्यांनी राज्य व समाजात फरक केलेला नाही. तसेच पारंपारिक राजेशाही किंवा चर्चच्या वर्चस्वाला आणि अधिमान्यतेला पसंती दर्शवली आहे. याचबरोबर मॅक्स वेबर, मॅकआयव्हर आणि इतरांना राजकीय समाजशास्त्राच्या विकासात वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले आहे.

१. लॉक (१६३२-१७०४) हा असा युक्तिवाद करणाऱ्यांपैकी पहिला विचारवंत होता की मानव हा निसर्गावस्थेत रहात होता आणि त्याला जीवीताचा, स्वातंत्र्याचा आणि संपत्तीचा अधिकार असे काही अविभाज्य अधिकार आहेत. माणसाच्या नैसर्गिक हक्कांच्या अभिव्यक्तीसाठी आणि कायदा व सुव्यवस्था याची हमी देण्यासाठी शासनाची आवश्यकता लॉकने प्रतिपादित केली. लॉकने त्याच्या सामाजिक कराराच्या सिद्धांतामधून मर्यादित सार्वभौमत्त्वाची मांडणी केली. जेथे व्यक्ति द्विपक्षीय कराराचा भाग होताना आपल्या मुलभून नैसर्गिक अधिकारांचा त्याग करत नाहीत तसेच त्यांना जर असे वाटले की हे शासन योग्य पद्धतीने त्यांचे व त्यांच्या अधिकारांचे प्रतिनिधीत्व करत नसेल तर ते बदलण्याचा अधिकार त्यांना आहे.

२. मॉन्टेस्क्यूने (१६८९-१७५५) त्याच्या द स्पिरिट ऑफ लॉज या ग्रंथात अशी मांडणी केली की शासनाचा आदर्श असा प्रकार असूच शकत नाही. कारण प्रत्येक शासनात त्या देशाचै वैशिष्ट्यपूर्ण समाजरचना प्रतिबिंबीत झालेली असते. सामाजिक घटक राजकीय जीवनावर परिणाम करतात. राजकीय जीवनात स्थित्यंतरे घडवतात. मॉन्टेस्क्यूच्या मते लोकसंख्याशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय घटक सामाजिक व राजकीय बदल घडवून आणतात.

३. रूसो (१७१२-१७७८) रूसोने त्याच्या 'डिस्कोर्स ऑन द ओरिजीन ऑफ इनइक्कालिटी अमंग मेन', या ग्रंथात शासनाला त्याच्या खाजगी संपत्तीच्या संरक्षणाची जबाबदारी दिली.

'द सोशिअल कॉन्ट्रॅक्ट' या पुस्तकात व्यक्ति स्वातंत्र्य आणि राजकीय संस्था यांच्या संघर्षात्मक मागण्यांमध्ये सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शासनाचा सिद्धांत मांडला. लॉकच्या सामाजिक कराराच सिद्धांत व नैसर्गिक कायद्याच्या तत्त्वांचा आधार घेऊन रूसोने लोकांचे सार्वभौमत्त्व (Popular Sovereignty) ची संकल्पना मांडली. त्याने सर्वंकश राजेशाहीचा विरोध केला आणि सामुहिक इहेला प्राधान्य दिले. ज्या आधारावर समाजातील सदस्य स्वेच्छेने लोकांच्या गरजा पूर्ण करू शकणारे शासन निर्माण करेल. जर शासन लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास अयशस्वी ठरले तर रूसोने घासन बदलण्याचा अधिकार लोकांना दिला.

४. सेंट सायमन (१७६०-१८२५) आणि ऑगस्ट कॉम्ट (१७९७-१८५७) यांनी राजकीय सिद्धांतामध्ये प्रत्यक्षार्थ वादाच्या तत्त्वांचा (अनुभवजन्य विवेक) पुस्कार केला. प्रत्यक्षवादाचा अर्थ समाजातील सामान्यीकृत प्रारूपे, अनुभवजन्य पद्धतीचा वापर आणि सामाजिक सांख्यिकी माहितीचे निरीक्षण व वर्गीकरण यावर भर देणे होय. शास्त्रीय तत्त्वांचा अंगीकार करून राजकीय नेते व शासन सामाजिक विकासाची आखणी करू शकते.

५. हर्बर्ट स्पेन्सरला (१८२०-१९०३) समाजशास्त्र विषयाची सुसंगत बांधणी करणारा विचारवंत म्हणून ओळखले जाते. त्याने त्याच्या 'प्रिन्सिपल्स ऑफ सोशिऑलॉजी' या ग्रंथात सामाजिक संस्थांचे ऐतिहासिक वर्णन केले आहे. तसेच सामाजिक व राजकीय विश्लेषणामध्ये सामाजिक संरचनांची भूमिका विशिष्टपणे मांडली.

६. कार्ल मार्क्सने (१८१८-१८८३) राजकीय समाजशास्त्राप्रति व राजकारणाच्या समाजशास्त्राप्रति महत्त्वपूर्ण आणि विविधांगी योगदान दिले आहे. हेगेलच्या 'विरोध विकास' तत्त्वांच्या धरतीवर त्याने भौतिक इतिहासाची वाटचाल वस्तुस्थिती (थेसीस) विरोधी स्थिती (अँटी थेसीस) व परिजत स्थिती (सिंथेसीस) या सूत्रांच्या आधारावर मांडली. या सिद्धांताला डायलेक्टिकल मटेरियालिझम किंवा विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद असे म्हटले जाते. ऐतिहासिक विकासामध्ये त्याने त्याने कोणत्याही व्यवस्थेच्या त्या त्या काळच्या सामाजिक, राजकीय व वैधानिक रचना मुख्यतः आर्थिक व्यवस्थेवर आधारलेल्या असतात अशी मांडणी केली. अर्थात मानवाच्या ऐतिहासिक विकासामागील प्रेरक शक्तींचे रूपांतर आर्थिक रचनांमध्ये होते. म्हणजेच विकासप्रक्रियेमध्ये सामाजिक, राजकीय व वैधानिक रचनांचा आधार हा आर्थिक व्यवस्था हाच असतो असे त्याने अनुमान काढले.

७. डरखाईम (१८५०-१९१७) याने प्रत्यक्षार्थवाद्यांप्रमाणे काल्पनीक गोष्टींवर विश्वास न ठेवता सामाजिक रचनेचा व कामाचा प्रत्यक्ष अभ्यास केला आणि सामाजिक राजकीय सिद्धांत मांडला. सिद्धांत मांडत असताना त्याने मुल्याधारित निर्णयांपेक्षा अनुभवजन्य माहितीचा मोठ्या प्रमाणावर आधार घेतला.

८. मॅक्स वेबर (१८६४-१९२०) : कार्ल मार्क्स नंतर राजकीय समाजशास्त्रात सर्वात महत्त्वपूर्ण योगदान जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर यांनी केले आहे. राज्य आणि समाज यांच्यातील संबंध, नोकरशाहीची संकल्पना इत्यादीबद्दल त्यांनी केलेल्या विश्लेषणामुळे राजकीय समाजशास्त्रात महत्त्वाची भर पडली.

राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी वेबरने दिलेले आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे ‘अधिमान्यतेची’ संकल्पना. ज्यामुळे सत्तेच्या वापरास अधिकृतता प्राप्त होते व ती व्यापकपणे स्वीकारली जाते. वेबरच्या मते राज्य म्हणजे असा समाज ज्याकडे सत्तेचा वापर करण्याची अधिमान्यता आहे.

९. मॅकाव्हाली (१४६९-१५२७) याने राजकारण व माणसाचे मुलभूत स्वरूप याबाबत निंदक दृष्टिकोनाचा अवलंब केला. त्याने असा युक्तिवाद केला कि जेव्हा राज्याच्या संरक्षणाचा विषय येतो तेव्हा गरजा नेहमीच साधनांचे समर्थन करतात. त्याच्या मते समाजाने जर उदारता स्विकारली तर राज्य समाप्ती निश्चित आहे. सत्ताधिशाने राज्य करताना कोणत्याच नितीनियमांचा विचार करू नये, असा विचार मांडला.

१०. त्याचपद्धतीने हॉब्ज (१५८८-१६७९) या विचारवंताने निसर्गावस्थेला गोंधळाची स्थिती म्हणून संबोधले. आणि मनुष्याला आक्रमक, युद्ध प्रवण प्राणी संबोधले. लॉकने माणसाचे स्वरूप आशावादी व सकारात्मक असल्याचे म्हटले होते. परंतु हॉब्जने मनुष्याचे स्वरूप हे स्वार्थी, क्रूर, बेकायदेशीर आणि अधिकार व शिस्तीचा अभाव असलेले असे केले आहे. ‘लेव्हीॲथन’ या त्याच्या ग्रंथामध्ये हॉब्जने असे मांडले आहे की कार्यक्षमरित्या शासन करण्यासाठी अनिर्बंध अधिसत्तेची आवश्यकता असते. आणि समाजाला टिकून रहायचे असेल तर व्यक्तिंनी त्यांचे सर्व अधिकार व सत्ता राजाप्रति समर्पित केले पाहिजेत. राजकारणामध्ये सामाजिक करार ही महत्त्वाची पूर्व अट आहे, परंतु हा करार अपरिवर्तनीय करार होता.

११. बर्कने (१७२९-१७९७) त्याच्या रिप्लेक्शन्स ऑन द रेव्होल्यूशन इन फ्रान्स या ग्रंथात पुराणमतवादाचा जोरकरपणे पुरस्कार केला आहे. बर्कच्या मत वर्तमान समाज हा परंपरा चालीरिती, संस्थांनी बांधलेला असतो. या प्रथा, परंपरा, संस्था संपविता येत नाहीत. त्याचा पगडा समाजाच्या सर्व अंगांवर असतो. राज्य त्याला अपवाद नसते. बर्कने असा दावा केला की भूतकाळाला भविष्यकाळाशी जोडले ही समाजाची मुलूभूत जबाबदारी आहे आणि वर्तमानातून हे साध्य होते.

अशाप्रकारे या टप्प्यामधील विचारवंतांनी मांडलेल्या विवध भूमिकांमधून राजकारणाच्या समाजशास्त्राच्या विकासामधील अनेक महत्त्वाच्या संकल्पना निर्माण झाल्या आणि यातूनच पुढे राजकीय समाजशास्त्राला आकार देण्याच्या विचारांची निर्मिती झाली.

### ३) अभिजनवादी विचाराचा कालखंड :

राजकीय समाजशास्त्राच्या विकासाचा तिसरा टप्पा महत्त्वाचा आहे. अभिजन किंवा श्रेष्ठजनांचा विचार १९ व्या शतकात प्रभावीपणे मांडण्यात आला. आधुनिक समाजामध्ये अभिजन/श्रेष्ठजनांच्या भूमिकेला महत्त्व देण्यात आले. शासन कोणत्याही प्रकारचे असो अभिजन नेहमी सत्तेवर असतात असा विचार यामध्ये मांडण्यात आला. अभिजनांमध्ये साधारणत: समाजातील प्रभावी व्यक्तिंचा समावेश होतो.

पॅरोटो व मोस्का आणि मिचेल्स यांनी १९ व्या व २० व्या शतकात अभिजन सिद्धांत मांडला. त्यांच्या मते अभिजन सत्ता, लष्कर किंवा पैसा याच्या सहाय्याने समाजावर नियंत्रण ठेवतात. अभिजन वर्ग प्रत्येक समाजात सारखाच नसतो. परंतु हा वर्ग शासन करणारा असतो. राजेशाहीत मोजक्याच व्यक्तिंच्या हातात सत्ता होती. महाजनशाहीमध्ये देखील तेच होते. त्यांच्यामते अगदी लोकशाहीमध्ये देखील सर्वांच्या हाती सत्ता असते असे म्हटले गेले असले तरी प्रत्यक्षात मात्र मोजक्याच अभिजनांच्या हातात सत्ता असते. समाजामधील अभिजनवर्गच सत्ताधिश असतो.

लोकशाहीमुळे परंपरागत समाजरचनेत बदल झाला. परंपरागत अभिजनांकडून सत्ता केंद्र बाजूला गेले. म्हणजेच राजकीय व्यवस्थेच्या स्वरूपात बदल झाला की समाजरचनेत बदल होतो व राजकीय अभिजनात देखील बदल होतो. लोकशाही व्यवस्थेच्या उदयामुळे 'पारंपारिक अभिजनां'च्या जागी गुणवत्तेच्या निकषावर समाजाला नियंत्रित करणारे अभिजन निर्माण झाले. परंतु लोकशाहीमध्ये देखील अभिजन समाजाकडेच राज्याची सत्ता असते असे दिसते.

अभिजन दृष्टिकोनाने राजकीय समाजशास्त्राच्या विकासात मोठे योगदान दिले आहे.

**४) आधुनिक विचारांचा कालखंड/समकालीन कालखंड :**

राजकीय समाजशास्त्राच्या विकासाचा चौथा टप्पा म्हणजे आधुनिक विचारांचा कालखंड किंवा समकालीन कालखंड. हा टप्पा अधिक अनुभवजन्य आणि विश्लेषणात्मक आहे. यामध्ये समाज व राजकारण यांची सांगड घालून अनुभवजन्य सर्वसाधारण चलांची निर्मिती करण्यावर भर दिला आहे. यामध्ये पुढील विचारवंतांचा उल्लेख करता येईल.

**१) आर्थर बंटले :** या विचारवंताने ग्रॅहम वॉलेसप्रमाणे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा पुरस्कार केला. 'दी स्टडी ऑफ ग्रुप्स इन पॉलिटिक्स' या ग्रंथामध्ये बंटले याने राजकीय पक्ष, निर्वाचन पद्धती, लोकमत प्रभाव, दबाव गट इ. नव्याने निर्माण होत असलेल्या आणि सत्तेमध्ये भूमिका बजावणाऱ्या विविध औपचारिक व अनौपचारिक संस्थांचा अभ्यास केला.

**२) रॉबर्ट ढाल :** त्याच्या मते ज्या मानवी संबंधांत सत्ता, शक्ती किंवा अधिकार विशेष प्रमाणात समाविष्ट असतात ती व्यवस्था राजकीय मानली पाहिजे. त्याने राजकीय स्तरावरच नाही तर कोणत्याही स्तरावर राजकीयत्व असू शकते अशी मांडणी केली. दखल घेण्याइतपत प्रमाणात सत्ता, निगमन किंवा अधिकार ज्या मानवी संबंधांच्या आकृतीबंधात असेल तिथे राजकीय व्यवस्थाच मानावी लागेल असे ढालचे मत आहे.

**३) डेव्हिड ईस्टन :** याने पहिल्यांदा आधुनिक व्यवस्थावादी सिद्धांत १९५३ साली 'दी पॉलिटिकल सिस्टीम' या ग्रंथातून मांडला. त्याने राजकीय व्यवस्थेमध्ये मुल्यांचे अधिकारयुक्त निर्धारण किंवा वितरण यावर भर दिला. राजकीय व्यवस्थेचे घटक, आणि तिची कार्यपद्धती याची व्यापक संकल्पनात्मक मांडणी त्याने केली.

**४) डेव्हिड ॲप्टर :** या अमेरिकन विचारवंताने त्याच्या 'दी पॉलिटिक्स ऑफ मॉडर्नायझेशन' (१९६५) या ग्रंथात असे विश्लेषण केले आहे की, आधुनिक विश्लेषणाला केवळ मूल्यरहीत होणारे इतर परिणाम देखील लक्षात घ्यावे लागतात. कारण या अभ्यासाशिवाय धोरणांच्या निवडीचे विश्लेषण अपूर्ण ठरते.

वरील विचारवंतांबरोबरच लिपसेट, ग्रीर, मुर, मिल्स, हंटर, जोनोविट्झ इ. अनेक विचारवंतांचा समावेश या टप्प्यामध्ये होतो. या राजकीय समाजशास्त्रज्ञांनी राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासात वास्तविकतेवर भर दिला आणि राजकीय प्रक्रियांचा सामाजिक अभ्यास पद्धतींनुसार शोधण्याचा प्रयत्न केला. आणि या विद्याशाखेला अधिक अभ्यासपूर्ण आणि परिपक्व सामाजिक-शास्त्रीय विद्याशाखा बनविण्याचा प्रयत्न केला.

**सारांश :**

वरील मुद्दे व विवेचनांवरून राजकीय समाजशास्त्राचा विकास कसा झाला हे लक्षात येते. राजकीय समाजशास्त्राच्या विकासाबरोबरच विविध विचारवंतांच्या अभ्यासामधून अभिजात, अभिजनवादी मार्क्सवादी, व्यवस्थावादी, वास्तववादी असे अनेक दृष्टीकोन निर्माण झाले जे राजकीय समाजशास्त्रांच्या अभ्यासाची सैद्धांतिक बैठक पक्की करतात.

### १.२.५ राजकीय समाजशास्त्राचे महत्त्व :

पारंपारिक राज्यशास्त्रामध्ये राज्य आणि समाज या संकल्पनांमध्ये भेद केला जात नव्हता. परंतु मध्ययुगामध्ये या संकल्पनांमधील भेदांची जाणीव झाली. व नंतर प्रबोधन युग, विज्ञानाचा उदय व औद्योगिक क्रांतीमुळे राज्य आणि समाज संकल्पनेतील परस्पर फरक आणि परस्परांविषयीच्या तथ्यांची अभ्यासकांनी मांडणी करण्यास सुरुवात केली. त्यांच्यामधील भिन्नतेबरोबरच परस्पर पूरकता, पस्परसंबंध यांचे विषयघटक म्हणून पहाण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यामुळे राज्य व समाज यांमधील संबंध समजून घेण्यासाठी राजकीय समाजशास्त्र या विषयाच्या अध्ययनाचे महत्व वाढू लागले. राजकीय समाजशास्त्र राजकरणाचा चार पातळ्यांवर अभ्यास करते. राष्ट्राराष्ट्रांमधील राजकीय संघर्ष म्हणजेच आंतरराष्ट्रीय संबंधाचे समाजशास्त्र, विविध समाजामंधील राज्याचे स्वरूप आणि भूमिका, राजकीय चळवळी आणि राजकीय पक्ष यांचे स्वरूप व संघटन आणि व्यक्तिंचा राजकाणामधील सहभाग.

अशाप्रकारे व्यक्ति व राज्य यांच्यातील संबंध कसे असावेत या पारंपारिक राज्यशास्त्राच्या आदर्शवादी भूमिकेकडून व्यक्ति व राज्य यांच्यातील प्रत्यक्षातील संबंध कसे आहेत त्याचे राजकीय व सामाजिक वर्तनाचे पैलू काय आहेत हे अभ्यासण्यावर भर दिला जाऊ लागला.

मनुष्य हा सामाजिक प्राणी असून समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे आहे तसेच समाज नियंत्रित व नियमित करणाऱ्या शक्तींचे योगदान लक्षात घेणे आवश्यक आहे. याची जाणीव अभ्यासकांमध्ये झाली. राजकीय समाजशास्त्रामध्ये व्यक्तिंचे सामाजिक जीवन आणि राजकीय जीवन यांमध्ये होणाऱ्या आंतरक्रियांचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास व विश्लेषण होऊ लागले. या विश्लेषणामधून राजकीय

नियम आणि सामाजिक नियम यांमध्ये पारंपारिक समन्वयाची गरज प्रतिबिंबित होऊ लागली. समूह राजकीय जीवनाला कितपत सहयोग करतात आणि राजकीय घटना समूह जीवनाला कितपत प्रभावित करतात या सर्व गोष्टींची उकल राजकीय समाजशास्त्राद्वारे होऊ लागली त्यामुळे या विषयाचे महत्त्व वाढत गेले.

प्रत्येक राजकीय व्यवस्थेसाठी स्थैर्य आवश्यक असते. राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी कोणत्या घटकांची आवश्यकता असते. तसेच कोणत्या घटकांमुळे राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्याला धोका निर्माण होतो याचे आकलन राजकीय समाजशास्त्रामुळे होऊ लागले. तसेच राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व, स्थैर्य यामध्ये राजकीय सामाजिकरण, राजकीय समावेशन, राजकीय संस्कृतीचे विविध घटक कसे परिणाम करतात याचे अध्ययन राजकीय समाजशास्त्रात होऊ लागल्यामुळे या ज्ञानशाखेच्या अध्ययनाला महत्त्व प्राप्त होऊ लागले.

कोणतीही राजकीय व्यवस्था हि विविध हितसंबंधाच्या पुर्तीसाठी निर्माण होत असते. त्यामुळे हे हितसंबंध म्हणजे काय, ते कसे निर्माण होतात त्यांचे समाधानाचे मार्ग कोणते, विविध हितसंबंधी गटातील संघर्षात्मक, समन्वयात्मक संबंध आणि या सर्वाचा राजकीय व्यवस्थेवर कसा परिणाम होतो. याचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात होत असल्यामुळेही या विषयाचे महत्व वाढले आहे. तसेच सत्ता, प्रभाव, अधिकार, अधिमान्यता, श्रेष्ठी जनांची भूमिका याचे राजकीय व सामाजिक अभ्यासण्यांच काम राजकीय व सामाजशास्त्रामध्ये होऊ लागल्याने या विषयास महत्व प्राप्त झाले.

एकुणच राजकीय समाजशास्त्राचा अभ्यास हा राजकीय व सामाजिक विकास प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावत आहे. राजकीय व्यवस्थेमधील व्यक्तींची, व्यक्तिंच्या गटांची त्यांच्या हितसंबंधांची, संघर्षाची, भूमिका, राजकीय पक्ष, राजकीय सामाजिकरण, राजकीय संस्कृती या सर्वामधून व्यक्तिंचा राजकीय सहभाग वाढताना दिसत आहे. त्यामुळे राजकीय समाजशास्त्राचे महत्व वाढत आहे.

राजकीय समाजशास्त्राच्या अध्ययनामुळे अनेक नवीन संकल्पना, प्रारूपे, अभ्यासपध्दती, दृष्टिकोन, अध्ययनतंत्रे, अवधारणा विकसित झाल्या आहेत. आंतरविद्याशाखीय स्वरूपामुळे सिध्दांतांचे सामान्यीकरण करणे शक्य झाले आहे. सामान्यीकरणामुळे मानवी वर्तनाच्या राजकीय व सामाजिक गुंतागुंतीचा अभ्यास अधिक शास्त्रीय पध्दतीने करता येऊ लागला आहे. या विविध प्रकारच्या उपयुक्तांमुळे राजकीय समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व आधुनिक काळात वाढताना दिसते आहे.

## १.३ सारांश :

या घटकामध्ये आपण राजकीय समाजशास्त्राचा अर्थ, व्याख्या व स्वरूप समजून घेतले. तसेच राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती व महत्व याचे आकलन झाले.

राजकीय समाजशास्त्रामध्ये व्यक्ति, गट आणि समाजाच्या राजकीय व सामाजिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. राज्य व समाज यांच्यातील परस्पर संबंध राजकीय व्यवस्थेमध्ये कार्यरत असणारे विविध हितसंबंधीगट, राजकीय पक्ष तसेच राजकीय समाजिकरण, राजकीय संस्कृती, राजकीय सहभाग, राजकीय

भरती अशा प्रक्रियांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासामामुळे राजकीय समाजशास्त्राला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळेच राजकीय समाजशास्त्र या ज्ञानशाखेला आज महत्व प्राप्त झाले आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:

- **राजकीय व्यवस्था** – निरनिराळ्या प्रकारची कार्ये पार पाडण्याऱ्या परस्पर संबंधित रचनांचा संच म्हणजे राजकीय व्यवस्था
- **हितसंबंधी गट** – विशिष्ट सामान्य हितसंबंधांच्या आधारावर सार्वजनिक धोरणावर प्रभाव टाकू पाहणारा लोकांचा समूह.
- **राजकीय सामाजिकरण** – समाजातील वेगवेगळ्या घटकांकडून राजकीय माहिती व मूल्य लोकांमध्ये जाणीवपूर्वक रूजविण्याची प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजिकरण होय.
- **राजकीय संस्कृती** – अनुभवातून निर्माण झालेल्या श्रध्दा, देशातील प्रतिके व मुल्ये यांची गोळाबेरीज म्हणजे राजकीय संस्कृती होय.
- **आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन** – जेव्हा एखाद्या विषयाच्या अभ्यासासाठी दोन किंवा अधिक विद्याशाखांमधील विविध दृष्टिकोन, अभ्यासपध्दती, तंत्रे यांचा एकत्रित वापर केला जातो त्याला आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन असे म्हणतात.

## १.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

१) प्रा. ए. के. मुखोपाध्याय यांनी केलेली राजकीय समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

२) एस. एम लिपसेट यांनी केलेली राजकीय समाजशास्त्राची व्याख्या लिहा.

३) राजकीय समाजशास्त्राच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात कोणत्या घटकांना अधिक प्राधान्य दिले गेले ?

४) आधुनिक काळात राजकीय समाजशास्त्राचे स्वरूप कशा प्रकारचे दिसून येते ?

५) राजकीय समाजशास्त्रात व्यक्तिच्या वर्तनाच्या कोणत्या पैलूंचा अभ्यास केला जातो?

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) प्रा. ए. के. मुखोपाध्याय यांच्या मते राजकीय समाजशास्त्र म्हणजे राजशास्त्र व समाजशास्त्र यांचे परस्परांवर वैचारिक अभिसिंचन असून त्यात समाजाचा राजकारणावर आणि राजकारणाचा समाजावर होणारा प्रभाव अभ्यासण्यात येतो आणि राजकीय तथ्यांकडे सामाजिक संदर्भातून पहाण्यात येते.

२) एस. एम. लिपसेट यांच्या मते  समाज आणि राज्यव्यवस्था यातील व सामाजिक रचना आणि राजकीय संस्था यातील परस्पर संबंधांच्या अभ्यासाला राजकीय समाजशास्त्र असे म्हणता येईल.

३) राजकीय समाजशास्त्राच्या विकासाच्या सुरुवातीच्या काळात सामाजिक घटकांना अधिक प्राध्यान्य दिले गेले.

४) आधुनिक काळात राजकीय समाजशास्त्राला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

५) राजकीय समाजशास्त्रात व्यक्तिच्या वर्तनाच्या राजकीय व सामाजिक पैलूंचा अभ्यास केला जातो.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) राजकीय समाजशास्त्राच्या व्याख्या देऊन त्याचा अर्थ स्वरूप स्पष्ट करा.

२) राजकीय समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

३) राजकीय समाजशास्त्राच्या आंतरविद्याशाखीय स्वरूपाची चर्चा करा.

४) विविध विचारवंतांनी मांडलेल्या राजकीय समाजशास्त्राच्या व्याप्ती विषयीचे विचार स्पष्ट करा.

५) राजकीय समाजशास्त्र हि संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

६) राजकीय समाजशास्त्राचे महत्व स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) पाटील महेंद्र, २०१७, राजकीय समाजशास्त्र प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२) वासनिक, रोकडे, २०२०, राजकीय समाजशास्त्र, ज्ञानपथ पब्लिकेशन, अमरावती.

३) देवगांवकर एस. जी. १९९०, राजकीय समाजशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.

४) इनामदार एम. आर व पुराणिक एस. एन. १९८४, राजकीय समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

५) कुलकर्णी बी. वाय. २००३, राजकीय समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

६) Basu Padip, 2015, Political Sociology, Setu Prakashan.

❑❑❑

## सत्र २ : घटक २
# राजकीय समाजशास्त्राची बौद्धिक अधिष्ठाने

### अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ वर्तनवादी दृष्टीकोन

    २.२.२ मार्क्सवादी दृष्टीकोन

    २.२.३ वेबरचा दृष्टीकोन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

संबंधित घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास;

१) राज्यशास्त्राच्या अभ्यासपद्धतीच्या विविध दृष्टीकोनाची माहिती उपलब्ध होईल.

२) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा वर्तनवादी दृष्टीकोन समजून घेण्यास मदत होईल.

३) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन समजून घेण्यास मदत होईल.

४) राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या मार्क्सवादी दृष्टीकोनाची माहिती समजून घेता येईल.

५) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा वेबरचा दृष्टीकोन समजून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक

एक प्राचीन शास्त्र म्हणून राज्यशास्त्र ओळखले जाते. ग्रीक राजकीय विचारवंत प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून कार्ल मार्क्सपर्यंत अनेकांना राजकीय विचार मांडले आहेत. त्यामुळे राज्यशास्त्राचे विवेचन

करताना राज्यशास्त्राचे प्रामुख्याने दोन कालखंड मानले जातात. त्यामध्ये पहिला कालखंड हा पारंपरिक राज्यशास्त्राचा तर दुसरा कालखंड आधुनिक राज्यशास्त्र हा होय. साधारणतः १८५० च्या अगोदरचा कालखंड हा पारंपरिक राज्यशास्त्राचा कालखंड म्हणून ओळखला जातो. १८५० ते १९५० च्या दरम्यानचा कालखंड हा संक्रमण कालखंड होय. या कालखंडात पारंपारिक राज्यशास्त्राचे रूपांतर आधुनिक राज्यशास्त्रात होण्याची प्रक्रिया सुरू झाली असे मानले जाते. विविध राजकीय विचारवंत ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, ग्रॅहॅम वालास, कार्ल मार्क्स, टॉलकॉट पार्सन्स इ. नी नव-नवीन राजकीय विचार मांडले. त्याचा परिणाम पारंपरिक राज्यशास्त्रावर होऊन आधुनिक राजकीय विश्लेषणाला सुरुवात झाली.

इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणेच आधुनिक राजकीय विश्लेषणांतर्गत वैचारिक क्रांती घडून आली. त्याआधारावर शास्त्रीय दृष्टीकोन स्वीकारून राज्यशास्त्राची पुनर्बांधणी होऊ लागली. त्यातूनच नव-नवीन दृष्टीकोन, सिद्धांत पुढे येऊ लागले. राज्यशास्त्रामध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनाचा स्वीकार करून इतर शास्त्रांच्या अनुषंगाने मांडणी होऊ लागली. समाजशास्त्रज्ञ ऑगस्त कॉम्त, मॅक्स वेबर यांचे सिद्धांत राज्यशास्त्रात स्वीकारण्यात येऊ लागले. त्याचप्रकारे मानसशास्त्रज्ञ 'सिग्मंड फ्राईड' चे सिद्धांत, संकल्पना यांचाही राज्यशास्त्राच्या अभ्यासात समावेश करण्यात आला. त्याचा राज्यशास्त्राच्या अभ्यासात खूपच उपयोग झाला. त्याचपद्धतीने केन्स यांचे अर्थशास्त्रीय सिद्धांत राज्यशास्त्राच्या अभ्यासात समाविष्ट करण्यात आले. हे विचार देखील राज्यशास्त्राच्या अभ्यासात उपयुक्त ठरले. राज्यशास्त्राला १९५० नंतर आधुनिक स्वरूप प्राप्त झाले. कारण डेव्हिड ॲप्टर, रॉबर्ट डाहल, गॅब्रियल आल्मंड इ. विचारवंतांनी आधुनिक पद्धतीने राज्यशास्त्राचा अभ्यास करताना तुलनात्मक पद्धती, मानसशास्त्रीय दृष्टीकोन, आंतरशाखीय दृष्टीकोनाचा स्वीकार राज्यशास्त्राच्या अभ्यासात केला. थोडक्यात आधुनिक पद्धतीने वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारून राज्यशास्त्राचा अभ्यास होऊ लागला. त्याचपद्धतीने आधुनिक पद्धतीने राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याचा एक भाग म्हणून वर्तनवादी क्रांती होऊन 'वर्तनवाद' हा राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक नवा दृष्टीकोन म्हणून पुढे आला.

## २.२ विषय विवेचन

आधुनिक पद्धतीने राज्यशास्त्राचा अभ्यास करताना नव-नवीन दृष्टीकोन पुढे आले त्यापैकी प्रमुख दृष्टीकोन १) वर्तनवादी दृष्टीकोन, २) मार्क्सवादी दृष्टीकोन, ३) वेबरचा दृष्टीकोन यांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. आधुनिक पद्धतीने राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याचा एक भाग म्हणजे वर्तनवादी दृष्टीकोन होय. राजकीय व्यवस्थेचा मार्क्सवादी दृष्टीकोन कालसापेक्ष असून कोणत्याही काळात या दृष्टीकोनाच्या आधारे राजकीय व्यवस्थेचे विश्लेषण व अभ्यास करणे शक्य आहे. तर वेबरचा दृष्टीकोन नैतिक समस्या व सांस्कृतिक संदर्भ विचारात घेऊन शास्त्रीय पद्धतीचा वापर करून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्याचे विचार वास्तववादी वाटतात. सबब प्रस्तुत दृष्टीकोनाचा अभ्यास आधुनिक राजकीय विशलेषणात महत्त्वाचा ठरतो.

### २.२.१ वर्तनवादी दृष्टीकोन (Behavioural Approach)

पारंपरिक राज्यशास्त्राबाबत वाटत असलेल्या असंतोषातून निर्माण झालेली चळवळ म्हणून 'वर्तनवादी दृष्टीकोनाकडे' पाहिले जाते. पारंपरिक राज्यशास्त्राच्या अपुऱ्या अभ्यासातून निर्माण झालेली ही चळवळ होय. पारंपरिक राज्यशास्त्राचा अभ्यास औपचारिक पद्धतीने केला जात असे. राज्य, राजकीय संस्था, संघटना, त्यांची रचना, कार्ये, शासनसंस्था, त्याचे प्रकार इ. चा अभ्यास पारंपरिक राज्यशास्त्रात केला जात असे. पारंपरिक राज्यशास्त्राचे सिद्धांत मूल्याधिष्ठित व वास्तवापासून दूर असे होते. राज्यशास्त्राच्या अभ्यासाची ही पारंपरिक पद्धती होती. त्यामध्ये शास्त्रीय पद्धतीचा अभाव होता. वास्तव परिस्थिती किंवा वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून काही गृहितके प्रमाण मानून मूल्यांधारीत राजकीय संस्था, संघटना इ. चा अभ्यास पारंपरिक राज्यशास्त्रात केला जात होता. तेव्हा पारंपरिक राज्यशास्त्राच्या या एकांगी पद्धतीला विरोध म्हणून वर्तनवादी चळवळ पुढे आली.

राजकीय जीवनात घडत असलेले विविध व्यवहार, प्रक्रिया यांना पारंपरिक राज्यशास्त्रात स्थान नव्हते. राजशास्त्रातील व्यवहार, प्रक्रिया या अखंडपणे सुरू असतात. त्यामुळे त्यांची दखल घेतल्याखेरीज राजकीय जीवन, राज्यशास्त्र यांच्या अभ्यासाला पूर्णत्व प्राप्त होणार नाही. या प्रकारच्या विचारसरणीने 'वर्तनवादी चळवळी'ला आकार दिला. त्यातूनच पुढे राज्यशास्त्राच्या अभ्यासाला एक नवी दिशा, दृष्टीकोन प्राप्त झाला.

२० व्या शतकातील राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा एक प्रमुख दृष्टीकोन म्हणून वर्तनवादाकडे पाहिले जाते. प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवादी दृष्टीकोनाला महत्त्व प्राप्त झाले. वर्तनवादी दृष्टीकोनाचा पाया घालण्याचे काम अमेरिकन राज्यशास्त्राज्ञांनी केले. त्यामुळे वर्तनवादी दृष्टीकोन विकसित करण्याचे श्रेयही अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांना जाते. पारंपरिक राज्यशास्त्रापेक्षा पूर्णतः वेगळ्या असणाऱ्या यादृष्टीकोनामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासपद्धती, व्याप्ती, उद्दिष्टे यामध्ये अमूलाग्र बदल घडून आले. थोडक्यात राज्यशास्त्राला शास्त्रीय व व्यवहारवादी बनविण्याच्या प्रक्रियेतून वर्तनवादाचा विकास झाला.

मानसशास्त्रातील उत्तेजना आणि प्रतिसाद या संकल्पना प्रमाण मानून वर्तनवादी दृष्टीकोनाची मांडणी करण्यात आली. एका समान परिस्थितीत लोकांना समान उत्तेजना दिल्यास त्या समान परिस्थितीत सर्व व्यक्तींचा प्रतिसाददेखील समान स्वरूपाचा असतो असे वर्तनावाद मानतो. हे सूत्र प्रमाण मानून कोणत्या प्रकारच्या परिस्थितीत कोणत्या प्रकारच्या व्यक्तींचे वर्तन कशा प्रकारचे असते याबाबतचे नियम वर्तनवादात तयार केले जातात.

#### वर्तनवादाचा उदय आणि विकास

पारंपरिक राज्यशास्त्राच्या अपुरेपणामुळे वर्तनवादाचा उदय झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने वर्तनवादी दृष्टीकोन विकसित होण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी पहिल्या महायुद्धानंतर सामाजिक शास्त्रामध्ये नव-नवीन अभ्यासपद्धती स्वीकारण्यात येऊन सामाजिक शास्त्रांना इतर नैसर्गिक शास्त्राप्रमाणे शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नातून वर्तनवादी दृष्टीकोन पुढे आला. राज्यशास्त्रामध्ये वर्तनवादी दृष्टीकोन

विकसित करण्याचा सर्वप्रथम प्रयत्न आर्थर बेंटले आणि ग्रॅहम वालास यांनी केला. त्यांनी सर्वप्रथम आपल्या अनुक्रमे The process of Government आणि Human Nature in Politics या ग्रंथात राज्यशास्त्राच्या अभ्यास पद्धतीत बदल करण्याची गरज प्रतिपादीत केली. साधारणतः १९३० नंतर आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनाला महत्त्व प्राप्त झाले. मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय संकल्पना व सिद्धांत यांचा अभ्यास राज्यशास्त्रात होऊ लागला. कारण या विविध शास्त्रांचा संबंध मानवाशी येतो. त्यामुळे मानवी वर्तनाचा अभ्यास करताना विविध शास्त्रांचा आधार हा घ्यावाच लागतो. शिवाय समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र यामध्ये वापरल्या जाणाऱ्या शास्त्रीय संशोधन पद्धतींचा उपयोग राज्यशास्त्र अभ्यासपद्धतीत केला जावा असाही सूर पुढे येऊ लागला. त्यातून राज्यशास्त्राला वास्तववादी, शास्त्रीय, वस्तुनिष्ठ स्वरूप प्राप्त करून देणे प्रयोजित होते. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवादी दृष्टीकोनाला गती प्राप्त झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या समस्यांचे निवारण करण्यासाठी पारंपरिक राज्यशास्त्र अपुरे पडू लागले. युरोपियन राष्ट्रे व दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेली तिसऱ्या जगातील अनेक स्वतंत्र राष्ट्रे यांच्या समस्या, शासनपद्धती, सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती यामध्ये खूपच तफावत होती. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यशास्त्राच्या अध्ययन कक्षा विस्तारीत होणे क्रमप्राप्त होते. अमेरिका, युरोपियन राष्ट्रे यांच्या शासनसंस्था, राजकीय परिस्थिती यांचे अध्ययन करण्याबरोबर आफ्रो-आशियाई देशांच्या एकंदरीत परिस्थितीचा अभ्यास राज्यशास्त्रात होऊ लागला. या अभ्यासातून राज्यशास्त्रात नव-नवीन अभ्यासपद्धती पुढे आल्या. मानवी वर्तनाचा अभ्यास करून वर्तनवादाच्या माध्यमातून शास्त्रीय पद्धतीने राज्यशास्त्राचे अध्ययन करून त्यासंबंधातील भविष्यकालीन भाकिते कथन करता येतात. अशी मांडणी होऊ लागली. अशापद्धतीने वर्तनवादाला राज्यशास्त्राच्या अभ्यासपद्धतीत महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. रॉबर्ट डाहल, डेव्हिड ईस्टन, सिबली इ. नी. वर्तनवादाची राज्यशास्त्रातील उपयोगितेसंबंधी मांडणी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वर्तनवादी दृष्टीकोन हा अल्पावधीतच राज्यशास्त्रातील अध्ययन पद्धतीचा मुख्य भाग बनला.

**वर्तनवादाची वैशिष्ट्ये**

एका समान परिस्थितीत एका समान प्रेरकाने व्यक्तींना जर उद्दीपित केले तर त्यांची प्रतिक्रियादेखील समानच असे वर्तनवाद्यांचे मत आहे. त्यामुळे व्यक्तींच्या राजकीय वर्तनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून समान नियम शोधून काढणे शक्य असल्याचे वर्तनवादी अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्यामुळे वर्तनवादी अध्ययनपद्धती विकसित करून राज्यशास्त्राच्या अभ्यासात शास्त्रशुद्धता, वास्तववाद, अनुभवजन्य दृष्टीकोन, विश्लेषणात्मक पद्धती विकसित करण्याचे काम वर्तनवादी अभ्यासकांनी केले. डेव्हिड ईस्टन यांच्या "The Political System" आणि हेंझ इलो यांच्या 'Political Behaviour : A Reader in Theory and Research" या ग्रंथात वर्तनवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. त्यावरून वर्तनवादासंबंधी काही ठराविक नियम किंवा वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

**१) वर्तनवादाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप :**

व्यक्तीचा समाजातील विविध संस्था, संघटनांशी संबंध येत असतो. त्यामध्ये कुटंबसंस्था, शिक्षणसंस्था, राजकीयसंस्था, विवाह संस्था, धर्मसंस्था इ. अशा विविध संस्थांचा व्यक्तीशी संपर्क येत असतो. या सर्व संस्था, संघटनांचा व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास इ. च्या दृष्टीकोनातून व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. सर्व सामाजिक शास्त्रांचा परस्परांशी संबंध अभ्यासून व्यक्तीच्या वर्तनाशी संबंधित नियम प्रस्थापित करावे लागतात.

थोडक्यात राज्यशास्त्राला शास्त्रीय संशोधन दर्जा प्राप्त करून देण्यासाठी इतर सामाजिक शास्त्रांचा अभ्यास संशोधकांना, अभ्यासकांना करावाच लागतो आणि मानवी वर्तनासंबंधी निष्कर्ष काढावे लागतात. इतर सामाजिक शास्त्रांची मदत घेतल्याखेरीज मानवाच्या राजकीय जीवन, व्यवहार, वर्तन यांचे आकलन होणे शक्य नसते. त्यामुळे वर्तनवादामध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन महत्त्वपूर्ण ठरला आहे.

**२) व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास :**

वर्तनवादामध्ये व्यक्तीच्या वर्तनाचा वस्तुनिष्ठ पद्धतीने अभ्यास करून निष्कर्ष काढले जातात. त्यासाठी निरीक्षण, परिक्षण, गणन, मापन इ. पद्धतीचा वापर केला जातो. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असताना भोवतालच्या सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक इ. घटकांचा प्रभाव पडत असतो. त्यातून व्यक्तीचे वर्तन घडत असते. सामान्यतः प्रेरक, प्रतिसाद या प्रक्रियेतून हे वर्तन उद्दिपित होत असते किंवा घडत असते. त्यामुळे व्यक्तीचा वर्तनाचा अभ्यास करताना अनुभव व वस्तुनिष्ठ याद्वारे काढलेले निष्कर्ष अधिक विश्वासार्ह्य ठरतात.

**३) व्यक्ती वर्तनातील नियमितता :**

व्यक्तींच्या राजकीय वर्तनाची बारकाईने चिकित्सा केल्यास त्यामध्ये एकसारखेपणा, नियमितता किंवा वारंवारिता दिसून येते. उदा. भारतातील मुस्लीम मतदार धर्मनिरपेक्षता या विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षाला आपली मते देतात. तसेच देशातील गरिब, कष्टकरी जनतेचा डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षाकडे कौल असलेला दिसून येतो. तर मध्यमवर्गीय जनता व श्रीमंत लोक अनुक्रमे कल्याणकारी राज्याचा पुरस्कार करणाऱ्या व भांडवलवादाचा पुरस्कार करणाऱ्या राजकीय पक्षांना आपला पाठिंबा देताना दिसतात. इतकेच नव्हे तर जात, धर्म इ. घटकांनी प्रभावी झालेल्या व्यक्तींच्या वर्तनात सारखेपणा दिसतो. त्यामुळे व्यक्तींच्या राजकीय वर्तनातील सारखेपणा, नियमितपणा किंवा वारंवारिता यावरून निष्कर्ष काढणे शक्य आहे असे वर्तनवादी पुरस्कर्त्यांचे मत आहे.

**४) पडताळा :**

वर्तनवादी अभ्यासकांनी मानवी वर्तनाविषयी केलेल्या सिद्धांताची किंवा निष्कर्षांची सत्यासत्यता तपासून पाहणे आवश्यक असते. त्यासाठी विविध पद्धती उदा. निरिक्षण, प्रयोग, अनुभव याद्वारे वर्तनवादी

सिद्धांताचा पडताळा घेतात. निष्कर्ष पुराव्याच्या आधारे सिद्ध झाले तर त्यांना अधिकृतपणे मान्यता मिळते. थोडक्यात संशोधकाने शास्त्रीय पद्धनीने केलेले सिद्धांत व निष्कर्ष यांची सत्यासत्यता जाणून घेण्यासाठी पडताळा घेणे आवश्यक असते.

### ५) मूल्यनिरपेक्षता :

वर्तनवादी संशोधक संशोधनात मूल्यांना स्थान देत नाही. मूल्यनिरपेक्ष संशोधनाचा ते आग्रह धरतात. मूल्य व तथ्य या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे संशोधन हे मूल्यनिरपेक्ष व वस्तुनिष्ठ असावे. त्यांची संशोधकांनी एकत्रित गल्लत करू नये. आत्मनिष्ठ स्वरूपाच्या असणाऱ्या मूल्यापासून संशोधकाने जाणीवपूर्वक दूर राहिले पाहिजे. मूल्यांची योग्य-अयोग्यता वैज्ञानिक कसोट्यावर सिद्ध करणे कठीण असल्याने संशोधकाने त्यापासून अलिप्त रहावे व संशोधन करावे. मूल्यांचे मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण स्थान लक्षात घेऊन प्रारंभीच त्यांचा उल्लेख संशोधनात करावा. त्यामुळे इतर अभ्यासकांना त्यांचे पुनर्निरिक्षण करणे शक्य होईल असे वर्तनवाद्यांचे म्हणणे आहे.

### ६) व्यवस्थितपणा (पद्धतीकरण)

वर्तनवादी संशोधकांचे मते, संशोधनात कार्यकारण संबंधांच्या माध्यमातून सिद्धांत प्रस्थापित करणे शक्य आहे. गृहितकाच्या आधारे माहितीचे संकलन करून सिद्धांतांची मांडणी करता येते. त्यासाठी संशोधनात व्यवस्थितपणा किंवा शिस्त आवश्यक आहे. माहितीचे संकलन, विश्लेषण, सामान्यीकरण इ. वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून राज्यशास्त्रीय संशोधनात सिद्धांताची मांडणी केली जाते. पुराव्यांच्या आधारावर सत्य ठरलेले गृहितक त्यांची वारंवार चाचणी होऊन त्याची त्यासंदर्भातील विशवासार्हता सिद्ध केली जाते. किंवा त्यासंदर्भात सिद्धांत केले जाते. थोडक्यात नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच अध्ययन पद्धती किंवा शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करून राज्यशास्त्रात देखील मांडणी केल्यास त्यासदेखील नैसर्गिक शास्त्राप्रमाणे महत्त्व प्राप्त होईल असे वर्तनवाद्यांना वाटते.

### ७) परिमाणन (Quantification)

वर्तनवादात मानवाच्या राजकीय वर्तनाचे परिमाणीकरण किंवा मोजमाप केले जाऊ शकते असा दावा वर्तनवादी अभ्यासक करतात. पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांच्या मते सांख्यिकी पद्धतीचा वापर करणे वर्तनवादात कठीण असते. कारण सामाजिक शास्त्रे मूल्याधिष्ठित असतात. त्यामुळे अशा मूल्याधिष्ठित संशोधनाचे गणितीय पद्धतीने मोजमाप करणे कठीण असते. मात्र परिमाणीकरणासाठी आज अनेक पद्धती विकसित झाल्या आहेत. अचूक निष्कर्ष प्राप्त होण्यासाठी संख्याशास्त्रीय पद्धतीन वापरणे आवश्यक असते. त्यामुळे विश्वासार्ह्य निष्कर्षासाठी वर्तनवादी संशोधकांनी संख्याशास्त्रीय परिमाणनाचा मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. मानवाच्या राजकीय वर्तनाचे संख्यात्मक पद्धतीने विश्वेषण करणे कठीण आहे. तरी निरिक्षणतंत्राचा वापर करून संख्याशास्त्रीय पद्धतीने त्यासंदर्भात मांडणी करता येते. तसेच सदर संख्याशास्त्रीय निष्कर्षाची पुन्हा पुन्हा पडताळणी करून त्यासंदर्भातील सत्यता, नेमकेपणा, निश्चितता, अचूकता प्राप्त करता येते.

### ८) संशोधन तंत्रे / पद्धती :

वर्तनवादी अभ्यासकांनी संशोधनाच्या विविध अभ्यासपद्धती किंवा तंत्रे शोधून काढली. त्या आधारावर नमुना निवड, मुलाखत, निरिक्षण, सर्वेक्षण पद्धती इ. पद्धतीचा संशोधनांमध्ये वापर करून संशोधन वस्तुनिष्ठ, मूल्यविरहीत होऊ शकते असा दावा केला. मात्र पारंपरिक राज्यशास्त्रज्ञांच्या मते तांत्रिक पद्धतीने देखील राजकीय वर्तनाबाबत राज्यशास्त्रात नेमकेपणाने अचूक माहिती मिळविणे कठीण असते. यासंदर्भात या टिकेला उत्तर देताना वर्तनवादी अभ्यासकांचे म्हणणे असे आहे की, माहिति मिळविणे जरी कठीण असले तरी बारकाईने अगदी काळजीपूर्वक निरीक्षण, परिक्षण करून अचूक माहिती मिळविणे शक्य आहे. त्यामुळे माहितीचे संकलन, विश्लेषण इ. साठी वर्तनवादी अभ्यासकांनी नैसर्गिक शास्त्राप्रमाणे शास्त्रीय संशोधन पद्धती किंवा तंत्राचा वापर करून संशोधनात निश्चितता, अचूकता आणण्याचा प्रयत्न केला.

### ९) शास्त्रशुद्धता :

शुद्ध शास्त्रात काळाच्या कसोटीवर टिकणाऱ्या सिद्धांताची मांडणी होत असते. त्याच पद्धतीने राज्यशास्त्रालादेखील त्रिकालबाधीत सिद्धांत शोधून काढले पाहिजेत. त्या सिद्धांताच्या साह्याने सामाजिक, राजकीय समस्यांची उकल करता आली पाहिजे. शुद्ध संशोधनाच्या माध्यमातून राज्यशास्त्राला शास्त्रीय दर्जा प्राप्त करून देण्याची गरज वर्तनवादी प्रतिपादीत करतात. काळाच्या कसोटीवर टिकणारे संशोधन राज्यशास्त्रज्ञांनी हाती घ्यावे अशी अपेक्षा वर्तनवादी अभ्यासक व्यक्त करतात.

### वर्तनवादाच्या मर्यादा :

पारंपारिक राज्यशास्त्रातील अपुरेपणा, मर्यादा यातून 'वर्तनवादी चळवळ' सुरू झाली. राज्यशास्त्राला शास्त्रीय स्वरूप, वस्तुनिष्ठता मिळवून देण्याचा प्रयत्न वर्तनवाद्यांनी केला. परंतु यातून वर्तनवाद्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे वर्तनवादाच्या मर्यादा. सामान्यतः वर्तनवादाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे विशद करता येतील.

### १) संशोधकाची तटस्थ भूमिका :

संशोधनाची शास्त्रीयता, अचूकता, वस्तुनिष्ठता ही संशोधकाच्या भूमिकेवर अवलंबून असते. संशोधकाने पूर्वगृहित दृष्टीकोनापासून दूर असले पाहिजे. तसेच त्याने तटस्थपणे राहून निष्पक्षपातीपणे संशोधन केले पाहिजे. स्वतःची मूल्ये, विचार, मते संशोधनापासून दूर ठेवली पाहिजेत. तरच निष्कर्ष शास्त्रीय व वस्तुनिष्ठ स्वरूपाचे प्राप्त होऊ शकतील.

### २) संपूर्ण वस्तूनिष्ठतेचा अभाव :

राज्यशास्त्रीय संशोधनात संशोधक संपूर्णतः निष्पक्षपणे संशोधन करू शकत नाही. व्यक्तीच्या मनोप्रवृत्तीवर सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. त्यातून व्यक्तीचे वर्तन घडत असते. त्यामुळे संशोधकाला पूर्णपणे वस्तुनिष्ठ किंवा निष्पक्ष राहणे शक्य नसते. त्यामुळे या मर्यादा लक्षात घेऊन व्यक्तीच्या वर्तनाचे विश्लेषण करावे लागते.

### ३) शास्त्रीयकरण अशक्य :

वर्तनवादी अभ्यासक व्यक्तीच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास करतात. शास्त्रीय पद्धतीने संशोधन करून राज्यशास्त्रीय सिद्धांत वस्तुनिष्ठपणे व निष्पक्षपातीपणे मांडणाऱ्यावर त्यांचा भर असतो. मात्र नैसर्गिक शास्त्राप्रमाणे प्रयोगशाळेत बसून व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करता येणार नाही. मुलाखत तंत्राचा वापर केला तर व्यक्ती सर्वच खरी माहिती सांगणार नाही. आपल्या आयुष्यातील अप्रिय भाग ती लपवू शकते. तसेच मतदानासाठी जी आर्थिक देवघेव होते त्यासंदर्भातही ती व्यक्ती मौन बाळगण्याची शक्यता असते. त्यामुळे असत्य, चुकीची माहिती यामुळे संशोधनात विश्वासार्हयता राहणार नाही. मानवी मन चंचल असते. त्यामुळे मानवी वर्तनाबाबत ठोस, निश्चित सिद्धांत मांडता येणार नाही. त्यामुळे नैसर्गिक शास्त्राप्रमाणे राज्यशास्त्राला भारतीय दर्जा प्राप्त करून देण्यामध्ये अनेक मर्यादा आहेत.

### ४) साध्यापेक्षा साधनाला अतिमहत्त्व :

राज्यशास्त्राला नैसर्गिक शास्त्राप्रमाणे शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्याच्या वर्तनवादी अभ्यासकांच्या भूमिकेमुळे नवनवीन अध्ययन पद्धती, तंत्रे शोधून काढण्याकडे अभ्यासकांचा कल राहिला. त्यामुळे संशोधनाच्या माध्यमातून व्यवहारोपयोगी, समाजोपयोगी सिद्धांत, निष्कर्ष मांडणे हा प्रधान हेतू मागे पडला. वर्तनवादी अभ्यासकांनी साध्यापेक्षा साधनाला महत्त्व दिल्याने महत्त्वाच्या राजकीय प्रश्नाकडेही दुर्लक्ष झाले. शिवाय कितीही अद्यावत पद्धती विकसित केल्या तरी मानवी वर्तनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करता येणार नाही ही मर्यादाही वर्तनवादी संशोधकांनी लक्षात घेतली पाहिजे.

### ५) मूल्यनिरपेक्ष संशोधन अशक्य :

राज्यशास्त्रामध्ये वर्तनवादी संशोधक मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरतात. वर्तनवादाचा प्रमुख आधार म्हणून मूल्यनिरपेक्षतेकडे पाहिले जाते. मात्र संपूर्ण मूल्यनिरपेक्षता राज्यशास्त्रात शक्य नाही. कारण कळत-नकळतपणे मानवी विचार, कृती इ. चा प्रभाव संशोधनावर पडतोच.

### ६) नैसर्गिक शास्त्राशी तुलनेतील मर्यादा :

वर्तनवादी अभ्यासकांनी राज्यशास्त्राला शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी वेगवेगळ्या अध्ययन पद्धती, तंत्रे विकसित केली. मात्र राज्यशास्त्र हे सामाजिक शास्त्र असून त्यामध्ये मानवाच्या राजकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो. मानवी वर्तनातील चंचलता पाहता ठोस निष्कर्ष काढणे शक्य नाही. त्यामुळे नैसर्गिक शास्त्रामध्ये राज्यशास्त्रात शास्त्रीयता, वस्तुनिष्ठता आणण्याचा अट्टाहास अनाठायी आहे.

### ७) आंतरविद्याशाखीय स्वरूपाची मर्यादा :

वर्तनवादी अभ्यासकांनी आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनाचा स्वीकार केला. त्यातून विविध सामाजिक शास्त्रांचा राज्यशास्त्राच्या संदर्भात अभ्यास होऊ लागला. इतर शास्त्रांचा अतिरेक राज्यशास्त्रात झाला की, त्याच्या प्रभावातून राज्यशास्त्र स्वतःचे अस्तित्व हरवत चालला आहे का? अशी भीती निर्माण झाली.

वरीलप्रमाणे वर्तनवादी दृष्टीकोनाच्या मर्यादा दिसून येत असल्या तरी वर्तनवाद हा प्राथमिक अवस्थेत असल्याने त्यामध्ये मर्यादा असल्याचे वर्तनवादी अभ्यासक स्पष्ट करतात. मात्र वर्तनवादी दृष्टीकोनाच्या अनेक जमेच्या बाजूही आपल्याला सांगता येतील. जसे वर्तनवादाने संशोधनाच्या अनेक अभ्यासपद्धती, तंत्रे विकसित केली. शास्त्रीय पद्धतीने वस्तुनिष्ठ संशोधन करण्यावर भर दिला. मूल्यविरहीत संशोधनाचा आग्रह धरला, राज्यशास्त्राच्या अभ्यासाला नवी दृष्टी प्राप्त होऊन एक नवी दिशा प्राप्त झाली. हे वर्तनवादी दृष्टीकोनाचे योगदान नाकारता येणार नाही.

**उत्तरवर्तनवाद / उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन** (Post-bahaviouralism/Post-Behavioural Approach) **:**

राज्यशास्त्रात खूप गाजावाजा करून वर्तनवादी चळवळ प्रामुख्याने १९५० ते ६० या दशकात झाली. परंतु वर्तनवादी दृष्टीकोनाच्या मर्यादा हळूहळू पुढे येऊ लागल्या जसे. वर्तनवादी संशोधकांनी विविध अभ्यासपद्धती, तंत्रे शोधून काढली ती स्वीकारणे राज्यशास्त्राला शक्य झाले नाही. तसेच राज्यशास्त्रातील प्रमुख प्रश्नाकडे दुर्लक्ष होऊन दुय्यम प्रश्नांना प्राधान्य मिळाले. वर्तनवादी अभ्यासकांनी संशोधनासाठी माहितीचे संकलन, विश्लेषण करून काही निष्कर्ष किंवा सिद्धांताची मांडणी केली. मात्र हे सिद्धांत निरूपयोगी ठरले. वर्तनवादी संशोधकांनी नैसर्गिक शास्त्राप्रमाणे राज्यशास्त्राला शास्त्रीय दर्जा देण्याचा परिपूर्ण प्रयत्न केला. त्यासाठी वस्तुनिष्ठता, शास्त्रीय दृष्टीकोन, मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरला. परंतु आत्यांतिक वस्तुनिष्ठतेच्या आग्रहामुळे वर्तनवादाच्या अभ्यासात गोंधळ निर्माण झाला. वर्तनवादी चळवळीच्या या मर्यादा, उणीवा वर्तनवादोत्तर क्रांती वा उत्तर वर्तनवादाच्या उदयास कारणीभूत ठरल्या.

१९७० नंतर प्रामुख्याने वर्तनवादी दृष्टीकोनाचा प्रभाव कमी होण्यास सुरुवात झाली आणि वर्तनवादात सुधारणा करणे गरजेचे आहे अशी मांडणी होऊ लागली. थोडक्यात असे लक्षात येते की पारंपारिक राज्यशास्त्राच्या अपुरेपणातून वर्तनवादी चळवळीचा उदय झाला तर वर्तनवादी चळवळीच्या उणीवा, मर्यादा, असंतोष यातून उत्तरवर्तनवादाचा उदय झाला. वर्तनवादावर जी टिका झाली, आक्षेप घेण्यात आले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी राज्यशास्त्र अभ्यासकांचा एक गट पुढे आला. या अभ्यासकांनी वर्तनवादातील दोषांचे निराकरण करण्यासाठी राज्यशास्त्रामध्ये जी वैचारिक क्रांती घडवून आणली तिला वर्तनवादोत्तर क्रांती किंवा उत्तरवर्तनवाद या नावाने ओळखले जाते. उत्तरवर्तनवादाचा प्रमुख पुरस्कर्ता म्हणून 'डेव्हिड ईस्टन' याच्याकडे पाहिले जाते. त्याचबरोबर अरेंडट, बट्रॉंड जोव्हेनील, मायकेल ऑकशॉट, लिओ स्टॉस, मलफोर्ड सिबले, हेदेखील उत्तरवर्तनवादाचे प्रमुख समर्थक म्हणून ओळखले जातात. वास्तविक वर्तनवादी दृष्टीकोनाचा पुरस्कर्ताही डेव्हिड ईस्टन होय. जवळपास त्याने सलग १० वर्षे वर्तनवादाचा पुरस्कार केला पण त्यातून फारशी फलप्राप्ती झाली नाही हे लक्षात आल्यानंतर त्याने १९६९ च्या अमेरिकन पोलिटिकल सायन्स असोसिएशन्सच्या अध्यक्षीय भाषणात त्यासंदर्भातील खंत व्यक्त केली. त्याच्या मते, वर्तनवादी अभ्यासकांनी वेळ, पैसा आणि शक्ती खर्च करून अध्ययनाच्या विविध पद्धती, तंत्रे विकसित केली. मात्र याचा वापर प्रमुख प्रश्न सोडविण्यासाठी न करता दुय्यम समस्या सोडविण्यासाठीच करण्यात आला. तसेच या संशोधनातून पुढे आलेले सिद्धांत, निष्कर्ष अप्रस्तुत, निरुपयोगी ठरले. राज्यशास्त्राच्या अभ्यासात फारसे योगदान देणारे किंवा उपयुक्त ठरले नाहीत. त्यामुळे या प्रमुख उणीवा, दोष, यांचे निराकरण करण्यासाठी

उत्तरवर्तनवादी चळवळ सुरू झाली. उत्तरवर्तनवादाचे जनकत्व डेव्हिड ईस्टन याच्याकडे जाते. त्याने उत्तरवर्तनवादी दृष्टीकोनाची मांडणी सात सुत्रांच्या साह्याने केली.

१) वर्तनवादी अभ्यासकांनी साध्यापेक्षा साधनाला महत्त्व दिले. त्यामुळे उत्तरवर्तनवादी संशोधकांनी साधनापेक्षा अर्थपूर्ण संशोधनाला महत्त्व द्यावे असा विचार पुढे आला.

२) वर्तनवादी अभ्यासक स्थितीवादी बनले. त्यामुळे परिवर्तनापेक्षा त्यांनी स्थैर्याला महत्त्व दिले. परिणामी हे संशोधन प्रतिगामी ठरले. त्यामुळे बदलत्या परिस्थितीत मानवाचे राजकीय वर्तन ते प्रगतीला कसे पोषक ठरते यांचा अभ्यास राज्यशास्त्रज्ञांनी करावा असे सुचविले.

३) वर्तनवादी संशोधकांनी वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अमूर्त विश्लेषणात ते मग्न झाले. महत्त्वाच्या प्रश्नांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले व दुय्यम, गौण प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्राधान्य दिले गेले. त्यामुळे राज्यशास्त्राने मानवी जीवनातील तीव्र, भयग्रस्त प्रश्नांची दखल घेऊन त्यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केले पाहिजेत.

४) वर्तनवादी अभ्यासकांनी मूल्यनिरपेक्ष संशोधनाचा आग्रह धरला तर उत्तरवर्तनवाद्यांनी मूल्यनिरपेक्ष संशोधनाचा आग्रह धरला तर उत्तरवर्तनवाद्यांनी राज्यशास्त्र अध्ययनात मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांनी मूल्यसापेक्ष संशोधन करून मूल्यांना केंद्रस्थानी स्थान असावे असा विचार मांडला.

५) वर्तनवादी संशोधकांनी आपले सामाजिक उत्तरदायित्त्व किंवा जबाबदारी ओळखून आपली तटस्थ भूमिका सोडून संशोधन केले पाहिजे. सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी संशोधन केले पाहिजे. यावर उत्तरवर्तनवादी भर देतात.

६) राज्यशास्त्रीय संशोधक कृतीशील संशोधनाचा पुरस्कार करतात. संशोधकाने आपली जबाबदारी ओळखून संशोधन निष्कर्षाचा उपयोग नवसमाजनिर्मितीसाठी केला पाहिजे.

७) संशोधन मंडळे, संस्था आणि विद्यापीठे यांनी स्वतःला सामाजिक, राजकीय प्रश्नांपासून अलग ठेवू नये. त्यांनी आपले सामाजिक उत्तरदायित्त्व लक्षात घेऊन विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भूमिका घेणे गरजेचे आहे.

वर्तनवादाच्या अपुरेपणामुळे उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन पुढे आला. या दृष्टीकोनाने राज्यशास्त्राच्या अभ्यासपद्धतीस एक नवीन स्वरूप प्राप्त करून दिले. असे असले तरी वर्तनवादोत्तर क्रांती किंवा उत्तर वर्तनवादावर पुढील आक्षेप घेतले जातात.

**उत्तरवर्तनवादी दृष्टीकोनावरील प्रमुख आक्षेप :**

उत्तरवर्तनवादावर प्रामुख्याने पुढील आक्षेप घेतले जातात.

१) उत्तरवर्तनवादामध्ये निष्कर्षावर अधिक भर दिल्याने अभ्यासपद्धती सदोष राहण्याची शक्यता आहे. पूर्वग्रहित दृष्टीकोनातून मांडणी झाल्यास चुकीचे निष्कर्ष ठरण्याची, निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यात शास्त्रीयता पूर्ण अंशाने असेल का ? अशी शंका उपस्थित होते.

२) आजच्या काळात सामाजिक व राजकीय समाजापुढील प्रश्न जसे विषमता, वंशवाद, वंशभेद, अराजकता, बंड यांची सोडवणूक करण्यात उत्तरवर्तनवादाला यश आले नाही.

३) उत्तरवर्तनवादी अभ्यासकांनी काढलेले निष्कर्ष गुंतागुंतीचे, अस्पष्ट असल्याने उत्तरवर्तनवादाची दिशा स्पष्ट किंवा निश्चित नसल्याचे दिसते.

४) उत्तरवर्तनवादाची मांडणी लक्षात घेता वर्तनवादाला विरोध करणे इतक्या मर्यादित भूमिकेतून उत्तरवर्तनवादाची मांडणी झाली का? असा प्रश्न पडतो.

५) उत्तरवर्तनवाद्यांनी मूल्याधिष्ठित दृष्टीकोन स्वीकारला तसेच तथ्याचाही आग्रह धरल्याने सैद्धांतिकदृष्ट्या उत्तरवर्तनवादात अंतर्विरोध निर्माण झालेला दिसतो.

### २.२.२ मार्क्सवादी दृष्टीकोन

पारंपरिक आणि आधुनिक या दोन्ही दृष्टीकोनापेक्षा पूर्णतः भिन्न असणारा दृष्टीकोन म्हणजे मार्क्सवादी दृष्टीकोन होय. १८४८ साली 'कम्युनिस्ट मॅनीफेस्टो' या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर मार्क्सवादी दृष्टीकोन मांडला गेला म्हणजेच तो पारंपरिक दृष्टीकोनाच्या कालखंडात मांडला गेला असला तरीही या दृष्टीकोनाला काळाच्या मर्यादा नाही. कार्ल मार्क्स आणि फेडरिक एंजल्स याने मूलतः हा दृष्टीकोन मांडला असला तरी यानंतरच्या मार्क्सवादी विचारवंतांनी यामध्ये मोलाची भर घातली आहे. त्यामुळे काळाच्या कसोटीवर आजही हा दृष्टीकोन टिकून आहे. पारंपरिक आणि आधुनिक दृष्टीकोनापेक्षा मार्क्सवाद पूर्णतः वेगळा असून त्याचे आकलन या दोन्ही दृष्टीकोनाच्या संदर्भात न करता स्वतंत्रपणे करण्याची आवश्यकता आहे.

डेव्हिड ईस्टन, ग्रॅबियल आल्मंड यासारखे विचारवंत राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्याला महत्त्व देतात मात्र मार्क्सवादी विचारवंत राजकीय व्यवस्थेच्या स्थैर्याला महत्त्व न देता राजकीय व्यवस्था विलय कशी पावेल आणि राज्यविहीन आणि वर्गविहिन समाज कसा निर्माण होईल यावरच प्रामुख्याने भर देतात. तसेच आधुनिक दृष्टीकोनाचे प्रवर्तक राजकीय व्यवस्थेच्या आणि पर्यायाने जगाचे विश्लेषण करण्यामध्ये धन्यता मानतात. याउलट मार्क्सवादी मात्र व्यवस्था आणि पर्यायाने जग पूर्णतः बदलण्याचा संकल्प सोडतात.

मार्क्सवादी दृष्टीकोन पूणर्तः शास्त्रीय असून प्रागतिक आहे. या दृष्टीकोनाने समाजाचे ऐतिहासिक दृष्टीकोनातून विश्लेषण केले आहे. इतिहासातील बदलते टप्पे वर्गीय संघर्षाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यायोगे राजकीय व्यवस्थेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीकोनाने राज्यसंस्था या संकल्पनेकडे पूर्णतः वेगळ्या दृष्टीकोनातून पाहिले आहे. राज्याचा उदयच मुळी वर्गीय संघर्षाची अपरिहार्य परिणती म्हणून बघितली गेली आहे. राज्य हे वरिष्ठ वर्गाच्या हातातील पिळवणूकीचे एक साधन असून त्याद्वारे 'नाही रे' वर्गाची पिळवणूक केली जाते आणि म्हणूनच राज्याला मार्क्सवादी

दृष्टीकोन पिळवणुकीचे साधन मानतो. मार्क्सवाद्याच्या मते, राज्याचा जेंव्हापासून उदय झाला तेव्हापासून राज्य 'आहे रे' वर्गाच्या हातातील पिळवणुकीचे साधन राहिले आहे. म्हणूनच मार्क्सवादी दृष्टीकोनाने राज्याचा विलय हे अंतिम ध्येय मानले आहे. राज्याचा विलय झाल्यानंतर जी वर्गविहिन आणि राज्यविहिन समाजरचना प्रस्थापित होईल तेथे पिळवणुकीला वाव असणार नाही. अशी समाजरचना निर्माण करणं हे मार्क्सवाद्यांचे अंतिम ध्येय आहे. मार्क्सवादी दृष्टीकोनाने आपली चर्चा, व्यवस्था, उपव्यवस्था, संरचना, कार्ये यापुरती मर्यादित न ठेवता व्यवस्थेच्या मूळाशी जाण्याचा प्रयत्न केला आहे. मार्क्स आणि एंजल्सने इतिहासाचे चार महत्त्वाचे टप्पे मांडले आहेत.

### १) प्राचीन साम्यवाद (आदिम अवस्था)

या कालखंडामध्ये मानवाचे जगणे हे निसर्गावर, वन्य प्राण्यांवर अवलंबून होते. एकत्र शिकार करणे आणि मिळालेलं सर्वांनी वाटून खाणं अशी व्यवस्था त्या काळात होती. हळूहळू शेतीचा, बीजांचा शोध लागला त्यातून तो शेतीचे उत्पादन होऊ लागला. परंतु हे उत्पादनही सर्वांनी मिळून वाटून घ्यायचे, मूलांचे संगोपन सर्वांनी करावयाचे अशी व्यवस्था होती. त्यावेळी राज्यसंस्थेची आवश्यकता नव्हती.

### २) गुलामगिरीचा कालखंड :

माणसाला शेतीचा शोध लागल्यानंतर माणूस अधिकाधिक उत्पादन घेऊ लागला. त्यातून अधिकाधिक उत्पादन मिळू लागले. ज्या जमिनीतून हे उत्पादन घ्यायचं ती जमीन, ज्या पशूंच्या साह्याने हे उत्पादन घ्यायचे ते पशू यांच्या मालकीचा प्रश्न निर्माण झाला आणि त्यातूनच खाजगी संपत्तीचा उदय झाला. या काळात पशू व जमीन यावर मालकी असणारा आहे रे चा एक वर्ग निर्माण झाला आणि समाज दोन वर्गात विभागला गेला. स्वामी आणि गुलाम. उत्पादनाच्या आणि वितरणाच्या साधनावर मालकी असणारा आहे रे वर्ग आणि मालकी नसणारा गुलामांचा वर्ग (नाही रे वर्ग). वैयक्तिक संपत्ती किंवा मालकी हक्क आणि त्यातून संपत्तीचे रक्षण करण्यासाठी उदयाला आलेली राज्यसंस्था असे टप्पे राज्याच्या उदयासंदर्भात मार्क्सवादी विश्लेषणात सापडतात.

### ३) सरंजामशाहीचा कालखंड :

शेतीच्या उत्पादनाच्या साधनामध्ये हळूहळू बदल होऊ लागला. अधिक चांगल्या हत्यारांच्या साह्याने माणूस शेती करू लागला. मोठमोठ्या जमिनीचा तो मालक होऊ लागला. या जमिनीची मालकी असणारा सरंजामदार आणि या जमिनीवर कसणारा कष्टकरी मजूर ज्याच्याकडे उत्पादनाच्या साधनाची मालकी नाही असा वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले. या दोन वर्गामध्ये ही संघर्ष कायम राहिला. या कालखंडात उत्पादनाचे साधन बदललं म्हणजे शेती हे प्रमुख साधन असलं तरी ही शेती विकसित साधनांचा साह्याने केली जाऊ लागली. या बदलत्या उत्पादनाच्या साधनामुळे वर्ग बदलले त्यांच्यातील संघर्ष बदलला म्हणजेच मार्क्सवादी दृष्टीकोनातून विचार करता उत्पादनाच्या साधनात बदल झाल्यानंतर वर्ग आणि वर्गसंघर्ष बदलतो. हा संघर्ष एवढ्यापुरताच मर्यादीत नसतो तर तो बदल पर्यायाने व्यवस्थेच्या इतर घटकांत बदल घडवून आणतो. उदा. धर्म, संस्कृती इ.

### ४) भांडवलशाहीचा कालखंड :

माणसाच्या बौद्धिक उत्क्रांतीमध्ये चौथा टप्पा अमूलाग्र बदल घडवून आणणारा ठरला. औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाची साधने बदलली. आता उत्पादन शेती किंवा हस्तउद्योग यापुरतं मर्यादित न राहता कारखान्यांमधून उत्पादन होऊ लागलं. उत्पादनाच्या या बदलत्या साधनांमुळे वर्गीय रचनेमध्ये बदल झाला. उत्पादन साधनांची मालकी ज्यांच्यांकडे आहे तो आहे रे आणि उत्पादन साधनांची मालकी नसणारा नाही रे असे दोन वर्ग समाजात निर्माण झाले. यांच्यातील वर्गीय संघर्ष बदलला आणि पर्यायाने व्यवस्थेच्या इमारतीमध्ये म्हणजे कला, साहित्य, संस्कृती, धर्म इ. मध्येही बदल घडून आला.

मार्क्सने इतिहासाचे केलेले हे विश्लेषण भौतिकवादी आहे. कारण त्याने समाजाच्या बदलत्या कालखंडाचे आर्थिक घटकाच्या आधारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. या विश्लेषणाच्या आधारे राजकीय व्यवस्थेचा उदय केंव्हा झाला. समाजामध्ये बदल कसे होत गेले याचे विश्लेषण तर होतेच पण त्याहीपेक्षा उत्पादनाच्या साधनामध्ये झालेला बदल पर्यायाने वर्गीय रचनेच्या संघर्षाच्या बदलाला कसा कारणीभूत ठरतो हे शास्त्रीयदृष्ट्या विशद करण्याचा प्रयत्न केला. त्याचे हे विश्लेषण केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नसून त्याने उत्पादनाच्या साधनांना (आर्थिक घटकांना) पाया असे संबोधले आहे. उत्पादनाच्या साधनामध्ये झालेल्या बदलांच्या परिणामी सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच प्रक्रियांमध्ये बदल होत असतो. म्हणजे इमारतीमध्ये बदल होतात असे मार्क्सवादी दृष्टीकोन मांडतो.

आधुनिक राज्यशास्त्रात राजकीय व्यवस्थांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास करताना व्यवस्था दृष्टीकोन किंवा रचनात्मक कार्यवाही दृष्टीकोनाच्या प्रवर्तकांनी ज्या पद्धतीने राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केला त्यापेक्षा भिन्न पद्धतीने मार्क्सवादी दृष्टीकोनाने राजकीय व्यवस्थेची मांडणी केली. त्याने राजकीय व्यवस्थेचे भिन्न प्रारूप मांडले. अंतिमतः मार्क्सवाद्यांना राज्य विलय पावून राज्यविहीन आणि वर्गविहीन समाजरचना निर्माण करावयाची आहे. मार्क्सचा हा दृष्टीकोन कालसापेक्ष असून कोणत्याही काळात या दृष्टीकोनाच्या आधारे राजकीय व्यवस्थेचे विश्लेषण आणि अभ्यास करणे शक्य आहे.

अशारितीने आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात मार्क्सवादी दृष्टीकोनाला एक स्वतंत्र जागा किंवा स्थान आहे. कालानुरूप या दृष्टीकोनामध्ये काही बदल निश्चितच झाले आहेत. विविध विचारवंतांनी या दृष्टीकोनात भर घातली असली तरी त्याचा गाभा कायम राहिला आहे.

## २.२.३ वेबरचा दृष्टीकोन :

इ.स. १८६४ ते १९२० हा मॅक्स वेबरचा कालखंड होय. समाजशास्त्रातील एक प्रमुख अभ्यासक म्हणून तो ओळखला जातो. प्रामुख्याने समाजशास्त्रज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मॅक्स वेबरने समाजशास्त्राबरोबर राज्यशास्त्राच्या अध्ययनातही मोलाचे योगदान दिले आहे. त्याने आपल्या अभ्यासात समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांचा सुरेख समन्वय साधला आहे. मॅक्स वेबरने राजकीय विश्लेषण करताना नैतिक समस्या व सांस्कृतिक संदर्भ विचारात घेऊन शास्त्रीय पद्धतीचा वापर करून समस्या सोडविण्याचा

प्रयत्न केला. त्यामुळे त्याचे राजकीय विचार वास्तववादी वाटतात. सामाजिकशास्त्राचा अभ्यास करताना प्रामुख्याने पुढील बाबींवर भर दिला जावा असे वेबरचे मत होते.

१) संशोधकाने काय असावे अशी मांडणी करण्यापेक्षा काय आहे यावर भर द्यावा.

२) मानवी संबंधांचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करताना तो आदर्शविरहित असावा.

३) मानवी समूहातील सामाजिक, सांस्कृतिक आंतरक्रियांचे शास्त्रशुद्ध विवेचन करावे.

४) संशोधकाने विश्लेषणात मूल्यविरहित दृष्टीकोनाला प्राधान्य द्यावे.

५) सामाजिक प्रक्रियांमध्ये दिसून येणाऱ्या घटनाक्रमांचे सकारण अध्ययन करावे.

**अध्ययन पद्धतीतील शास्त्रशुद्धता :**

सामाजिक शास्त्रातील शास्त्रशुद्ध अध्ययन पद्धतीचे जनकत्व मॅक्स वेबरकडे जाते. कारण मानवी समाजातील क्रियांचे अध्ययन करताना शास्त्रीय पद्धतींचा अवलंब केला जावा असा आग्रह त्याने धरला. नैसर्गिक शास्त्रामध्ये शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करता येतो. त्यापद्धतीने सामाजिक शास्त्राच्या अध्ययनात शास्त्रीय अध्ययन पद्धतींचा अवलंब करता येते हे त्याने सप्रमाण सिद्ध करून दाखवले. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील शास्त्रीय अध्ययन पद्धतीचा जनक म्हणून वेबर ओळखला जातो.

वेबरच्या मते, सामाजिक शास्त्राचा अभ्यास करताना अभ्यासकाने तर्कशुद्ध पद्धतीने आपला अभ्यास केला पाहिजे. अभ्यासकाने मूल्यनिरपेक्ष दृष्टीकोन स्वीकारताना स्वतःची वैयक्तिक मूल्ये, दृष्टीकोन, मते बाजूला ठेवून तटस्थपणे संशोधन केले पाहिजे.

**मॅक्स वेबरचे राजकीय तत्त्वज्ञान :**

मॅक्स वेबरने आपल्या लेखनात सातत्याने सामाजिक कृती या संकल्पनेचा उल्लेख केला आहे. सामाजिक कृतीचे त्याने चार प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**१) बुद्धिनिष्ठ कृती :** व्यक्ती जेव्हा विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जी कृती करते तिला बुद्धिनिष्ठ कृती असे म्हणतात. उदा. इंजिनिअर/अभियंत्याने आराखड्यानुसार केलेली कृती/कार्य.

**२) मूल्याधारित/मूल्याधिष्ठित कृती :** ज्यावेळी व्यक्ती कृती करताना मूल्यांना प्राधान्य देते त्यास मूल्याधारित/मूल्याधिष्ठित कृती असे म्हणतात. उदा. साध्य-साधनांचा विचार न करता कर्तव्यभावनेने केलेले कार्य.

**३) भावनाविवश कृती :** व्यक्ती जेंव्हा बुद्धीपेक्षा भावनाविवेश होऊन कृती करते. त्याला भावनाविवेश कृती असे म्हणतात. उदा. धार्मिक कट्टरतावाद्यांनी योग्य-अयोग्यतेचा विचार न करता केलेली कृती.

**४) परंपरागत कृती :** अशा कृती ज्यामध्ये व्यक्ती रूढी, प्रथा, परंपरा यांना प्रमाण मानून कृती करतात. त्यामध्ये भावना व बुद्धीला फारसे स्थान नसते.

अशारितीने सामाजिक कृतीचे वेबरने वर्गीकरण केले आहे. योग्य पद्धतीने, योग्य दृष्टीकोनातून सामाजिक कृतीचे विश्लेषण करता यावे यांसाठी मॅक्स वेबरने 'आदर्श पद्धती' ही संकल्पना मांडली. तौलनिक पद्धतीने अभ्यास करताना ही आदर्श अभ्यासपद्धती उपयोगी पडेल असे त्याचे म्हणणे होते. या पद्धतीने काढलेले निष्कर्ष अचूक असतीलच असा दावा वेबर करत नाही. मात्र ते वास्तवाशी जवळीक साधणारे असतील असे त्याचे म्हणणे आहे. आदर्श अध्ययन पद्धतीमुळे भविष्यकाळातील संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होईल असे त्याचे म्हणणे होते. त्यामुळेच वेबर हा राजकीय समाजशास्त्राचा एक प्रमुख अभ्यासक मानला जातो.

**अधिकार :**

राज्यशास्त्रातील एक प्रमुख संकल्पना म्हणून अधिकार या संकल्पनेकडे पाहिले जाते. तसेच मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाने राजकीय समाजशास्त्रात अधिकार या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. त्याने आपल्या Sociology of Religion या ग्रंथामध्ये अधिकार ही संकल्पना विशद केली आहे. अधिकाराची संकल्पना विस्ताराने मांडताना वेबरने तिचे तीन प्रकारात वर्गीकरण केले आहे.

**१) परंपरागत अधिकार :**

या प्रकारामध्ये अधिकार हा एका व्यक्ती किंवा व्यक्तीसमुदायाच्या हाती एकवटलेला असतो. परंपरेनुसार सत्ता हस्तगत केली जाते. व्यक्ती परंपरेनुसार अथवा वंशाच्या आधारावर राज्यात सत्ता चालवित असते. ही सत्ता प्रथा, परंपरेनुसार वर्षानुवर्षे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित होते. यामध्ये इंग्लंडमधील राजपदाचा समावेश केला जातो.

**२) वैधानिक अधिकार :**

या प्रकारामध्ये व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहाला राज्यघटना किंवा कायद्याच्या माध्यमातून अधिकार प्राप्त होत असतात. तसेच त्या पदाबाबत लोकांच्या मनात असलेल्या अधिमान्यतेमुळे लोकही त्या अधिकार ग्रहण करणाऱ्या व्यक्तींच्या आज्ञांचे पालन करत असतात. व्यक्तीकडे जोपर्यंत जे पद आहे तोपर्यंतच तिला अधिकार प्राप्त होतात. पदमुक्त झाल्यानंतर व्यक्तीच्या अधिकारांचाही संकोच होतो. उदा. आधुनिक काळातील राज्यातील नोकरशाही.

**३) दिव्यवलयी किंवा संमोहक अधिकार**

या प्रकारामध्ये नेत्याचा किंवा नेतृत्वाचा प्रभाव लोकांवर असल्यामुळे त्या नेतृत्वाच्या इशाऱ्यानुसार व्यक्तीचे वर्तन घडत असते. नेतृत्वाचा प्रभाव लोकांवर इतका जबरदस्त असतो की प्रसंगी बलिदान करण्याचीही त्यांची तयारी असते. आपल्या नेत्याच्या ठिकाणी काही अलौकिक शक्ती आहे अशी अनुयायांची खात्री असते. धार्मिक घटकांचा प्रभाव तसेच युद्धकाळ अशा परिस्थितीत दिव्यवलयी किंवा

संमोहक अधिकार सत्ता अधिक प्रभावीपणे पुढे येते. उदा. हिटलरचे नेतृत्व, म. गांधी, पंडित नेहरू यांचे नेतृत्व.

**मॅक्स वेबरचे वर्ग आणि सामाजिक दर्जाबाबत विचार**

'Economic and Society' या आपल्या ग्रंथात मॅक्स वेबरने वर्ग आणि सामाजिक दर्जाबाबत आपले विचार स्पष्ट केले आहेत. मार्क्सवादी विचारवंतांनी केवळ आर्थिक घटकांना प्रमाण मानून वर्ग या संकल्पनेचे विश्लेषण केले. आर्थिक घटकांच्या आधारावर समाजाचे आहे रे आणि नाही रे अशा दोन वर्गात मार्क्स समाजाची विभागणी करतो. समाजातील दोनच वर्गाचे अस्तित्व मान्य करतो. मात्र वेबरला मार्क्सचे हे म्हणणे मान्य नाही. त्याच्या मते, समाजात केवळ दोनच वर्गाचे अस्तित्व नसते. तर संपत्तीच्या असमान वितरणामुळे समाजात प्रत्यक्षात अनेक वर्गाचे अस्तित्व असते. शिवाय आर्थिक घटकाबरोबरच व्यक्तीची समाजातील पद, प्रतिष्ठा, स्थान या घटकांनुसारही वेग निश्‍चिती होत असते. उदा. पोप किंवा धर्मगुरू यांची आर्थिक स्थिती जरी खालावलेली असली तरी समाजात त्यांचा दर्जा उच्च वर्गातील गणला जातो.

काहीवेळेला वर्ग आणि स्थान दोन्ही समान असते. उदा. समाजातील भांडवलदारांचा वर्ग आणि स्थान समान असते. तर पांढरपेशी नोकरदारांचा समाजातील वर्ग उच्च असतो तर त्याची गणना मध्यमवर्गात केली जाते.

वेबरने वर्ग ही संकल्पना सामाजिक दर्जा यादृष्टीकोनातून मांडली असली तरी बहुतांशी व्यक्तीचा आर्थिक स्तरच तिचा सामाजिक दर्जा वाढवतो अथवा कमी करतो हे वेबरलाही मान्य आहे. अशापद्धतीने सामाजिक दर्जाच्या आधारावर समाजाची विभागणी होत असते. त्यानुसार समाजव्यवस्था कार्यरत असते असे वेबर म्हणतो. अशापद्धतीने मॅक्स वेबरने समाजव्यवस्था आणि राजकारण यांची सांगड घालताना वर्ग संकल्पनेचा आधार घेतला. केवळ आर्थिक घटकांच्या आधारावर वर्ग ठरत नसतात तर आर्थिक घटकाबरोबर व्यक्तीचा समाजातील दर्जा, स्थान हे घटकदेखील तितकेच कारणीभूत ठरतात हे त्याने सप्रमाण दाखवून दिले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

१) राज्यशास्त्राचा संक्रमण कालखंड म्हणजे काय?

२) 'वर्तनवादी चळवळ' म्हणजे काय?

३) वर्तनवादोत्तर क्रांती किंवा उत्तरवर्तनवाद म्हणजे काय?

४) सामाजिक शास्त्रातील शास्त्रशुद्ध अध्ययन पद्धतीचे जनकत्व मॅक्स वेबरकडे का जाते?

**रिकाम्या जागा भरा.**

१) १८५० च्या पूर्वीचा कालखंड हा .............. कालखंड होय.

२) वर्तनवादी संशोधक संशोधनात .................. स्थान देत नाही.

३) कार्ल मार्क्सने ..................... या ग्रंथात मार्क्सवादी दृष्टीकोन मांडला.

४) सामाजिक शास्त्रातील शास्त्रशुद्ध अध्ययन पद्धतीचे जनकत्व .................. कडे जाते.

## २.३ सारांश

आधुनिक राज्यशास्त्रातील एक नवीन ज्ञानशाखा म्हणून 'राजकीय समाजशास्त्र' या विषयाकडे पाहिले जाते. राज्यशास्त्र हे प्राचीन शास्त्र असून पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासातील मर्यादा लक्षात आल्यानंतर आधुनिक राज्यशास्त्राचा उदय व विकास झाला. आधुनिक राजकीय विश्लेषणांतर्गत वैचारिक क्रांती घडून आली. त्यातून नव-नवीन विषयांचा अंतर्भाव राज्यशास्त्रात होऊ लागला. त्यातून आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन पुढे आला. वर्तनवाद, उत्तरवर्तनवाद, मार्क्सवाद या दृष्टीकोनांनी राजशास्त्राच्या अभ्यासात शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासाची गरज आधोरेखित केली आणि राज्यशास्त्राच्या अभयासात मोलाची भर घातली. मॅक्स वेबर याचा सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनाचा शास्त्रीय दृष्टीकोन, अधिकार, सत्ता, वर्ग या संकल्पनाही आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वाच्या मानल्या जातात. थोडक्यात राजकीय समाजशास्त्र याविषयाला बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे काम वर्तनवादी दृष्टिकोन, मार्क्सवादी दृष्टिकोन, वेबरचा दृष्टिकोन अशा विविध दृष्टीकोनाने व विचारवंतांनी केले असे म्हणता येईल.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**सामाजिकशास्त्र :** मानव व समाज यांचा पद्धतशीर अभ्यास करणारे शास्त्र. गुंतागुंतीचे मानवी संबंध आणि सामाजिक संस्था व संघटनांचा शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करून अभ्यास करणाऱ्या शास्त्राला सामान्यतः सामाजिक शास्त्र म्हणतात.

**कल्याणकारी राज्य :** समाजातील गरजू व दुर्बल घटकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी खास प्रयत्न करणारे राज्य.

**मूल्यनिरपेक्षता :** आदर्श, कल्पना, तत्त्वे, मानवी समाजाच्यादृष्टीने योग्य अशी ध्येये, नैतिक विचार, विचारप्रणाली, अभ्यासकाचे विचारविषयक प्रधान्य यांना मूल्य असे म्हटले जाते. समाजाचा शास्त्रशुद्ध विचार करताना अभ्यासकाने अशी मूल्ये आपल्या सिद्धांतामध्ये येऊ देऊ नयेत. त्यामुळे सामाजिक सिद्धांत शास्त्रशुद्ध ठरतील ह्या विचारातून सामाजिक शास्त्रामध्ये मूल्यनिरपेक्षता ही संकल्पना स्वीकारली गेली.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) ज्या कालखंडात पारंपरिक राज्यशास्त्राचे रूपांतर आधुनिक राज्यशास्त्रात होण्याची प्रक्रिया सुरू झाली तो कालखंड म्हणजे संक्रमण कालखंड होय.

२) पारंपरिक राज्यशास्त्राबाबत वाटत असलेल्या असंतोषातून निर्माण झालेली चळवळ म्हणजे वर्तनवादी चळवळ होय.

३) वर्तनवादातील दोषांचे निराकरण करण्यासाठी राज्यशास्त्रामध्ये जी वैचारिक क्रांती घडवून आणली तिला वर्तनवादोत्तर क्रांती किंवा उत्तरवर्तनवाद असे म्हटले जाते.

४) कारण मानवी समाजातील क्रियांचे अध्ययन करताना शास्त्रशुद्ध पद्धतींचा अवलंब केला जावा असा आग्रह त्याने धरला. त्यामुळे सामाजिक शास्त्रातील शास्त्रशुद्ध अध्ययन पद्धतीचे जनकत्व मॅक्स वेबरकडे जाते.

**रिकाम्या जागा भरा.**

१) पारंपरिक राज्यशास्त्राचा २) मूल्यांना

३) कम्युनिस्ट फेस्टो ४) मॅक्स बेबर

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

  १) वर्तनवादाची वैशिष्ट्ये

  २) उत्तरवर्तनवाद

  ३) मॅक्स वेबरने स्पष्ट केलेली 'अधिकार' ही संकल्पना

ब) थोडक्यात उत्तरे लिहा.

  १) मार्क्सचे वर्गासंबंधी विचार

  २) उत्तरवर्तनवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

  ३) वेबरचे राजकीय तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

क) सविस्तर चर्चा करा.

  १) कार्ल मार्क्सचे ऐतिहासिक भौतिकवादाविषयी विचारांचे विवेचन करा.

  २) वर्तनवादी दृष्टीकोनाची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१) आवारी विलास, देवरे सुरेश (२०१५) : आधुनिक राजकीय विश्लेषण, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, द्वितीयआवृत्ती.

२) भोळे भा. ल. (२००८) : राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे बुड डिस्ट्रिब्युटर्स नागपूर.

३) बोराळकर कृ. दि. (१९८९) : आधुनिक राजकीय विश्लेषण, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४) देव विजय, गोसावी शरद, आपटे संज्योत (२०१२) : पाश्चात्त्य राजकीय विचारवंत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे प्रथमावृत्ती.

५) गर्दे दि. का. व बाचल वि. मा. (१९७५) : आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

६) गर्दे दि. का. व बाचल वि. मा. (१९७९) : आधुनिक राजकीय विश्लेषण (भाग-१ व २), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

७) पाटील महेंद्र (२०१७) : राजकीय समाजशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथमावृत्ती.

८) तिजारे रा. अं., पांढरीपांडे प. क्षी. व पेशवे व. मा. (१९८१) : आधुनिक राजकीय विश्लेषण, मंगेश प्रकाशन, नागपूर.

९) वासनिक कुंवरलाल हि. व रोकडे शीतल अ. (२०२०) : राजकीय समाजशास्त्र, ज्ञानपथ पब्लिकेशन्स, अमरावती, प्रथमावृत्ती.

❑❑❑

## सत्र २ : घटक ३
# भारतीय राजकीय समाजशास्त्र

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ अ) जाती

    १. प्रगत जाती

    २. वर्चस्वशाली जाती

    ३. मागासवर्गीय जाती

  ३.२.२ ब) वर्ग

    १. भांडवलदार वर्ग

    २. मध्यम वर्ग

    ३. सबाल्टर्न वर्ग

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचणासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये :

१. भारतीय समाजातील जातीव्यवस्थेचा उगम व तिचे स्वरूप समजून घेणे

२. भारतीय समाजातील पुढारलेल्या जातींच्या कारणामागील मीमांसा करणे

३. प्रभुत्वशाली जातींची स्तिथी समजून घेणे

४. मागासवर्गीय जातीची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे

५. वर्ग ही संकल्पना स्पष्ट करणे

६. भांडवलदार वर्गाचा उदय व विकास समजून घेणे

७. भांडवलवादी व्यवस्था समजून घेणे

८. भारतातील मध्यमवर्गाचा उदय व त्याचे स्वरूप समजून घेणे

९. सबाल्टर्नच्या अभ्यासाचा उद्देश स्पष्ट करणे

१०. सबाल्टर्न वर्गाच्या अभ्यासाचे महत्त्व समजून घेणे

## ३.१ प्रास्ताविक :

भारतीय समाजाच्या ऐतिहासिक कालक्रमणाच्या आढाव्यातून तिच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे व वैविध्याचे आकलन होते. भारतीय उपखंडाच्या वैशिष्टय़पूर्ण भौगोलिक स्थानामुळे अनेक प्रकारच्या लोकसमूहांनी या भागात स्थलांतर केले. स्थलांतरित लोक भारतीय समाजाचे भाग झाले. त्यामध्ये आर्य, ग्रीक, पश्शयन, शक, कुशाण, पहलव, हुण, अरब, मंगोल, तुर्की, युरोपियन इत्यादी लोकसमूहांचा समावेश होतो. अशी स्थलांतरे व भारतीय उपखंडाचा मोठा प्रादेशिक विस्तार या घटकांनी भारतीय समाजाला वैविध्य प्रदान केले आहे. भारतीय समाजाची विविधता अनेक घटकांवर आधारित आहे. भारतामध्ये वंश, धर्म, जात, पंथ, संस्कृती, प्रदेश, भाषा इत्यादी घटकांवर आधारित विविधता आढळते. भारतीय समाजामध्ये नेग्रीटो, प्रोटो-ऑस्ट्रेलॉइड, मंगोलॉइड, मेडिटेरॅनियन, नॉर्डिक (आर्य) इत्यादी वंशाचे लोक आढळून येतात. यामधील पहिल्या तीन वंशांचे लोक मूळ भारतीय असल्याचे किंवा त्यांचे अस्तित्व सर्वाधिक जुने असल्याचे मानले जाते. भारतामध्ये हिदू, बौद्ध, जैन या धर्माचा उदय झाला. याव्यतिरिक्त भारतात ख्रिश्चन, शीख, इस्लामिक, झोरास्ट्रियन (पारशी), ज्यू या धर्माचेही अस्तित्व आहे. कबीरपंथी, सत्नामी, लिंगायत असे अनेक पंथ भारतीय समाजात निर्माण झाले. भारतीय समाजातील आदिवासी व भटक्या जमातींना आपापल्या धर्मात समाविष्ट करण्याचा प्रयत्न अनेक धर्मानी केला. असे असले तरी या जमातींनी त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्टय़ांचे जतन केल्याचे दिसते. भारतामध्ये संस्कृत, पाली व प्राकृत या प्राचीन भाषा होत्या. त्यानंतर अनेक प्रादेशिक भाषांचा उदय झाला. तामीळ भाषेलासुद्धा प्राचीन भाषा मानले जाते. भारतीय संविधानामध्ये २२ प्रमुख भाषांचा उल्लेख असून अनेक बोली भाषा भारतात बोलल्या जातात. भारतीय समाजामध्ये

वैशिष्टय़पूर्ण स्तरीकरण आढळते. या स्तरीकरणाची सुरुवात प्राचीन वर्णव्यवस्थेमध्ये झाल्याचे मानले जाते. आर्यानी समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णामध्ये स्तरीकरण केले. इतर वंशांच्या लोकांना दास किंवा दस्यू असे संबोधण्यात आले. यांना वर्णव्यवस्थेमध्ये स्थान नाकारण्यात आले. व्यवसायावर आधारित श्रेणींमधून तसेच भटक्या व इतर जमातींना धर्मात स्थान देण्याच्या प्रयत्नांतून जाती निर्माण झाल्याचे मानले जाते. भारतीय समाजामध्ये वर्णाच्या ढोबळ स्तरीकरणाच्या आराखडय़ामध्ये जातींचे स्तरीकरण (उतरंड) झाल्याचे दिसते. याव्यतिरिक्त (तत्कालीन सामाजिक दृष्टिकोनावर आधारित) हलकी कामे करणाऱ्या गटांना अस्पृश्य मानण्यात आले. याच जातिव्यवस्थेचा परिणाम भारतात प्रवेश करणाऱ्या इतर धर्मावरही झाल्याचे दिसते. ख्रिश्चन धर्माला भारतात जातिव्यवस्थेला तोंड द्यावे लागले, तर इस्लाम धर्मातील शिया, सुन्नी पंथांव्यतिरिक्त स्तरीकरण भारतात झाल्याचे दिसते. भारतातील सामाजिक स्तरीकरणाची अनेक वैशिष्टय़े आहेत. रोटी-बेटी व्यवहारांवरील बंधने, जातीवर आधारित वस्त्या, जातीवर आधारित प्रतिष्ठेच्या संकल्पना यांचा यात समावेश होतो. भारतीय समाज नेहमीच पुरुषप्रधान राहिला आहे. प्राचीन काळात स्त्रियांना असलेले काही मर्यादीत अधिकार देखील काढून त्यांना स्तरीकरणातील शूद्रांचे स्थान प्रदान केले गेले.

भारत हा अनेक जाती, धर्म, पंथ, भाषा व संस्कृती यांची विविधता असलेला देश अशी भारताची ओळख आहे. परंतु भारताच्या अशा ओळखीने त्याच्या जातीआधारित भेदभावपूर्ण समाजरचनेचे वास्तव मात्र दुर्लक्षित करता येऊ शकत नाही. भारतीय राजकीय समाजाची पूर्वापार वर्णव्यवस्थेतून झालेली जातीबद्ध घडण ही आजही कायम आहे. भारतामध्ये फुले-शाहू-आंबेडकरांनी जातीव्यवस्थेविरुद्ध दिलेल्या अथक लढ्यानंतर जातीच्या परंपरागत व्यवहारामध्ये काहीसा बदल होवून शुद्रातीशुद्रांच्या गुलामीचे पाश सैल झाले. कालौघात विशेषतः भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीनंतर अभ्यासकांकडून भारतामध्ये जातींचे विश्लेषण हे वेगळ्या पद्धतीने व्हावयास सुरुवात झाली. आजघडीला भारतामध्ये साधारणपणे जातीव्यवस्थेचे स्वरूप हे प्रामुख्याने प्रगत जाती (Forward Castes), वर्चस्वशाली जाती (Dominant Castes) आणि मागासवर्गीय जाती (Backward Castes) या आधारांवर केले जाते. मार्क्सवादी चिंतन मात्र भारतात वर्ग व्यवस्था आहे आणि भारतीय समाजाचे विश्लेषण हे वर्गाधारित झाले पाहिजे यावर विचारावर भर देते. तर काही अभ्यासक हे जातिंबरोबरच जातींतर्गत समानांतर निर्माण झालेल्या वर्गरचनेचा देखील अभ्यास हा भारतीय राजकीय समाजाच्या व्यापक विश्लेषणासाठी गरजेचा मानतात. भारतात काही प्रगत व वर्चस्वशाली जातींमध्ये एक भांडवलदार वर्ग निर्माण झाला आहे. तसेच प्रत्येक जातींमध्ये छोटे व्यवसाय व नोकरदारांचा एक मध्यम वर्ग मोठ्या प्रमाणात आकाराला आलेला आहे. त्यामुळे भांडवलदार वर्ग आणि मध्यम वर्ग यांचा देखील देशाच्या राजकारण व सत्ताकारणात प्रचंड प्रभाव निर्माण झालेला आहे. या दोन वर्गाबरोबरच सबाल्टर्न वर्ग हा सध्या इतिहासाची पुनर्मांडणी करून वंचित व उपेक्षितांच्या कार्य कर्तुत्वाच्या इतिहासाला समोर आणतो आहे. सबाल्टर्न चा अभ्यास करण्यामध्ये रणजीत गुहा, पार्थ चॅटर्जी, डेव्हिड हार्डीमन, दीपेश चक्रवर्ती, शाहिद अमीन, सुसी थारु, जुली स्टीफनसन, गौतम भद्रा, ग्यान प्रकाश, गायत्री स्पीवाक, सुमित सरकार, बर्नार्ड कोहन, कांचा ईलाया, गोपाल गुरु, आदी अभ्यासकांचा समावेश होतो. अभिजन, वर्चस्वी

इतिहास लेखनाला तर्काधारित विरोध करून अंकित , दुय्यमत्व अर्थात सबाल्टर्न जाणीव केंद्रस्थानी ठेवून इतिहास लेखन करणे हे सबाल्टर्न स्टडीजचे मुख्य उद्दिष्ट आहे. पार्थ चॅटर्जींच्या मते, अभिजनवादी इतिहासलेखनाला नाकारल्यानंतर जो अवकाश निर्माण झाला त्यामध्ये सबाल्टर्न जाणीवेने इतिहासाची मांडणी करणे ही सबाल्टर्न इतिहासकारांची जबाबदारी आहे. वंचितांचे लढे, चळवळी या अभिजन शोषण व दमनाचा प्रतिवाद व प्रतिकारातून समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण भारतीय राजकीय समाजशास्त्राला समजून घेण्यासाठी भारतीय समाजातील प्रगत जाती, वर्चस्वशाली जाती व मागासवर्गीय जाती आणि भांडवलदार वर्ग, मध्यम वर्ग व सबाल्टर्न वर्ग या संदर्भात भारतातील जाती व वर्ग व्यवस्थेची चर्चा करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

भारतील समाजव्यवस्था ही वर्णांतर्गत जातिव्यवस्थेवर आधारीत आहे. शेकडो वर्षाच्या प्रवासानंतर या जातिव्यवस्थेत काही जाती प्रगत जाती, काही जाती वर्चस्वशाली तर बहुतांश जाती ह्या उपेक्षित, वंचीत, मागास अशा अवस्थेत आज आपल्याला बघायला व अनुभवायला मिळतात. या जातीव्यवस्थेने भारतात एकिकडे आर्थिक सुबत्ता, राजकीय सत्ता ज्ञान सत्ता यावर मक्तेदारी प्रस्थापित केली तर दुसरीकडे वंचीत, उपेक्षीत व अतिशय मागास अशा कुंठितावस्थेपर्यंत पोहोचलेल्या दिसून येतात. त्याचबरोबर भारतीय समाजव्यवस्थेतील जातिव्यवस्थेत वर्गरचना देखील आकाराला आलेली दिसून येते. त्यामध्ये भांडवलदार वर्ग, मध्यम वर्ग व सबाल्टर्न वर्गाचा समावेश होतो. त्यामुळे भारतीय राजकीय समाजशास्त्राचे अध्ययन आपल्याला जात व वर्ग या व्यवस्थेतूनच करणे गरजेचे आहे.

### ३.२.१ अ) जाती :

'जात' ही व्यवस्था अगदी प्राचीन काळापासून भारतीय समाजामध्ये अस्तित्वात आहे. जगात भारतीय समाजच केवळ जाती व्यवस्थेवर आधारित असल्यामुळे हा समाज इतर सर्व समाज समूहांपेक्षा वेगळा आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजात जाती व्यवस्था निर्माण होऊन हा समाज अनेक जाती व नंतर उपजातींमध्ये विभाजित झाल्याचा इतिहास आहे. भारतात विशेषतः हिंदू समाज हा जाती व्यवस्थेवर आधारित आहे. जगामध्ये भारत वगळता दुसऱ्या कोणत्याही समाजात जाती आधारित समाजाची रचना आढळून येत नाही. जातीचा महत्त्वाचा विशेष म्हणजे जात ही जन्माने ठरते. अशा जन्माने नातेवाईक असणाऱ्या लोकांचा गट हा जातीबद्दल असतो. रोटी-बेटी व्यवहार फक्त जातीमध्येच होऊ शकतो. जन्माने नातेवाईक असणाऱ्या लोकांचा समूह हा विशिष्ट प्रदेशात वास्तव्य करताना आढळून येतो. बहुतांश जातीमध्ये जातपंचायती द्वारा त्यांच्या जातीसंबंधी आचरणाचे नियम सुरक्षित केले जातात. त्यामुळे जातींमध्ये व्यक्तींचे परस्पर संबंध हे प्रामुख्याने जातपंचायतीमार्फत नियंत्रित असतात. प्रत्येक जातीचा एक विशिष्ट असा व्यवसाय असतो एक अशा प्रकारची बंदिस्त व्यवस्था म्हणजे जात की जी उच्चनीचतेच्या स्तरांवर श्रेणीबद्ध झालेली असते.

भारतीय समाज हा जातीब्द्ध कसा बनला याबाबत संशोधक अभ्यासकांमध्ये विविध मतप्रवाह आहेत. जातिव्यवस्थेचा उगम व जातीच्या स्वरूपाविषयी काही अभ्यासकांच्या मते जातीव्यवस्था ही आर्य पूर्व

कालखंडात अस्तित्वात होती. तर काही अभ्यासाकांच्या मते आर्यांनी भारतावर आक्रमण केले आणि हा देश जिंकून घेतल्यानंतर भारतीय समाजावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जातीव्यवस्था लादली. जात हे भारतीय समाजाचे आगळे वेगळे वैशिष्ट्य असून चातुर्वर्ण व्यवस्थित जातीचा उगम असल्याचे अनेक अभ्यासकांचे मत आहे. काही अभ्यासात हे जातीचा विकास आधी मग टोळ्यांमधून झाला असल्याचे मानतात. या अभ्यासाकांच्या मते आर्यांच्या आगमनापूर्वी आदिवासी समाजात शेकडो वर्षाच्या प्रक्रियेमध्ये विशेषतः त्या समाजाचे वर्गीय समाजात अर्थात शोषणावर आधारित संबंध निर्माण व्हावयास सुरुवात झाल्यामुळे समाजात जे रूपांतरण घडवून आले त्यातूनच जातीसंस्थेचा उगम झाला.वर्ण जात व्यवस्था हे भारतीय समाजाची जगात जगावेगळी अशी विशेष्व विचित्र अशी ओळख बनलेली आहे. प्राचीन काळामध्ये

वर्ण जात व्यवस्थेने आपली पाळेमुळे घट्ट करायला सुरुवात केली असताना तिला विरोध करणारी प्रतिक्रिया उमटलीच नाही असे नाही. परंतु वर्ण जात विरोधी ही प्रतिक्रिया अतिशय क्षीन असल्यामुळे जात व्यवस्थेचे स्तोम गडद होण्यापासून ती थोपवू शकली नाही. त्यानंतरच्या मध्ययुगीन काळामध्ये देखील वर्ण जात व व्यवस्थेविरुद्ध अनेक संत व विचारवंतांनी प्रतिरोधाची भूमिका घेतलेली दिसून येते परंतु शेकडो वर्षाच्या प्रवास प्रक्रियेतून जात व्यवस्था ही अतिशय दृढ बनल्यामुळे व तिला धर्मशास्त्रांचे अधिष्ठान प्राप्त झाल्यामुळे जातीव्यवस्थेला धक्का देणे कठीण होऊन बसले होते. अशा दृढ मूल बनलेल्या जातीव्यवस्थेची खऱ्या अर्थाने आधुनिक कालखंडामध्ये तटबंदी आधुनिक कालखंडामध्ये काही प्रमाणात कीलकीलायला सुरुवात झाल्याची दिसून येते. युरोपियन पुनर्जागरण, औद्योगीकरणाला सुरुवात व भारतात सुरू झालेली प्रबोधन चळवळ आणि भारतातील ब्रिटिश सत्तेचा भारतात स्थापित झालेली ब्रिटिश सत्ता यांच्या परिणामी भारतीय जातीव्यवस्था समीक्षेच्या विचार विश्वाच्या केंद्रस्थानी आली. भारतातील या जातींमध्ये वाद-संवाद, सहकार्य, परस्परावलंब व त्याचबरोबर परस्पर संघर्षही दिसून येतो. जातीच्या उतरंडीमुळे वरिष्ठ जात ही तिच्या कनिष्ठ जातींवर प्रभाव गाजवताना व त्या जातींचे शोषण करताना दिसते.

**१. प्रगत जाती** (Forward Castes) :

भारतीय वर्णव्यवस्थेत ब्राह्मण क्षेत्रीय व वैश्य वर्णातील जाती ह्या प्रामुख्याने प्रगत जाती म्हणून ओळखल्या जातात. कारण गेली शेकडो वर्षे जेंव्हापासून जातिव्यवस्था अस्तित्वात आली तेंव्हापासून धर्मसत्ता, अर्थसत्ता, शिक्षण अशा समाजाच्या मुख्य प्रवाहांवर केवळ याच जातिंचा एकतर्फी मक्ता राहिला आहे. प्रगत जाती या अशा जाती आहेत की, ज्या जाती समाजातील इतर जातींपेक्षा आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या तुलनेने फार पुढे गेलेल्या असतात. भारतामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तसेच मागासवर्गीय जातींच्या आरक्षणाच्या यादीमध्ये सूचीबद्ध नसलेल्या जातींना दर्शविण्यासाठी 'प्रगत जाती' हा शब्दप्रयोग केला जातो. सामान्यतः, जातीय उतरंडीत पारंपारिकपणे उच्च असलेल्या जातीला वर्चस्वाचा दर्जा मिळतो. ब्राह्मण चांद्रशानिय कायस्थ प्रभू, सारस्वत, देशस्थ, चित्पावन बनिया आणि राजपूत या जातींचे परंपरेने वर्चस्व राहिले आहे. ब्राह्मण हे जातीच्या उतरंडीत वरच्या स्थानावर आहेत आणि ते गावातील धार्मिक सण आणि विधी येथे काम करतात. दक्षिण भारतात ''म्हैसूरच्या मलौड भागातील टोलटागड्डे

गावातील हविक ब्राह्मण आणि तंजोर (तामिळनाडू) येथील कुंबापेट्टाई गावातील स्मार्त ब्राह्मण प्रगत जाती असल्याचे आढळून आले आहे.

प्रभू समूदाय हा प्रगत जातींचा समुदाय आहे. हा समुदाय भारतात विशेषतः महाराष्ट्रात हिंदू धर्मिय जातींचा समूह म्हणून ओळखला जातो. प्रभू समुदायामध्ये चांद्रसेनिय कायस्थ प्रभू, पाठारे प्रभू, कांचोळे प्रभू व दानवेद प्रभू. चांद्रसेनिय कायस्थ प्रभू जातीच्या लोकांची भाषा ही मुख्यतः मराठी व कोंकणी असून ही जात एक ब्रह्मक्षत्रिय जात म्हणून ओळखली जाते.

चांद्रसेनिय कायस्थ प्रभू (सीकेपी) आणि पाठारे प्रभू : चांद्रसेनिय कायस्थ प्रभू (सीकेपी) आणि पाठारे प्रभू हे धार्मिकदृष्ट्या उच्च जातिचे असून त्यांना सामाजिकदृष्ट्या महाराष्ट्रीयन ब्राह्मण समाजाच्या जवळचे मानले जाते. शिक्षण, व्यवसाय व सामाजिक स्थितीतील समानतेमुळे चित्पावन, सारस्वत व देशस्थांप्रमाणेच त्यांना प्रगत जात मानले जाते.

चांद्रसेनिय कायस्थप्रभू आणि पाठारे प्रभू या दोन जातींच्या लोकांना ब्राह्मणांव्यतिरिक्त बौद्धिकदृष्ट्या सधन मानले जाते. कारण या जातींचे लोक हे शैक्षणिकदृष्ट्या अग्रेसर आहेत. या जातींचे लोक हे प्रामुख्याने – महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक या प्रदेशांसह देशातील इतर भागातही विखुरल्या अवस्थेत वास्तव्यास आहेत. या जातीचे लोक हे चंद्रसेन राजाचे वंशज ''चांद्रसेनिय'' तर, राजकारण व सत्ताकारणातील प्रमुख व्यक्ती व पद म्हणून ''प्रभू'' लावले जाते.

बनिया : बनिया जातिसमूह हा वैश्य या वर्णामध्ये येतो. प्रामुख्याने वाणिज्य आणि व्यवसायासी निगडीत असणाऱ्या जाती म्हणून या जातिंकडे बघितले जाते. बनिया जातीचे लोक हे प्रामुख्याने गुजरात, राजस्थान व मध्यप्रदेश या घटकराज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येतात. परंतु याचबरोबर देशाच्या अन्य घटक राज्यांमध्ये देखील बनिया जातिंचे वास्तव्य असल्याचे दिसून येते. उत्तरप्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, हिमाचल प्रदेश, चंदीगढ, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र यांसारख्या घटक राज्यांमध्ये बनिया जातिंच्या लोकांचा मुख्य व्यवसाय व्यापारी, बँकर साहूकार, ज्ञानी कार्यकर्ता तसेच व्यापारी उद्योगांचे मालक म्हणून आहेत. बनिया जातिसमूहांमध्ये अग्रवाल बनिया, माहेश्वरी बनिया, पोरवाल बनिया, नेवार, मालपुरे, लाला, गुप्ता, जयस्वाल, अग्रहरी, बरनवाल, महेश्वरी, केसरवानी, लोहिया स्वर्णकार, बजाज, घाटे बनिया इत्यादी अनेक उपजातिंचा समावेश होतो.

**२. वर्चस्वशाली जाती** (Dominant Castes) :

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये जातीची उतरंड असल्यामुळे वरिष्ठ जातीचे लोक हे कनिष्ठ जातींच्या लोकांचे शोषण करतात व त्यांच्यावर आपला प्रभाव गाजवतात. जेव्हा उच्चभ्रू जातींचे लोक हे दुसऱ्या जातींवर प्रभाव गाजवतात व त्यांचे शोषण करतात तेव्हा या जातींमध्ये संघर्ष निर्माण होतो. डॉ. श्रीनिवास यांनी भारतीय जाती व्यवस्थेच्या चौकटीचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, भारतीय जाती व्यवस्थेमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या जातींचे स्थान हे भिन्न स्वरूपांचे आहे. त्यांच्यामध्ये प्रचंड विषमता आहे. या जात

उतरंडीमध्ये उच्चभ्रू असलेल्या वरच्या जातींमध्ये संघटितपणा दिसून येतो तर अन्य जातींमध्ये असंघटितपणा आहे.

ज्या जाती ह्या अत्यंत संघटित आहेत त्यांच्याकडे प्रतिष्ठा, संख्याबळ आणि सत्ता आहे. त्यामुळे अशा जातींचा कनिष्ठ जाती, घटकांवरील प्रभाव हा अधिक असतो. अशा जातींना डॉ. श्रीनिवास वर्चस्वशाली जाती किंवा प्रभावी जाती असे म्हणतात.

''एखाद्या जातीचे संख्याबळ हे जेव्हा इतर जातींच्या संख्याबळापेक्षा वाढलेले असते व त्यामुळे संबंधित जातीकडे राजकीय आणि आर्थिक सत्ता येते. अशाप्रकारे राजकीय व आर्थिक सत्तेमुळे स्थानिक श्रेणी रचनेमध्ये संबंधित जातीचा दर्जा वाढतो तेव्हा त्या जातीला प्रबळ जाती किंवा प्रभावी जात असे म्हणतात.'' अशा प्रबळ अथवा प्रभावी जाती अर्थात वर्चस्वशाली जाती या भारतातील विविध प्रदेशात वेगवेगळ्या स्वरूपात अस्तित्वात असल्याचे आढळून येते. डॉ. श्रीनिवास यांनी प्रबळ अथवा प्रभावी जातीची संकल्पना ज्या मुख्य घटकांच्या आधारे स्पष्ट केली आहे त्यामध्ये संख्याबळ, मोठ्या प्रमाणावर लागवडी योग्य जमिनीची स्थानिक स्तरावरील मालकी, स्थानिक श्रेणी रचनेमध्ये उच्च स्थान (धार्मिक दृष्ट्या उच्च दर्जा, पाश्चात्य शिक्षण, आर्थिक व राजकीय सत्तेचा उपभोग, उच्च व्यवसायांमध्ये जातीचे सदस्य असणे आदी घटकांचा समावेश होतो. डॉ. श्रीनिवास यांनी अभ्यासाअंती प्रभावी जातीची काही उदाहरणे दिली आहेत. ती पुढील प्रमाणे –

तामिळनाडूमध्ये वर्चस्वशाली जातींमध्ये गोंधळ, मुदलियार आणि पद्याची या जातींचा समावेश होतो. केरळ या राज्यांमध्ये नायर आणि एरवा या जातींचा समावेश होतो. कर्नाटक या राज्यांमध्ये लिंगायत आणि ओकालिगा या जातींचा समावेश होतो तर आंध्रप्रदेश या राज्यात रेड्डी आणि कम्मा या जातींचा समावेश होतो. बिहारमधील भूमिहार आणि राजपूत, महाराष्ट्रामध्ये मराठा ही वर्चस्वशाली जातीची उदाहरणे आहेत. मराठा जात ही भारतातील सर्वात मोठी जात आहे. विशेषतः ग्रामीण समाजात त्यांच्या संख्यात्मक ताकदीमुळे महाराष्ट्रातील सत्ता रचनेवर त्यांचे वर्चस्व आहे.

उत्पादन शक्ती कोणाच्या नियंत्रणाखाली असतात त्यावरून त्या समूहांचे वर्चस्व किंवा अधिनत्व सिद्ध होत असते. भारतामध्ये विशेषतः स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये राजेरजवाडे, सरदार, जमीनदार, मुलकी व फौजदारी प्रशासक यांचे समाजावर नियंत्रण होते. त्यामुळेच त्यांचे वर्णन हे सरंजामी व्यवस्था असे केले जात होते. सरंजामदार या शब्दांमध्येच देशपांडे, कुलकर्णी व ब्राह्मणेत्तरांमध्ये सरदार, पाटील, देशमुख अशा उच्च जातींचा समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये मराठा जातीची एकूण लोकसंख्येतील टक्केवारी ही इतर जातीसमूहांच्या तुलनेत अधिक असल्यामुळे मराठा जातीला वर्चस्वशाली जात असे मानले जाते.

**३. मागासवर्गीय जाती** (Backward Caste) :

भारतीय राज्यघटनेत शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास समाज घटकांच्या उन्नती व विकासासाठी अनु. ३४०, ३४१ व ३४२ मध्ये महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत. डॉ. प्रकाश पवार यांनी विशेषतः महाराष्ट्रामध्ये इतर मागासवर्गीय समाजाचे सहा स्तर स्पष्ट केले आहेत. परंतु त्यांचे राजकीय दृष्ट्या

विश्लेषण करीत असताना त्यांचे प्रमुख तीन गट केले आहेत. त्यामध्ये शेतकरी, इतर मागासवर्गीय जाती, उदाहरणार्थ माळी, धनगर, वंजारी व कारागीर जाती उदाहरणार्थ कुंभार, सुतार, इत्यादी व मध्यम जाती उदाहरणार्थ लेवा पाटील, लिंगायत इत्यादी असे ते तीन स्तर स्पष्ट करतात.

इतर मागासवर्गीय समाजामध्ये जात विषयक धारणा ह्या एवढ्या पक्क्या आहेत की, या जातींनी आपल्या जात संघटना स्थापन करून त्याद्वारे आपल्या जातींचे संघटन मजबूत केले आहे. उदाहरणार्थ कोकणमध्ये कुणबी सेना, आगरी सेना, उत्तर महाराष्ट्रामध्ये लेवा सभा, बीडमध्ये भगवान सेना, वाशिममध्ये समता परिषद, बंजारा क्रांती दल, वर्धा येथे तेली महासंघ इत्यादी अनेक जातींच्या संघटना या आपल्या जात जाणिवांना अधिक मजबूत करताना दिसून येतात.

**३.२.२ ब. वर्ग** (Class) :

वर्ग ही संकल्पना मुख्यत्वेकरून आधुनिक कालखंडामध्ये आर्थिक घटकावर आधारित समाज रचना समजून घेण्यासाठी वापरली जाऊ लागली. विशेषतः काल मार्क्स ने देखील आपल्या लिखाणामध्ये वर्ग असा शब्दप्रयोग केलेला आहे. मार्क्सच्या मते, प्रत्येक समाजात वर्गाची उतरंड आढळून येते. मार्क्सने भांडवलशाही समाज व्यवस्थेत भांडवलदार व कामगार या दोन महत्त्वाच्या वर्गाबरोबरच जमीनदार, छोटे शेतकरी, शेतमजूर शहरांमध्ये मवाली अशा विविध वर्गाची नोंद केली आहे. मार्क्सच्या मते, हळूहळू भांडवलशाहीच्या विकासाबरोबर समाजाचे स्पष्ट विभाजन होऊन भांडवलदार व कामगार हे दोनच वर्ग समाजात निर्माण होत जातील. कोणत्याही समाजामध्ये त्यांच्या गरजा भागविण्यासाठी संपत्तीचे उत्पादन केले जाते आणि असे संपत्तीचे उत्पादन हे त्या समाजाचा गाभा असतो. संपत्तीचे आपल्या श्रमाद्वारे उत्पादन करणारे श्रमजीवी मात्र दासत्व व या संपत्तीवर अधिकार गाजविणारे स्वामी असे समाजात वर्ग निर्माण होतात वर्ग ही समाजशास्त्रीय संकल्पना आहे.

मध्ययुगाच्या अंतानंतर व्यक्तीची अनेक बंधनातून मुक्तता झाली. आधुनिक समाजशास्त्राचा उदय झाला. अठराव्या शतकामध्ये सामाजिक शास्त्राच्या अध्ययन केंद्रामध्ये व्यक्तीचे जीवन आले. व्यक्तीच्या जीवनाभोवती सिद्धांताची गुंफण सुरू झाली. सामाजिक शास्त्राच्या विकासाबरोबर व्यक्तीवाद दृष्टिकोनाला अपुरेपणा देखील विचारवंतांना जाणवू लागला. समाज हितसंबंध व परस्परावलंबन हे व्यक्ती जीवनाचे वैशिष्ट्य आहे. अशा हितसंबंधांमुळे व्यक्तीचे विविध गट अस्तित्वात येतात. त्यामुळे व्यक्ती कोणत्या न कोणत्या गटाशी घनिष्ठपणे संबंधित असते आणि अशा गटसंबंधांमधून समाज जीवनाला आकार मिळत असतो. त्यामुळे समाजाच्या स्थिती गतीचा अन्वयार्थ लावताना व्यक्ती प्रमाणेच व्यक्ती गटांचाही विचार करण्याची गरज असते यासंबंधीचा प्रत्यय समाजशास्त्रज्ञांना येऊ लागल्याने सामाजिक शास्त्रात वर्ग चिकित्सा महत्वाची बनली. मुख्यतः व्यक्तिगटांमधील आर्थिक भेदानुसार समाजात वर्ग ठरत असतात. वर्ग व्यवस्थेचा पाया आर्थिक असला तरी अशा वर्गांमध्ये आर्थिक घटकांबरोबर इतर अन्य घटकही महत्त्वाचे असतात. लुईस आणि मैदेच्या मते, व्यक्तीचा वर्ग ठरवत असताना व्यक्तीचा व्यवसाय, त्याचे उत्पन्न, निवास, संस्कृती, शिक्षण, आचार विचारशैली, कुटुंब व इतर कुटुंबाबरोबर व्यक्तींचे असणारे संबंध, नितीमत्ता अशा अनेक

विविध घटकांचा त्यामध्ये समावेश होतो. यावरून असे स्पष्ट होते की, आर्थिक साधन संपत्तीचा उपभोग व त्याद्वारे प्रभावित होणारी व्यक्तीची जीवनशैली यांच्या आधारे लोकांची जी विशिष्ट गटांमध्ये विभागणी होते, त्यातूनच वर्ग व्यवस्था आकाराला येते. अशा वर्ग व्यवस्थेमध्ये किती प्रकारचे व कोणते वर्ग असतात याबाबत समाजशास्त्रज्ञांमध्ये मतभिन्नता आढळून येते.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये मध्यम वर्गाचा उदय हा वेगाने होत असल्याचे आढळून येते. मध्यमवर्ग हा मुख्यतः नव्वद नंतर आलेल्या खाऊजा धोरणानंतर झपाट्याने वाढायला लागला. साधारणपणे नव्वद च्या दशकापर्यंत भारताच्या सार्वजनिक जीवनामध्ये मध्यमवर्गाचा सहभाग दिसून येतो. हा वर्ग शोषक व शोषित अशा दोन्ही वर्गापासून तटस्थ होता. वर्ग चळवळीशी तो जुळवून घेत भांडवलशाही व्यवस्थेची चिकित्सा करत होता. या कालखंडात मध्यम वर्गाची भूमिका ही दुय्यम स्वरूपाची होती. मुख्यत्वे हा वर्ग सांस्कृतिक क्रांतीचा वाहक म्हणून कार्य करत होता. खाऊजाच्या अवलंबजावणीनंतर आलेल्या बदलाने मध्यमवर्गाची राजकारणामधील भूमिका महत्त्वाची बनविली. नव्वद नंतर खऱ्या अर्थाने मध्यमवर्गाला आपल्या हितसंबंधाची प्रकर्षाने जाणीव होऊ लागली व हळूहळू मागील तीन दशकांमध्ये हा वर्ग राजकारणाच्या केंद्राकडे सरकू लागला. भारतात जवळपास एक चतुर्थांशापेक्षा अधिक मध्यमवर्गीयांची लोकसंख्या असल्याचे मानले जाते. या मध्यम वर्गाचे राजकीय व सामाजिक वर्तन आमुलाग्रपणे बदलले आहे.

१. **भांडवलदार वर्ग** (Capitalist Class) :

भांडवलदार, भांडवलवाद, भांडवलशाही या संकल्पना एका विशिष्ट उत्पादन पद्धती, आर्थिक व्यवस्था व तद्धुरांगाने निर्मित सामाजिक रचने करिता उपयोगात आणल्या जातात. काल मार्क्सच्या सिद्धांतानुसार, भांडवलदाराच्या क्रांतीनंतर अवतरलेले युग म्हणजे 'भांडवलशाही' होय. या युगामध्ये जे यावर जंगम स्वरूपात असणारी संपत्ती असते, अशा संपत्तीचे भांडवलामध्ये रूपांतर होते. व शेवटी भांडवलाचे उत्पादन पद्धती व एकूणच आर्थिक जीवन प्रक्रियेवर नियंत्रण प्रस्थापित होते. अशा भांडवलशाही व्यवस्थेमध्ये तृय वस्तूंच्या उत्पादनावर अधिका अधिक भर दिला जातो याचा अर्थ अशा तृय वस्तूंचे उत्पादन हे तात्कालीन उपभोगापेक्षा विक्रीसाठीच असते. कारण तृय वस्तूंच्या निर्मितीतून केवळ नफा हेच उद्दिष्ट असल्यामुळे तृय वस्तूंच्याच उत्पादनांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केलेले असते.

भांडवलदार वर्ग व्यवस्थेत उत्पादनाच्या महत्त्वाच्या सर्व संसाधनावर खाजगी मालकी असते.त्यामुळे उत्पादन करणाऱ्या कामगार वर्गाकडून जरी उत्पादन होत असले तरी त्या उत्पादन मालमत्तेवर नियंत्रण त्यांच्याकडे नसते. या व्यवस्थेमध्ये कामगार स्वतःचे श्रम विकत असतो त्यामुळे श्रम हे देखील एक प्रकारची तृय वस्तूच बनत असते.कामगारांच्या आश्रमातून भांडवलाचा जो संचय होतो ते अतिरिक्त मूल्य हे कामगाराच्या पदरी न पडता भांडवलदार त्याला शोषण घेतात व अशा प्रक्रियेतूनच भांडवलदारांकडे अतिरिक्त भांडवलाचा साठा वाढत जातो. या व्यवस्थेमध्ये कामगारांच्या श्रमाचे अक्षरशः शोषण केले जाते. कामगारांनी केलेल्या श्रमाच्या मोबदल्यात त्यांना अतिशय तोकड अगदी नाच्या बरोबर मोबदला दिला जातो.

युरोपमध्ये सरंजाम व सामंतशाहीचे प्रस्थ असताना ही व्यवस्था उलथून टाकून भांडवलदार वर्गाचे आर्थिक व राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणारी जी क्रांती झाली तिला मभांडवलदार वर्गाची क्रांतीफ असे म्हटले जाते. या क्रांतीनंतरच आजच्या कालखंडामध्ये निर्माण झालेला भांडवलदार वर्ग हा प्रखरतेने समोर आलेला दिसतो. जमिनीच्या मालकी हक्का द्वारे शक्ती व सत्ता बाळगून असलेल्या सरंजामशाही वर्गाला नागरी व व्यापारी संपत्तीवर आधारित वर्गाने आव्हान दिले. हाच वर्ग पुढे 'भांडवलदार वर्ग' म्हणून पुढे आला. मार्क्सवादी सिद्धांतांमध्ये भांडवलदार वर्गाला 'बुर्जवाज (Bourgeoisie)' असा शब्दप्रयोग केला जातो. उत्पादन पद्धतीवरील स्थिती व स्थानांवरून अशा बुर्ज्वीजी वर्गाचे स्थान निश्चित होत असते जी महत्त्वाची सर्व उत्पादन साधने असतात त्यांच्यावर अशा बुर्ज्वीजी अथवा भांडवलदार वर्गाचा मालकी हक्क असतो.उत्पादनाच्या सर्व प्रक्रियेवर त्यांचेच भांडवलदार वर्गाचे अंतिम नियंत्रण असल्याने सर्व प्रकारचा कच्चा माल व तृय वस्तू ह्या त्यांच्याच कब्जात असतात. हा भांडवलदार वर्ग त्यांच्या उत्पादनासाठी अत्यावश्यक म्हणून लागणाऱ्या श्रमशक्तीचा तो ग्राहक असतो. त्यामुळे भांडवलदार वर्ग हा कामगारांना अतिशय अल्प दरावरील मजुरीवर ठेवतो. अशा कामगार वर्गाच्या श्रमातून निर्माण झालेल्या तृय वस्तूंचा संपूर्ण नफा भांडवलदार वर्गाकडून फस्त केला जातो. अशा भांडवलदार वर्गाचे प्राबल्य असणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेत हाच वर्ग सत्ताधारी बनवून शासनागांच्या सर्व धोरणात्मक स्थानांवर तो काबीज असतो. त्यामुळे त्या सत्तेचा उपयोग हा समाजाच्या सांस्कृतिक वैचारिक निर्मिती व उत्पादन श्रमतेवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी करवून घेतो.

भांडवली व्यवस्थेत अधिकाधिक लाभ व नफा प्राप्त करण्याच्या प्रयत्नातून कामगारांच्या श्रमशक्तीचे शोषण केले जाते. कामगारांच्या शोषणातून अनेकदा उत्पादन अतिरिक्त पातळीवर नेले जाते. लोकांच्या व कामगार वर्गाच्या क्रयशक्तीपेक्षा अति-लालसेपोटी भांडवलदार मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढवितात. भांडवलदार वर्ग अतिरिक्त नफा स्वतःच्या खिशात घालतो. कामगारांना केवळ त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाह पुरते वेतन दिले जाते. त्यामुळे कामगारांच्या मूलभूत गरजा देखील पूर्ण होऊ शकत नाहीत व जीवन जगण्याचा दर्जाच अत्यंत निष्कृष्ट पातळीवर पोहोचतो. भांडवलदार वर्ग स्वतः कधीच आर्थिक नुकसान सहन करत नाहीत. उलटपक्षी उत्पादन अति झाल्यामुळे भांडवलदार वर्ग कामगारांना कामावरून कमी करते. त्यामुळे कामगारांची बेकारी वाढत जाते. अशा कोणत्याही पार्श्वभूमीवर भांडवलदार वर्ग मात्र केवळ आपल्या नफ्याचा विचार करतो.

२. **मध्यम वर्ग** (Middle Class) :

मध्यमवर्ग हे अशा व्यक्ती आणि कुटुंबांना दिलेले वर्णन आहे जे सामान्यत: सामाजिक-आर्थिक पदानुक्रमामध्ये कामगार वर्ग आणि उच्च वर्ग यांच्यामध्ये येतात. पाश्चात्य संस्कृतींमध्ये, मध्यमवर्गीय लोकांकडे कामगार वर्गाच्या तुलनेत महाविद्यालयीन पदवीचे प्रमाण जास्त असते, त्यांच्याकडे उपभोगासाठी अधिक उत्पन्न असते आणि त्यांच्याकडे मालमत्ता असू शकते. मध्यमवर्गीय लोक सहसा व्यावसायिक, व्यवस्थापक आणि नागरी सेवक म्हणून काम करतात.

मध्यम वर्ग हा एक सामाजिक-आर्थिक स्तर आहे जो कामगार वर्ग आणि उच्च वर्ग यांच्यामध्ये येतो. मध्यमवर्गीय लोकांकडे सुट्ट्या किंवा रेस्टॉरंट्ससारख्या किरकोळ लक्झरी परवडण्यासाठी पुरेसे डिस्पोजेबल उत्पन्न आहे, घरे आणि कार यासारख्या मोठ्या वस्तूंसाठी कर्ज घेण्यावर देखील ते अवलंबून असतात. ''मध्यम'' हा शब्द दिशाभूल करणारा असू शकतो कारण ते सूचित करते की मध्यमवर्गीय लोकांची कमाई लोकसंख्येच्या उत्पन्न वितरणाच्या मध्यभागी आहे, जी कदाचित तशी नसेल. मध्यमवर्गीय कुटुंबांकडे स्वतःचे घर (गहाण असले तरी), कारची मालकी (कर्ज किंवा भाडेपट्ट्याने असली तरी), आपल्या मुलांना महाविद्यालयात पाठवण्याची प्रवृत्ती असते (विद्यार्थी कर्ज किंवा शिष्यवृत्ती असली तरी), सेवानिवृत्तीसाठी बचत करत असतात.

महाराष्ट्र व एकूणच भारतातील नवोदित मध्यमवर्गाने शिक्षण, प्रशासन, समाजकारण, अर्थकारण, राजकारण आणि साहित्य-संस्कृती या क्षेत्रांवर ताबा मिळवला आणि एकोणिसाव्या शतकाच्या इतिहासावर आपली मुद्रा उमटवली. या वर्गाने केवळ प्रांतिक समाजालाच नव्हे, तर देशालासुद्धा नेतृत्व पुरवले. ऐतिहासिक आढाव्यातून त्याच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे व वैविध्याचे आकलन होते. भारतीय उपखंडाच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थानामुळे अनेक प्रकारच्या लोकांनी या भागात स्थलांतर केले. स्थलांतरित लोक भारतीय समाजाचे भाग झाले. आर्य (आर्यांच्या स्थलांतराबाबतीत असलेले वाद बाजूला ठेवून, इतिहास व समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार), ग्रीक, पश्शयन, शक, कुशाण, पहलव, हुण, अरब, मंगोल, तुर्की, युरोपियन इत्यादी लोकसमूह भारतीय उपखंडात स्थलांतरित झाले. अशी स्थलांतरे व भारतीय उपखंडाचा मोठा प्रादेशिक विस्तार या घटकांनी भारतीय समाजाला वैविध्य प्रदान केले आहे. भारतीय समाजाची विविधता अनेक घटकांवर आधारित आहे. भारतामध्ये वंश, धर्म, जात, पंथ, संस्कृती, प्रदेश, भाषा इत्यादी घटकांवर आधारित विविधता आढळते. भारतीय समाजामध्ये नेग्रीटो, प्रोटो-ऑस्ट्रेलॉइड, मंगोलॉइड, मेडिटेरॅनियन, नॉर्डिक (आर्य) इत्यादी वंशाचे लोक आढळतात. यामधील पहिल्या तीन वंशांचे लोक मूळ भारतीय असल्याचे किंवा त्यांचे अस्तित्व सर्वाधिक जुने असल्याचे मानले जाते. भारतामध्ये हिदू, बौद्ध, जैन या धर्मांचा उदय झाला. याव्यतिरिक्त भारतात ख्रिश्चन, शीख, इस्लामिक, झोरास्ट्रियन (पारशी), ज्यू या धर्मांचेही अस्तित्व आहे. कबीरपंथी, सत्नामी, लिंगायत असे अनेक पंथ भारतीय समाजात निर्माण झाले. अनेक पंथांनी वेगळा धर्म असल्याचे दावे केले असले तरी त्यांचा समावेश हिदू धर्मामध्ये केला जातो. भारतीय समाजातील आदिवासी व भटक्या जमातींना आपापल्या धर्मात समाविष्ट करण्याचा प्रयत्न अनेक धर्मांनी केला. असे असले तरी या जमातींनी त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे जतन करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

**३. सबाल्टर्न** (Subalturn) :

वंचित समूह किंवा वंचित वर्गाची सर्वसमावेशक अशी व्याख्या झालेली नाही. परंतु सामाजिक शास्त्रामध्ये 'वंचित' हा शब्द जात, वर्ग, लिंग, वय, पद, प्रतिष्ठा इत्यादी आधारे इतर व्यक्ती व समूहांच्या अधीन असणाऱ्या लोकांच्या समूहाकडे निर्देश करते; म्हणूनच 'सामाजिक दुय्यमत्व' हे वंचित वर्गाचे मुख्य मानले जाते. वंचित समूहामध्ये अशा समाज घटकांचा अंतर्भाव होतो की, ज्यांच्या वाट्याला केवळ आणि

केवळ सामाजिक पराधीनता विवशतापूर्ण जीवन वाट्याला येते व हा वर्ग पूर्णतः उपेक्षित जीवन कंठीत असतो.

भारतामध्ये अशा उपेक्षित वर्गांची संख्या मोठी आहे. उदा. शेतामध्ये काम करणारे मजूर, सालदार, महिंदार, विभिन्न विशेषतः जोखमीच्या उद्योगांमध्ये राबणारे मजूर, बालमजूर, मेट्रोपॉलिटीन शहरे तसेच सर्वच शहरी भागात दैनंदिन मजुरीवर पोटाची खडकी भरणारे व रस्त्याच्या कडेला, पदपथावर आपले जीवन जगणारे मजूर, डोक्यावरून मैला वाहून नेणारे, शहरांमध्ये कचरा गोळा करणारे, घरकाम करणाऱ्या वृद्ध स्त्रिया, शरीर विक्रय करणाऱ्या महिला, अशा अनेक लोकांचा वंचित समूहांमध्ये समावेश होतो. हा वंचित समूह निष्ठा व समर्पणाने आपले कार्य करीत असतो व त्यातूनच राष्ट्रबांधणीला आकार देखील मिळत असतो. परंतु त्यांना आत्मसन्मान प्रतिष्ठा व समाजाच्या मुख्य प्रवाहातील जीवन जगण्याच्या दर्जा पासून कायमच वंचित ठेवले जाते.

सबाल्टर्न ही संकल्पना समाजातील अशा बहुसंख्य लोकांबाबत वापरली जाते की जो समूह हा समाजात अतिशय कनिष्ठ दर्जाचा गणला जातो. इटालियन विचारवंत अंतोनिओ ग्रामसी याने सबाल्टर्न ही संकल्पना संज्ञा समोर आणली. ऑक्सफर्ड शब्दकोशामध्ये सबाल्टर्न चा अर्थ ऑफ इंटरियर रँक असाच अर्थ दिलेला आहे. ज्याचा अर्थ कनिष्ठ किंवा हीन दर्जा असा होतो. अर्थात समाजातील लोकांचा असा समूह जो आपल्या मूलभूत मानवी अधिकारांपासून वंचित असतो. लोकसमूहांची वंचितता सांगण्यासाठी ग्रामसिने इटालियन सैन्यामध्ये वापरली जाणारी सबाल्टन ही सौज्ञा समाजातील अशा कनिष्ठ गणल्या जाणाऱ्या समूहाची वंचितता आणि त्या संदर्भातील त्याची जाणीव व्यक्त करण्यासाठी वापरलेली दिसून येते.

ग्रामसीने इतिहासाकडे बघण्याचे दोन दृष्टिकोन स्पष्ट केले आहेत. त्यातील एक म्हणजे सत्ताधारी वर्ग आणि दुसरा म्हणजे वंचित वर्ग. ग्रामसी सत्ताधारी वर्गाचे ऐतिहासिक एकत्व राज्यसंस्थेमध्ये शोधण्याचा प्रयत्न करतो आणि स्वाभाविकपणे सत्ताधाऱ्यांचा इतिहास हा राज्यसंस्थेची निगडित असतो. तसेच ग्रामसी वंचिततेचा इतिहास सुद्धा राज्यसंस्थेची निगडित असल्याचे सांगून वंचितांचा इतिहास समजून घेण्यासाठी तो काही महत्त्वपूर्ण आधार सुचवितो त्यामध्ये उत्पादन प्रक्रियेमध्ये वंचित समाज गटांची होणारी निर्मिती आणि विकास सत्ताधारी किंवा वर्चस्ववादी राजकीय प्रक्रियेशी वंचितांचा सक्रिय किंवा निष्क्रिय संबंध आणि अशा वर्चस्ववादी राजकीय व्यवस्था प्रक्रियेवर वंचितांनी टाकलेला प्रभाव आणि स्वतःचा हक्क सांगण्याचा प्रयत्न वर्चस्ववादी समूहाकडून वंचित समूहांना नियंत्रित करण्यासाठी नवनवीन पक्षांची निर्मिती वंचित समूहांनी स्व अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली निर्मिती जुन्या व्यवस्थेमध्ये आपल्याला स्वायत्वता मिळविण्यासाठी वंचित समूहांचा प्रयत्न आणि एकूणच एकात्मते अंतर्गत वंचिताकडून आपल्यासाठी आवश्यक स्वायत्तता निर्माण करण्याचा प्रयत्न. या मूलभूत स्वरूपाच्या आधारे वंचितांच्या इतिहासाचा विचार होणे आवश्यक असल्याचे ग्रामसिने प्रतिपादन केले आहे.

रणजीत गुहा यांनी सबाल्टर्न स्टडीज पार्ट १ - रायटिंग ऑन साउथ एशियन हिस्टरी अँड सोसायटी (Subaltern studies - Part 1 - writing on South Asian history and society). हा संपादित

केलेला ग्रंथ ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस ने १९८२ मध्ये प्रकाशित केला या संपादित ग्रंथामुळे सबाल्टर्न इतिहास लेखनाला चालना मिळाल्याचे स्पष्ट होते. रंजीत गुहा यांनी या ग्रंथाच्या पहिल्या खंडातील प्रस्तावनेमध्ये दक्षिण आशियामध्ये ज्ञानक्षेत्र व संशोधन यामधील अभिजन इलाईट पक्षपातीपणा दुरुस्त करण्याचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट केले. अभिजन वर्गाने वंचित समूहांना हेतू पुरस्तर आणलेले हिनत्व व दुय्यमत्व किंवा अंकितता हे वय जात लिंगभाव वर्ग पद आणि अशाच इतर बाबींच्या संदर्भामध्ये तपासले जाते अर्थात समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या दूर असणाऱ्या वंचितांच्या इतिहासाचा व त्यांच्या समाज जाणीवांचा वस्तुनिष्ठ अभ्यास यामध्ये अनुस्यूत असल्याचे यावरून स्पष्ट होते.

रंजीत गुहा यांनी अभिजन (इलाईट) या संकल्पनेच्या संदर्भात वंचित सबाल्टर्न ची व्याख्या केलेली आहे. रंजीत गुहांच्या मते भारतीय सामाजिक स्थितीचा विचार करता अभिजन ही संज्ञा वर्चस्ववादी गटाला निर्देशित करते. वंचिततेचा अभ्यास अर्थात सबाल्टर्न स्टडी कुठल्याही प्रकारच्या वर्चस्व वादाला किंवा अभिजन वादाला स्पष्टपणे नाकारते. सबाल्टन ही संकल्पना जाणीवकेंद्री इतिहास लेखनाची भूमिका स्वीकारून त्याकरिता मानवशास्त्र, उत्तर आधुनिकतावाद, संरचनावादी व उत्तर संरचनावादी भाषाशास्त्र आधी

वर्चस्वी (Domination) आणि अंकितता / वंचितता दुय्यमत्व सबओर्डीनेशन (Subordination) यांच्या संदर्भातच सत्ता संबंधाची मूलभूत बैठक तयार होते व त्यावर आधारित अभिजन सबाल्टर्न असा द्वंद्वात्मक विरोध तयार होतो. अर्थात असे द्वंद हे वर्ग संघर्षाच्या आधारावर समजून घेता येणार नाही. म्हणूनच अभ्यासकांनी सबाल्टर्न इतिहासकारांनी मार्क्सस्वादी इतिहासकारांच्या भूमिकेचे खंडन केलेले आहे.

इतिहासकारांनी वसाहतवादी व राष्ट्रवादी अभ्यासक हे अंकित लोकांना आत्मभान, स्वजाणिवा नसतात अशी धारणा बाळगून इतिहासाकडे बघतात व मांडणी करतात. सबाल्टर्न अभ्यास अशा धारणांचे तर्काधारित खंडन करतात.

सबाल्टर्न चा अभ्यास करण्यामध्ये रणजीत गुहा, पार्थ चॅटर्जी, डेव्हिड हार्डीमन, दीपेश चक्रवर्ती, शाहिद अमीन, सुसी थारु, जुली स्टीफनसन, गौतम भद्रा, ग्यान प्रकाश, गायत्री स्पीवाक, सुमित सरकार, बर्नार्ड कोहन, कांचा ईलाया, गोपाल गुरु, आदी अभ्यासकांचा समावेश होतो. अभिजन, वर्चस्वी इतिहास लेखनाला तर्काधारित विरोध करून अंकित, दुय्यमत्व अर्थात सबाल्टन जाणीव केंद्रस्थानी ठेवून इतिहास लेखन करणे हे सबाल्टर्न स्टडीजचे मुख्य उद्दिष्ट आहे. पार्थ चॅटर्जींच्या मते, अभिजनवादी इतिहासलेखनाला नाकारल्यानंतर जो अवकाश निर्माण झाला त्यामध्ये सबाल्टन जाणीवेने इतिहासाची मांडणी सबाल्टन इतिहासकारांची जबाबदारी आहे. वंचितांच्या लढे, चळवळी या अभिजन शोषण व दमनाचा प्रतिवाद व प्रतिकारातून समोर आल्या आहेत.

## ३.३ सारांश :

प्रस्तुत घटक 'भारतीय राजकीय समाजशास्त्र' या अंतर्गत आपण भारतीय समाजाचे राजकीय समाजशास्त्रीय स्वरूप समजून घेतले. भारतीय राजकीय समाजशास्त्रामध्ये प्रगत जाती, वर्चस्वशाली जाती व मागासवर्गीय जाती अशा वर्गवारी मध्ये जाती व्यवस्थेला समजून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. तसेच या

तीनही जाती समूहांमध्ये मागासवर्गीय जातीसमूह हा प्रगत व वर्चस्वशाली जातीसमूहापेक्षा आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या आजही सर्वाधिक मागासलेल्या स्थितीत असल्याचे अभ्यासांती स्पष्ट होते. जवळपास सर्वच सत्तेच्या केंद्रावर आजही प्रगत व वर्चस्वशाली जातींचीच मक्तेदारी पहावयास मिळते. प्रत्येक जाती समूहांमध्ये जातीची उतरंड दिवसेंदिवस सैल न होता अधिकाधिक घट्ट होताना आढळून येते आहे.

भारतीय राजकीय समाजशास्त्रामध्ये जाती बरोबरच वर्ग व्यवस्था देखील महत्त्वाची आहे. कारण या जातींमध्ये आर्थिक दृष्ट्या प्रबळ व दुर्बळ असे वर्ग निर्माण झालेले दिसून येतात. भारतामध्ये भांडवलदार वर्ग, मध्यम वर्ग व सबाल्टर्न वर्ग निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. भारतात बोटांवर मोजण्या इतक्या भांडवलदाराकडे आज देशाची जवळपास सत्तर टक्के पेक्षा अधिक संपत्ती असल्याचे दिसून येते. उपभोगजन्य असा भारतात सर्वाधिक संख्येने मध्यमवर्ग निर्माण झाल्याचे स्पष्ट होते. हा मध्यमवर्ग देशाच्या सत्ता कारणावर देखील परिणाम करताना आढळून येते. भांडवलदार व मध्यम वर्गाबरोबरच सबाल्टर्न या वर्गाच्या अध्ययनाचे महत्त्व आज वाढलेले दिसते, सबाल्टर्न वर्ग म्हणजे असा वंचित, उपेक्षित समाज घटक की ज्याच्या एकूणच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय योगदानाची चर्चा समाजाच्या मुख्य प्रवाहातून बेदखल करण्यात आली. आज या वर्गात आपल्या कार्यकर्तृत्वाच्या आत्मभान व स्वाभिमानाच्या जाणिवा प्रखर होत आहेत. परिणामी सबाल्टर्नचे अध्ययन हे मुख्य प्रवाहातील सर्वच सत्ता केंद्रांना दखलपात्र बनवते आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

**भांडवलशाही :** भांडवलशाही हा शब्द एक विशिष्ट प्रकारची उत्पादन पद्धती अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचनेकरिता वापरली जाते. भांडवलशाहीमध्ये क्रय वस्तूंचे उत्पादन होते. निव्वळ नफा प्राप्त करणे हीच उत्पादनाची मूळ प्रेरणा असून उत्पादन साधनावर खासगी मालकी असते.

**भांडवलदार वर्ग :** ऐतिहासिक परिप्रेक्ष्यामध्ये भांडवलशाही अर्थ व समाजव्यवस्थांमध्ये प्रामुख्याने दोन वर्ग आढळून येतातः एक, भांडवलदार वर्ग; ज्याच्याकडे मालाचे उत्पादन आणि वितरण (मालक) करण्याची साधने आहेत. दोन, कामगारवर्ग; समाजातील असा समूह जो मजुरीच्या बदल्यामध्ये भांडवलदार वर्गाला आपले श्रम विकतो.

**वर्ग व्यवस्था :** वर्ग व्यवस्था ही व्यक्तिगत गुण व सामाजिक घटक या दोन्हींवर आधारित असते. वर्गामध्ये संपत्ती, उत्पन्न, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी आणि व्यवसाय यासारख्या घटकांवर आधारित समान स्थिती सामाजिक करणाऱ्या लोकांचे संघ असतो.

**वर्ण व्यवस्था:** हिंदू धर्म शास्त्रातील वर्णव्यवस्था ही समाजाला चार वर्णामध्ये विभागते. त्यामध्ये- ब्राह्मण, क्षेत्रिय, वैश्य आणि शूद्र हे ४ वर्ण सांगितलेले आहे. या व्यवस्थेनुसार जे लोक त्यांच्या गंभीर पापांमुळे ह्या व्यवस्थेतून बाहेर पडतात. त्यांना बहिष्कृत अर्थात अस्पृश्य म्हणून बहिष्कृत केले जाते आणि वर्ण व्यवस्थेच्या बाहेर मानले जाते.

**वर्चस्वशाली जाती :** वर्चस्वशाली जातीमध्ये अशा जातींचा समावेश होतो की जी जात संख्यात्मक दृष्ट्या इतर जातींपेक्षा अधिक असते आणि या जातीचे लोक हे आर्थिक व राजकीय दृष्ट्या शक्तिशाली असतात. वर्चस्वशाली जातीची संकल्पना ही सर्वप्रथम १९५९ मध्ये समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी मांडली होती.

**प्रगत जाती :** प्रगत जाती या अशा जाती आहेत की, ज्या समाजातील इतर जातींपेक्षा आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या तुलनेने फार पुढे मानल्या जातात. भारतामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तसेच मागासवर्गीय जातींच्या आरक्षणाच्या यादीमध्ये सूचीबद्ध नसलेल्या जातींना दर्शविण्यासाठी 'प्रगती जाती' हा शब्दप्रयोग केला जातो.

**मागासवर्गीय जाती :** भारताच्या मध्यवर्ती शासनाकडून आपल्या काही नागरिकांचे त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेपणावर आधारित, अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्ग (OBC) असे मागासवर्गीय जातींचे वर्गीकरण केले आहे.

**सबाल्टर्न :** सबाल्टर्न म्हणजे सामाजिक व राजकीय मुख्य प्रवाहाच्या बाहेरील किंवा समाजाच्या मुख्य प्रवाहातील पदानुक्रमात कमी पत असलेली व्यक्ती. सबाल्टर्न याचा अर्थ समाजातील असा समूह जो सामाजिक, राजकीय, व आर्थिक दृष्ट्या शोषित, पीडित, उपेक्षित व वंचित वर्ग होय.

## ३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. मध्यमवर्ग म्हणजे काय?

२. भारतातील वर्चस्वशाली जातीची उदाहरणे कोणती आहेत?

३. वर्ण व्यवस्था म्हणजे काय?

४. भांडवलशाहीचा अर्थ सांगा?

## ३.६ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे :

१. मध्यम वर्ग हे अशा व्यक्ती आणि कुटुंबासाठी केलेले वर्णन आहे, जे सामान्यत: सामाजिक-आर्थिक पदानुक्रमामध्ये कामगार वर्ग आणि उच्च वर्ग यांच्यामध्ये येतात. पाश्चात्य संस्कृतींमध्ये, मध्यमवर्गीय लोकांकडे कामगार वर्गाच्या तुलनेत महाविद्यालयीन पदवीचे प्रमाण जास्त असते, त्यांच्याकडे उपभोगासाठी अधिक उत्पन्न असते आणि त्यांच्याकडे मालमत्ता असू शकते. मध्यमवर्गीय लोक सहसा व्यावसायिक, व्यवस्थापक आणि नागरी सेवक म्हणून काम करतात.

२. आंध्रमधील रेड्डी आणि कम्मा, बिहारमधील भूमिहार आणि राजपूत आणि कर्नाटकातील लिंगायत आणि वोक्कलिग, गुजरात मधील जाट आणि पटेल महाराष्ट्रामध्ये मराठा ही वर्चस्वशाली जातीची उदाहरणे आहेत.

३. हिंदू धर्म शास्त्रातील वर्णव्यवस्था ही समाजाला चार वर्णामध्ये विभागते. त्यामध्ये– ब्राह्मण, क्षेत्रिय, वैश्य आणि शूद्र हे ४ वर्ण सांगितलेले आहेत. या व्यवस्थेनुसार जे लोक त्यांच्या गंभीर पापांमुळे ह्या व्यवस्थेतून बाहेर पडतात. त्यांना बहिष्कृत अर्थात अस्पृश्य म्हणून बहिष्कृत केले जाते आणि वर्ण व्यवस्थेच्या बाहेर मानले जाते.

४. भांडवलशाही हा शब्द एक विशिष्ट प्रकारची उत्पादन पद्धती, अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचनेकरिता वापरली जाते. भांडवलशाहीमध्ये क्रय वस्तूंचे उत्पादन होते. निव्वळ नफा प्राप्त करणे हीच उत्पादनाची मूळ प्रेरणा असून उत्पादन साधनावर खासगी मालकी असते.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय :

१. जात म्हणजे काय? ते सांगून जातीव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

२. भारतात प्रगत जाती व वर्चस्वशाली जातींमध्ये फरक स्पष्ट करा.

३. मागासवर्गीय जाती म्हणजे काय? ते सांगून मागासवर्गीय जातींच्या संवेधानिक संरक्षणाची चर्चा करा.

४. वर्ग या संकल्पनेचा अर्थ सांगून कार्ल मार्क्सचा वर्ग सिद्धांत स्पष्ट करा.

५. भांडवलदार वर्गाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६. भारतात मध्यम वर्गाच्या उदयाची कारणे विशद करा.

७. सबाल्टर्नचा अर्थ सांगून सबाल्टर्न अभ्यासाचे महत्त्व सविस्तर स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचणासाठी पुस्तके


१) आंबेडकर बी. आर., (१९१७) कास्ट्स ईन इंडिया, देअर मेकॅनिझम, जेनेसिस अॅण्ड डेव्हलपमेंट, व्होल्यूम XLI, इंडियन अॅण्टीक्वेटी, अ जर्नल ऑफ ओरिएंटल रिसर्च बॉम्बे एज्युकेशन सोसायटी.

२) श्रीनिवास एम. एन., (१९८०) द रिमेम्बर्ड व्हिलेज, युनिव्हर्सीटी ऑफ कोलंबीया प्रेस, लिमिटेड, लंडन.

३) सिंग एकता, (२००५) कास्ट सिस्टम ईन इंडिया; अ हिस्टॉरीकल पर्सपेक्टीव्ह, कल्पझ पब्लिकेशन, नोएडा.

४) गुरु गोपाल, (२०१५) वर्चस्व आणि सामाजिक चिकित्सा, हरिती पब्लिकेशन्स, पुणे.

५) पवार प्रकाश, (२०११) समकालीन राजकीय चळवळी इ नवहिंदुत्व व जातसंघटना, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

६) सिंह हिरा, (२०१९) जातिव्यवस्थेची नवी समीक्षा पवित्रतेकडून अपवित्रतेकडे, SAGE पब्लिकेशन्स, नवी दिल्ली.


❑❑❑

## सत्र २ : घटक ४
## भारतातील लिंगभाव आणि राजकारण

### ४.० उद्दिष्ट्ये :

- लिंगभाव म्हणजे काय व लिंगभावाचे स्वरूप समजून घेणे.
- लिंगभाव आणि राजकारण अभ्यासणार आहोत.
- लिंगभाव पुरुषप्रधानतेच्या इतिहासाच्या संदर्भात स्त्री विषमतेचे अध्ययन करणे.
- लिंगभावची वैशिष्ट्ये समजून घेणे.
- भारतातील लिंगभाव आणि राजकारणाचे अध्ययन करणे.

### ४.१ प्रास्ताविक :

समाजाच्या अस्तित्वासाठी आणि सातत्यासाठी स्त्री पुरुष हे दोन्ही घटक अनिवार्य आहेत. समाजाची प्रगती ही या दोन्ही घटकांच्या प्रगतीवर अवलंबून आहे. खऱ्या अर्थाने समाजविकास व्हायचा असेल तर स्त्री पुरुष दोहोंचा समान पातळीवर विकास होणे गरजेचे आहे. पण प्राचीन काळापासून पुरुषांनी स्त्रीवर आपले वर्चस्व निर्माण करून त्यांना गुलाम केले. सर्व क्षेत्रावर आपले प्रभुत्व टिकून राहण्यासाठी प्रामुख्याने लिंगभाव पितृसत्तेला पोषक असणारी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिकव्यवस्था निर्माण केली गेली. समाजव्यवस्था ही कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या शोषणावर आधारलेली असते म्हणूनच ती सामाजिक पातळीवर विषमता निर्माण करते ही विषमता वेगवेगळ्या पद्धतीची असते यामध्ये गुलामगिरी सरंजामी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या रूपाने तर कधी वसाहतवाद वंशवाद वर्ण जातीव्यवस्था किंवा लिंगभावात्मक भेदानुसार निर्माण होते. मात्र या विषमतेची रूपे अनेक असली तरी तिचे कार्य समान असते ते म्हणजे व्यवस्था अंतर्गत शोषणास अनुरूप समाज रचना निर्माण करणे या अर्थाने या प्रकरणांमध्ये आपण लिंगभाव म्हणजे काय हे समजून घेणार आहोत. प्रबोधनाच्या माध्यमातून झालेले बदल व वैचारिक परिवर्तनातून उदयास आलेल्या स्वातंत्र्य, समानता, बंधुता या मानवी मूल्यांमुळे स्त्रियांना अधिकारांची जाणीव झाली आणि स्त्रियांच्या अधिकारांच्या चळवळी उदयास आल्या प्रबोधनोत्तर युगातील सर्व मुक्तीलढे हे कुठल्या ना कुठल्या विषमतेच्या विरोधात उभे ठाकल्याचे दिसून येते. शेतक-यांच्या व कामगारांच्या मुक्तीलढयांनी आर्थिक विषमतेवर हल्ला केला तर राष्ट्रीय मुक्ती आंदोलने वासहातिक विषमतेच्या विरोधात उभी राहिली. जातीमुक्तीची आंदोलने वर्ण-जातव्यवस्था, जन्म विषमतेच्या विरोधात दंड थोपटून उभी राहिली तर वर्णद्वेषविरोधी मुक्तीलढे वांशिक विषमतेच्या विरोधात उभे राहिले. स्त्रीमुक्तीचा लढा हा देखील स्त्री-पुरुष लिंगभाव विरोधातच सुरु झाल्याचे दिसते.

## ४.२ विषय विवेचन :

लिंगभावचे राजकारण या माध्यमातून सामाजिक आणि खाजगी जीवनातील पुरुषी वर्चस्वाच्या रचनेला आव्हान देऊन नष्ट करू पाहते. १९७० च्या दशकातील स्त्री आणि पुरुष यांच्यातील राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून पुरुषांचे स्त्रियांवर प्रस्थापित होणाऱ्या सत्तेचे विश्लेषण केले जाऊ लागले. लिंगाच्या दर्जा विषयी समकालीन समाजाला समाजात उपलब्ध असलेल्या संबंधात सत्ता संदर्भ अस्तित्वात आहे. या सत्ता संबंधाचा शोध घेणे लिंग आणि लैंगिकता किंवा लिंगभाव हा राजकीय घटक आहे ही जाणीव विकसित करणं पुरुषप्रधान व्यवस्था ही सामाजिक संस्था नसून राजकीय संस्था आहे हे सिद्ध करणे आणि विसाव्या शतकामध्ये स्त्री आणि पुरुष लिंगामधील परंपरागत संबंधांमध्ये आलेल्या बदलाचा एकूण विचार करून भविष्यामध्ये लिंगभाव या संकल्पनेतून स्त्री-पुरुष समांतर विकास साध्य करणे लैंगिक क्रांती करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

### ४.२.१ लिंगभाव : अर्थ आणि स्वरूप (Meaning and Nature of Gender ) :

लिंगभावाच्या आधारे तत्कालीन १९६० च्या दशकात स्त्री चळवळीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधले राजकीय विचारप्रणाली असलेल्या स्त्रियांनी आपल्या जहाला अस्मिता व्यक्त करण्यासाठी मानवी संबंधाच्या मुळापासून विचार करून स्त्रीलाच स्वतंत्रपणे जीवन जगण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती संघटना आणि विचारांचा त्यात समावेश होता पुरुषसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांना दिलेले दुय्यमत्व नाकारुन सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने स्थान प्राप्त करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न स्त्री विचाराच्या लिंगभाव विरोधी चळवळीच्या माध्यमातून मुख्य स्वरूप मानले. स्त्री देवता, दासी ,कुलटीन गृहिणी व्यभिचारी, शोभेची बाहुली, भोग वस्तू आणि सौंदर्याची देवता इत्यादी समाज व्यवस्थेने दिलेल्या परस्पर विरोधी प्रतिमाच महत्व कमी करून स्त्री जीवनाबद्दल नव्या प्रतिमांची निर्मिती करणं हे लिंगभाव विरोधी चळवळीचे मोठं आव्हान म्हणावं लागेल स्त्रियांना खऱ्या अर्थाने स्त्रियात्व प्राप्त करून देणं आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून देणे हे आव्हान देखील होते. The Female is Female by virtue of a certain lack of qualities या ॲरिस्टॉटलच्या कालखंडापासून चालत आलेल्या विचारधारेचा प्रतिकार करून स्त्री जीवनविषयक नवीन मापदंड निर्मितीची व्यवहार रचना करण्यात ही लिंगभाव आधारित पुरुषप्रधान व्यवस्थाविरोध ही भूमिका आहे. नव समाज निर्मितीसाठी स्त्री अस्मितेला प्राधान्य देणाऱ्या नव्या पर्यायाची मांडणी हे आधुनिक स्त्री चळवळीचे मुख्य कार्य आहे स्त्रियांनी मातृत्व आणि ग्रहस्थ जीवन या पारंपारिक लिंगभाव आधारित कर्मकांडातून रममाण न होता प्रत्येक क्षेत्रात समानतेच्या पातळीवर पुरुषाच्या बरोबरीने सहभागी होऊ ने आवश्यक आहे. स्त्री ही परावलंबी व्यक्ती नसून पुरुषाप्रमाणे स्वतंत्र व कृतिशील व्यक्ती आहे हे तिने सिद्ध करणे गरजेचे आहे आणि यातूनच लिंगभाव आधारित दुय्यमत्व न स्वीकारता पुरुषाप्रमाणे स्वतंत्र व कृतिशील व्यक्ती आहे हे सिद्ध करणे गरजेचे आहे. जगभरातील सर्व संस्कृतींनी पुरुषांना केंद्रस्थानी मानले आणि स्त्रियांना परिघाबाहेर टाकलेले संस्कृतीने लादलेल्या बंधनामुळे तिचे मानसिक खच्चीकरण झाले. स्त्रियांची ही गुलामगिरी नैसर्गिक नसून समाज निर्मित आहे. या गुलामगिरीची जाणीव स्त्रीला झाल्याने तिने

बंड करण्यास सुरुवात केली. प्रस्थापित लिंगभाव आधारित पुरुषप्रधान व्यवस्थेला हादरा देण्यासाठी लेखणी आणि वाणी या कृतीतून स्त्रिया प्रयत्न करू लागल्या. स्त्रियांना समाजरचनेत पुरुषाप्रमाणे अर्थपूर्ण स्थान प्राप्त करण्यासाठी संघर्ष करणे, समाजातील धर्मसंस्था कुटुंबसंस्था आणि इतर संस्था मधला लैंगिक भेदभाव उघड करणे, विविध क्षेत्रात प्रस्थापित झालेल्या लिंगभाव आधारित मूल्यांना प्रश्नांकित करण्यात नव समाज निर्मितीसाठी विविध पर्यायाची चाचणी करणे हे आधुनिक लिंगभाव विरोधी स्त्री चळवळीचे मुख्य स्वरूप मानले जाते.

**पुरुषी वर्चस्व**

पाश्चिमात्य देशांत १९६० सालानंतर उदयाला आलेल्या स्त्री चळवळीने 'पितृप्रधान' वा 'पुरुषप्रधान' किंवा 'पितृसत्ताक' समाज व्यवस्था ह्या शब्द प्रयोगाला नवा अर्थ दिला. तत्पूर्वी सरंजामशाहीपूर्व व सरंजामशाही समाजातील पुरुषांच्या परंपरा-प्राप्त, श्रेणीबद्ध व कुटुंब प्रमुख वा पिता ह्या नात्याने असलेल्या प्रभुत्वाला 'पितृप्रधान' समाजव्यवस्था असे नाव मिळाले होते. अशा समाजातील राजकीय व आर्थिक रचना पुरुषा- पुरुषांमधील संबंधातून निश्चित होत असे. परंतु १९६० सालानंतर, विशेषतः जहाल स्त्रीवाद्यांनी, जगातील सर्व ऐतिहासिक समाजव्यवस्था लिंगभावात्मक पुरषशाही स्वरुपाच्याच आहेत अशी मांडणी केली. त्यांच्या मते, आजचे सर्व समाज, मग ते सरंजामशाही, भांडवलशाही अथवा टोळ्यांच्या अवस्थेत असले तरी पुरुष वर्चस्वशाली असतात. पुरुषशाही म्हणजे लिंग नावाच्या जन्मबद्ध कसोटीच्या आधारावर ठरविली गेलेली श्रेणीबद्ध समाजव्यवस्था. लष्कर, उद्योगधंदे, तंत्रज्ञान, विद्यापीठे, विज्ञान, राजकीय पदाधिकार, वित्तव्यवहार तसेच पोलिसांच्या हातातील दमनशक्ती म्हणजेच समाजातील सत्तेकडे जाणारी प्रत्येक वाट संपूर्णपणे पुरुषांच्या ताब्यात असते. अशा व्यवस्थेत भिन्न वर्ग, वंश किंवा संस्कृती ह्यामधील पुरुष भिन्न-भिन्न पायऱ्यांवर असतात. परंतु आपापल्या स्त्रियांवर वर्चस्व टिकविण्यासाठी मात्र त्यांच्यात एकजूट व समान हितसंबंध असतात. बहुतेक सर्व समाजांत जेथे समाजमान्य, प्रतिष्ठित लिंगभाव आधारित श्रमविभागणी दिसते. तेथे स्त्रियांच्या श्रमाला हमखास कनिष्ठ दर्जा दिलेला आढळतो. पुरुषी सत्तेचा भौतिक पाया म्हणजे स्त्रियांच्या श्रमशक्तीवर व लैंगिकतेवर असलेले पुरुषांचे नियंत्रण होय. मानवी जीवनातील सर्व उतरंडीचे ते मुळातले प्रारूप आहे. त्यांच्या मते, लिंगभावात्मक पुरुषशाही ही एक अत्यंत मूलभूत अशी सामाजिक संरचना आहे आणि ती उखडली गेली तरच आजचा 'स्त्री-पुरुष' नावाने ओळखला जाणारा नरमाद्यांचा समाज संपेल आणि खऱ्या माणुसकीच्या इतिहासाला सुरुवात होईल. हे होण्यासाठी स्त्री-पुरुषांच्या शारीरिकतेवर आधारलेली कुटुंबव्यवस्था, समाजातील स्त्री-पुरुष विषमतेवर आधारलेली लैंगिक श्रमविभागणी, स्त्री-पुरुषांना मिळणाऱ्या लिंगबद्ध भूमिका मूलतः बदलल्या पाहिजेत असे लिंगभाव विरोधीचळवळ म्हणते.लिंगभाव आधरित पुरुषशाही ही संकल्पना देहनिष्ठ (Biologistic) होऊ नये असा प्रयत्न समाजवादी स्त्री चळवळीने केला. त्यांनी लिंगभाव पुरुषप्रधानतेचा इतिहासाच्या संदर्भात विचार केला. त्यांच्या मते, भांडवलशाहीच्या उदयाबरोबर पुरुषशाही व्यवस्थेला प्रारंभ होतो. स्त्रियांच्या शोषणाचा भौतिक पाया कोणता ह्याची मांडणी करताना, स्त्रियांच्या श्रमशक्तीवर पुरुषांचा ताबा असतो. लिंगभाव आधरित

पुरुषशाही हीच एक उत्पादनव्यवस्था मानली आहे. व घरकाम, रोजगार, शासनव्यवस्था, पुरुषी हिंसाचार आणि लैंगिकता ह्या घटकांनी ही व्यवस्था निर्माण होत असते.

स्त्री व पुरुष हे समाजाच्या अस्तित्वासाठी आणि सातत्यासाठी आवश्यक आहेत. समाजाची उन्नती या दोघांवर अवलंबून असते. परंतु स्त्री व पुरुष यांच्यामधील लिंगभाव आधरित भेदभाव नैसर्गिक व शारीरिक जैविक भिन्नतेमुळे निर्माण झालेला असला तरी स्त्री व पुरुष म्हणून घडवण्याची प्रक्रिया मात्र सामाजिक सांस्कृतिक असते. लिंग आधारित स्त्रीचे शरीरधर्माचे प्रजोउत्पादन हे अत्यंत महत्वपूर्ण आणि निर्मितीक्षम कार्यच स्त्री आधारित लैंगिकता ओळख अधिक बिंबवण्यास कारणीभूत ठरते. प्राचीन काळापासून म्हणजेच मानवी इतिहासाच्या टप्प्यावर म्हणजे माणूस शेती करू लागल्या वर जमिनीतून अतिरिक्त उत्पादन घेऊ लागला व खाजगी संपत्तीचा उदय झाला त्याच वेळी त्याच्याही बाब लक्षात येऊ लागली की स्त्रिया कडेच प्रजोउत्पादनाची क्षमता आहे आणि स्त्रियास होणारे अपत्य हे आपलेच राहावे यासाठी स्त्रियांच्या लैंगिक आचरणावर निर्बंध घातले गेले हे निर्बंध कित्येक वर्षानंतरही कायम राहिले कारण स्त्री पुरुष मधील विशेषतः लैंगिकतेवरील बंधने या समाजाची मान्यता कोणत्याही विरोधाशिवाय सहजासहजी मिळते. लिंगभाव म्हणजे काय जेंडर/ लिंगभाव हा शब्द समाजशास्त्रीय अर्थाने अथवा संकल्पनात्मक वर्गीकरणासाठी केला जातो. मात्र राजकीय अर्थाने जेंडर या संज्ञेचा वापर स्त्री व पुरुषांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी करतात, म्हणजेच त्यास लिंगभाव असे म्हणता येईल. स्त्री पुरुषाचे स्थान व भूमिका यात मूलभूत भेद सामाजिक पातळीवर कसा केला जातो म्हणजेच सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेत स्त्री व पुरुष यामधील वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषणाच्या प्रारूप म्हणून ही संकल्पना वापरली जाते सर्वसाधारणपणे स्त्रियांचे दुय्यमत्वाचे कारण त्यांच्या शरीरचनेत आहे असे मानण्याची प्रवृत्ती आहे तिचा प्रतिवाद करण्यासाठी लिंगभाव/ लिंग यातील फरक स्पष्ट केला गेला. अशाप्रकारे जन्मापासून मुलामुलींसाठी सामाजिक आणि सांस्कृतिक असा कृतीकार्यक्रमच आखून दिला जातो. यालाच लिंगभाव म्हणता येईल. प्रत्येक समाज नर-मादीला हळूहळू एक स्त्री व एक पुरुष म्हणून घडवतो. स्त्रीत्व व पुरुषत्व हे लिंगभाव (बाईपणा व पुरुषपणा) वेगळ्या भूमिका, वेगळे गुण, हक्क, जबाबदाऱ्या, अपेक्षा व वर्तनप्रकार ह्यातून घडवले जाते. लिंग जैविक घटकांनी ठरते परंतु स्त्रिया व पुरुषांच्या लिंगभावाशी निगडित अस्मिता मानसिक व सामाजिक पातळीवर म्हणजेच ऐतिहासिक व सांस्कृतिक घटकांनी ठरतात.

लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरुषांची बाईपणात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सूचित होते. एखादी व्यक्ती स्त्री की पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाईपण पुरुषपण मात्र स्थळकाळानुरूप बदलणाऱ्या सांस्कृतिक सामाजिक व राजकीय मुद्यावर ठरते. म्हणजेच लिंग हे वैशिष्ट्य स्थिर असते. लिंगभाव मात्र बदलत असतो हे स्वीकारायला हवे. शेवटी ॲन ओकले म्हणतात की लिंगभावाला जैविक मूळ नसते. म्हणजेच लिंग व लिंगभावातील संबंध 'नैसर्गिक' अजिबात नाहीत.

**लिंग आणि लिंगभाव**

लैंगिक पातळीवर मुलगा मुलगी हे देहपातळीवर भिन्न असतात. परंतु त्यांचे रुपांतर स्त्री-पुरुषांमध्ये होते तेव्हा ह्या भिन्नतेचे लिंगभाव विषमतेमध्ये रुपांतर होते. ही लिंगभाव विषमता सामाजिक प्रक्रियेत घडविली

जाते. म्हणजेच लिंग अथवा बाई पुरुष असणे हा निसर्गदत्त भाग आहे पण त्यातून पुढे निर्माण केले गेलेले संपूर्ण जग मात्र मानवनिर्मित असते असे स्त्री विचारवंतांना वाटते. मूल जन्मले की त्याला मिळणारे नाव आणि कपडे, सर्व तऱ्हेचे संस्कार ह्यातून लिंगभाव घडविला जातो. ह्यातच भर पडते ती ज्या जातीत वर्गात आपण जन्म घेतो., म्हणून वेगवेगळ्या जातीत बाईची जात, पुरुषाची जात ह्यांच्या व्याख्या बदलत असतात. घरात डांबून ठेवलेल्या वरच्या जातीतील स्त्रीला गृहलक्ष्मी म्हटले जाते. सणावारी, पूजाअर्चा असताना ह्या स्त्रियांना काही प्रमाणात कुटुंबात मान आणि सहभाग असतो. ह्या उलट कष्टकरी वर्गातील स्त्रीला आपले आणि कुटुंबाचे पोट भरण्यासाठी बाहेर पडावे लागते. म्हणूनच 'लिंगभाव' ह्या संकल्पनेच्या साह्याने आपण वेगवेगळ्या टप्प्यावर स्त्रीपुरुष विषमता कशी घडविली गेली हे पाहू शकतो. राष्ट्रवादी चळवळ किंवा त्यापूर्वीचा सुधारणांचा टप्पा लक्षात घेता स्त्रियांना वेगवेगळे संदेश आणि सल्ले दिले गेले. ह्यातून आधुनिक स्त्री कशी घडविली गेली हे लक्षात येते. लिंगभावाच्या आधाराने आपल्याला असे दाखवून देता येते की उच्च वर्गातील स्त्रीला पावित्र्य, शुद्धता हे जे आदर्श घालून दिलेले असतात, त्यांचे उल्लंघन झाल्याचा अनुभव सतत येत असतो. टि.व्ही., मासिके, चित्रपट, नाटके ह्यातून होणारी स्त्रीची विटंबना दिसत असते. तसेच घरातही घरातल्या पुरुषांकडून त्यांचा विविध प्रकारे अपमान होतच असतो.

**लिंग व लिंगभाव : व्याख्या व मूलभूत फरक**

**लिंग** (Sex)

लिंग हे नैसर्गिक असते. लिंग हे जीवशास्त्रीय आहे. ते स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियातील फरकामुळे दृश्य स्वरूपाचे आहे. लिंगातील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून आहेत. लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही. लिंग हे सर्वत्र सारखे असते. म्हणजेच ते स्थिर आहे.

**लिंगभाव** (Gender)

लिंगभाव हा सांस्कृतिक असून मनुष्यनिर्मित आहे. लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक असतो. तो भूमिका, गुण, वर्तनप्रकार व जबाबदाऱ्या इत्यादींची स्त्रियोचित आणि पुरुषोचित अशी विभागणी करतो.

लिंगभाव ही परिवर्तनीय संकल्पना असून. काळानुसार आणि संस्कृतीप्रमाणे कुटुंबा- कुटुंबात तो बदलते दक्षिण आशियाई भाषांमध्ये 'जेंडर' ही संकल्पना कशी भाषांतरित करता येईल? खरोखर ही एक समस्या आहे. इंग्रजीत सेक्स/जेंडर हे दोन वेगळे शब्द आहेत. पण बहुतेक दक्षिण आशियाई भाषांमध्ये या दोन्ही शब्दांसाठी लिंग हा एकच शब्द वापरला जातो. या दोन्हीतील फरक स्पष्ट करण्यासाठी सेक्स म्हणजे नैसर्गिक लिंग आणि जेंडर म्हणजे लिंगभावासाठी सामाजिक लिंग हे शब्द वापरले आहेत. वस्तुतः हे शब्द लिंग आणि लिंगभाव शब्दांपेक्षा उपयुक्त आहेत. कारण या संज्ञा उच्चारताच त्यांचा अर्थ कळतो. त्यामुळे अधिक स्पष्टीकरण देण्याची गरज भासत नाही. पण खरेच लिंगभाव आपल्या लिंगाशी संबंधित नाही का? समाजात स्त्रीपुरुषांमध्ये कर्तव्यांची आणि जबाबदाऱ्यांची जी विभागणी केली जाते, ती लिंगाधिष्ठित असते. स्त्रियांना आपल्या वास्तवाची जाणीव ही शिक्षणाची समान संधी, तंत्रज्ञानात्मक क्रांती विज्ञानाचा उदय इत्यादीमुळे झाली. आपल्या अस्तित्वासाठी पुरुषी राजकारणाला छेद देण्याची आवश्यकता भासू लागली.

स्त्रीचे शोषणाचे मूळ पुरुषाच्या दुटप्पी वागणुकीत आहे त्या वागणुकीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून स्त्रियांची पारंपारिक प्रतिमा बदलणे हे स्त्री चळवळीचे मुख्य ध्येय आहे पुरुषप्रधान रचनेवर हल्ला करताना पुरुषी वृत्तीला विरोध करणं पुरुषाला नव्हे हे भान देखील ठेवणं आवश्यक आहे या माध्यमातून स्त्री चळवळीची पुरुष विरोधी विचारधारा नसून पुरुष वर्चस्वाला विरोध करणारी ही विचारधारा आहे लिंगभाव आधारित ही दुय्यमत्त्वाची भावना नष्ट करणे आणि स्त्रियांना आपले स्वत्व आणि आत्मभान मिळवून देणे स्त्री देखील एक स्वतंत्र व्यक्ती आहे ही ओळख निर्माण करणं हेच स्त्री चळवळीचे स्वरूप मानले जाते.

**४.२.२ लिंगभावाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Gender ):

लिंगभाव आधारे स्त्री विषमता जागृती करणाऱ्या विचारवंतांमध्ये सिमॉन द बूव्हाचे स्थान अत्यंत महत्वाचे मानले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या नव स्त्रीवादी चिंतनावर तिच्या लेखनाचा फार मोठा परिणाम झालेला दिसतो. लिंगभाव चळवळीचा संदर्भग्रंथ म्हणून तिच्या लेखनाचा निर्देश केला जातो. स्त्रीवादी चळवळीत 'द सेकंड सेक्स' पुस्तकाचा अग्रक्रमाने विचार केला जात असला तरी हे पुस्तक सोडले तर तिने इतर पुस्तकांमध्ये उघड स्त्रीवादी भूमिका घेतलेली नाही, हे पुस्तक लिहिण्याच्या पूर्वी स्वतःला स्त्रीवादी मानले नाही. स्त्रीवादाशी संबंधित महिला संघटनांशी संलग्न झाली नाही वा चळवळीत सहभाग घेतलेला नाही. तरीदेखील या पुस्तकात पाश्चिमात्य संस्कृतीतील स्त्री जीवनाबद्दलच्या कळीच्या संकल्पनांचे विश्लेषण करून तिने सर्वसमावेशक आणि दूरगामी स्वरूपाचे लेखन करून स्त्रीवादी चळवळीला वैचारिक पाया उपलब्ध करून दिला. बूव्हाच्या लेखनामुळे स्त्रीवादी चळवळीला आवश्यक सिद्धांकन उपलब्ध झाले, असे मानले जाते. त्यामुळे खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळ स्थिर पायावर उभी राहिली, असे काही स्त्रीवादी अभ्यासक मानतात. स्त्री म्हणजे काय, हे स्पष्ट करत असताना बूव्हा सांगते की, 'पुरुष आपली प्रतिमा एका विशिष्ट लिंगाशी संबंधित व्यक्ती म्हणून कधीही करून देत नाही. त्यांची पुरुषी ओळख न सांगता मान्य केली जाते. स्त्री आणि पुरुष यांच्यातील नाते समानतेच्या पातळीवर अस्तित्वात असत नाही. स्त्रियांचे दुय्यमत्व एका विशिष्ट ऐतिहासिक टप्प्यावर निर्माण झाले नाही. शरीररचनाशास्त्र आणि शरीरविज्ञानशास्त्र यांच्या परिणामातून त्या स्त्रिया बनल्या. कारण दोन लिंगांमधील विभाजन हे शरीरशास्त्रीय तथ्य आहे.

लिंगभाव आधारे स्त्रियांचे दुय्यमत्व ठरविण्यात पुरुषांचे अनेक फायदे असतात. समाजव्यवस्थेवर आपले वर्चस्व अबाधित राखण्यात पुरुषांना रस असतो. स्त्रियांचे दुय्यमत्व समाजासाठी म्हणजे स्त्री-पुरुषांसाठी लाभदायक असते, हे गृहीतक पुरुषांनी उभे केलेले आहे. बाईपणातून स्त्रियांना अनेक फायदे होतात, असे स्त्रियांना पटवून देण्यात पुरुष यशस्वी झालेले आहेत. स्त्रियांचे दुय्यमत्व निश्चित करणाऱ्या पुरुषी गृहीतकावर हल्ला चढविणे आवश्यक होते, ते कार्य बूव्हांनी चोखपणे पार पाडलेले आहे कारण अनेक स्त्रिया माणूस म्हणून कृती करावयाला पुढे येत नाही. स्त्री म्हणून मिळणाऱ्या सुखसुविधांवर पाणी सोडायला अनेक स्त्रिया तयार नसल्यामुळे तुरुंगरूपी दुय्यमत्वाचा त्या स्वीकार करतात. अशा स्त्रियांना त जागरूक करणे अत्यंत मोलाचे बूव्हाला वाटते; म्हणून ती मानते की, 'स्त्री जन्मत नाही, तर घडविली जाते. स्त्रिया मानसिकदृष्ट्या दुय्यमत्व आणि गुलामगिरीत अडकलेल्या आहेत; त्याप्रमाणे पुरुषदेखील पुरुषात्वाच्या प्रतिमेत बंदिस्त झालेले आहेत.असे बूव्हा आग्रहपूर्वक नमूद करतात.

**स्त्रियांचे जीवशास्त्रीय लिंगभाव वास्तव**

मानवी जीवनातील स्त्री आणि पुरुष यांच्या अस्तित्वाची तुलना माणूसपणाच्या परिप्रेक्ष्यातून होऊ शकत असल्याने बूव्हा जीवशास्त्रीय आधारावर स्त्रियांच्या स्थितीचे अध्ययन करते. जैविक कृतीतून स्त्रियांमध्ये शरण जाण्याची वृत्ती, तर पुरुषामध्ये सार्थकता प्राप्ती वृत्ती असते. पुनरूत्पादन प्रकियेत त्यागाची अपेक्षा स्त्रियांकडून केली जाते. भावी पिढीसाठी आपले स्वत्व स्त्रीला गमवावे लागते. मात्र, पुरुष आपले स्वातंत्र्य आणि स्वत्व कायम ठेवतो; पुरुषांचे लैंगिक जीवन एका सरळ रेषेत वा प्रवाही स्वरूपाचे असते, तर स्त्रियांचे लैंगिक वा जीवशास्त्रीय जीवन अत्यंत गुंतागुंतीचे असते. जैविक शरीर स्त्रीचे मिळाले म्हणून तिला स्त्री समजले जात नाही, तर तिला स्त्रीत्व नावाचा गूढ गुणधर्म अंगी बाणवावा लागतो. याउलट, पुरुषाचे स्वतःविषयींचे संदर्भ लिंगभेदापासून सुरू होत नाही. त्याचे 'पुरुष असणे' निराळे असे काहीच नसते.पुरुषाचे शरीर म्हणजे निसर्गनियमाला धरून असलेली मूळ प्रत तर स्त्रीचे शरीर हे मूळ साच्यापासून निराळे असलेले, कारण तिच्या शरीरात असलेले गर्भाशय.. आणि रज: पिंडाचे अस्तित्व होय, दरमहिन्याला येणारी मासिक पाळी, गर्भधारणा, मुलांना जन्म देण्याचे दिव्य, आजारपणे इत्यादींमुळे स्त्रिया रडतकुढत जीवन जगत असतात. पुरुषाच्या तुलनेत स्त्रीला मिळालेले कमकुवत शरीर गैरसोयीचे आहे. जीवशास्त्रीय घटक स्त्रियांच्या जीवन व इतिहासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. दोन लिंगांमधील सत्तेची उतरंड समजण्यास अपुरी आहेत. शारीरिकदृष्ट्या स्त्रिया पुरुषांपेक्षा दुबळ्या असल्यातरी दुबळेपणाचा विचार आर्थिक, सामाजिक, नैतिक आणि मानसशास्त्रीय पातळीवर केला पाहिजे तेव्हा दुबळेपणाचा जीवशास्त्रीय आशय अमूर्त ठरतो. मानवी जीवन हे जीवशास्त्राने निर्माण केलेल्या चौकटीतून घडत नसते, तर सामाजिक चौकटीत घडत असते.

**स्त्रियांच्या मनोवैज्ञानिक लिंगभावाची वैशिष्ट्ये**

मनोविश्लेषण शास्त्राने उभ्या केलेल्या स्त्री प्रतिमांचा अभ्यास करताना. सिग्मंड फ्रॉईड यांनी मांडलेल्या इडिपस, लिंगविच्छेद, भयगंड आणि इलेक्ट्रोगंड संकल्पनांमध्ये स्त्रीच्या नियतीची आणि दुय्यमत्वाची कारणे सापडतात. त्याने पुरुष लिंगमत्सरांचा शरीरशास्त्राशी जोडलेला संबंध बूव्हा नाकारते. स्त्रियांचा पुरुष लिंगाचा मत्सर हा प्रतीकात्मक पातळीवर सत्तेशी संबंधित परिणामातून व्यक्त होतो, असे मानते. नियतीवाद नाकारताना स्त्रीची व्याख्या निसर्ग करीत नाही तर आपल्या स्वतःच्या मर्जीने स्वतःच्या भावनिक जीवनात निसर्गाशी संघर्ष करीत स्त्री स्वतःची व्याख्या स्वतः करते. स्त्रियांमध्ये न्यूनगंड निर्माण होत नाही तर, स्त्रियांविषयी समाजात असलेल्या प्रतिकूल परिस्थितीतून निर्माण होतो. मनोविश्लेषण शास्त्र निवड ही संकल्पना आणि तिच्याशी निगडित असलेली मूल्ये नाकारतात, हा त्या शास्त्राचा आंतरिक दुबळेपणा बूव्हाला वाटतो. मनोविश्लेषण शास्त्रातील नेणीव संकल्पनादेखील नाकारते. नेणीव मानवाने गृहीत धरलेली प्रतिमा आणि एक वैश्विक प्रतीकात्मकता पुरविते; परंतु प्रतीकात्मता निसर्गातून निर्माण होत नाही तर भाषेतून निर्माण होते; म्हणून मनोविश्लेषण शास्त्रज्ञांना स्त्रियांच्या वास्तव जीवनाच्या समस्या समजावून घेण्यात अपशय आलेले आहे. त्यांनी अनेकदा यांत्रिक पद्धतीने स्त्री समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला, असे बूहाला वाटते. स्त्रियांच्या मूलभूत असतेपणाचा शोध घेण्यात लैंगिकता हा एक छोटासा पैलू आहे. स्त्रीची व्याख्या स्त्रीत्वाच्या जाणिवेतून करणे शक्य नाही, तर ती ज्या समाजाची सभासद असते त्या समाजाच्या

परिस्थितीसंदर्भात करणे योग्य असते. त्यासाठी फ्रॉईडच्या लैंगिक एकारलेपणाची संकल्पना नाकारते. फ्रॉईड व इतर मनोवैज्ञानिक विश्लेषण मानवी वास्तवाच्या सम्यक स्वरूपाशी जोडण्यात अयशस्वी ठरले, असे मानून बूव्हा स्त्रियांच्या दुय्यमत्वाचा शोध घेण्यासाठी मार्क्सवादातील ऐतिहासिक भौतिकवादाकडे वळते.

**स्त्रीविषयक मार्क्सवादी आकलन**

स्त्रियांच्या दुय्यमत्व लिंगभाव आधारे जीवशास्त्र, मनोवैज्ञानिक विश्लेषण शास्त्राने स्पष्टीकरणासाठी केलेल्या योगदानाची दखल घेत त्यांचे विश्लेषण करते, त्याच पद्धतीने ऐतिहासिक भौतिकवादाच्या योगदानाची दखल घेत चिकित्सेला प्रारंभ करते. एंगल्सच्या मते, स्त्रीचे परावलंबन ऐतिहासिक भौतिकवादातील एका विशिष्ट टप्प्यात उदयाला आले. मालमत्तेच्या हक्कांमुळे स्त्रियांना दुय्यमत्व आले. उत्पादन साधनातील बदलामुळे कुटुंबव्यवस्थेतील स्त्रियांचे वर्चस्व नष्ट होऊन ती कनिष्ठ स्थानी झाली आणि पुरुषाची गुलाम बनली. जमीन व उत्पादन साधनाची मालकी पुरुषवर्गाकडे गेली. त्यास पुरुषप्रधान विवाहसंस्थेने मदत केली. विवाहसंस्थेद्वारे स्त्रिया पुरुषांच्या दावणीला बांधल्या गेल्या. संपत्तीचा वारस असलेली मुले ही पतीपासून निर्माण झालेली असली पाहिजेत, या बंधनामुळे स्त्रियांनी शुद्ध, पवित्र राहिले पाहिजे हे नीतिमत्तेचे मापदंड विकसित विश्लेषण करते. पुनरुत्पादनाच्या प्रक्रियेपासून पुरुष मुक्त असल्यामुळे सर्जनशीलतेचा वापर करण्याची संधी नराला प्राप्त होते. सर्जनशीलतेच्या वापराला संधी मिळाल्यामुळे पुरुषाने नव्या नव्या वस्तू, हत्यारे आणि रचनांची निर्मिती करून आपले भविष्य घडविणे शक्य झाले. सर्जनशीलतेच्या जोरावर आपले आयुष्य संपन्न करून पुरुष-स्त्री आणि निसर्ग दोघांनाही नमवितो. पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या उदयापूर्वी स्त्रियांना निसर्गाप्रमाणे गूढ मानले गेले. हे गूढ पुरुषांना उकलत नसल्यामुळे पृथ्वी, माता, देवी या प्रतीकांमध्ये स्त्रियांना बसविले गेले. या प्रतीकांच्या माध्यमातून स्त्रियांना मानवी अवकाशाच्या बाहेर ढकलेले गेले. इतिहासपूर्व काळातदेखील सर्व सामाजिक, राजकीय अधिकार पुरुषांच्या हातात राहिले. निसर्गाच्या गूढाचे आकलन पुरुषांना झाल्याबरोबर स्त्रियांचे अवमूल्यन वेगाने सुरू झाले. उत्तर कृषी समुदाय युगात पुरुषप्रधान व्यवस्था स्थिरावल्यावर स्त्रियांचे अवमूल्यन पूर्ण झाले. संपूर्ण इतिहासात स्त्रिया पुरुषांद्वारे नियंत्रित केल्या गेलेल्या आढळतात. स्त्रियांच्या आयुष्याचे निर्णय पुरुषांकडून निश्चित केलेले दिसतात, काही अपवादात्मक स्त्रियांनी इतिहासात कर्तृत्व दाखविलेले असले तरी ते व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचे आहे. त्या स्त्रिया आदर्श व्यक्ती आहेत, पण इतिहासाच्या वाहक नाहीत. समकालीन युगातही बहुसंख्य स्त्रिया गुलामगिरीचे जीवन व्यतीत करत आहेत. स्त्रिया स्वतःकडे पुरुषांनी निर्माण केलेल्या चौकटीतून पाहतात. तसेच स्त्रियांनी केलेली निवडदेखील मूळ स्व-स्वभावानुसार करत नसून पुरुषांनी निर्मिलेल्या चौकटीत करत असतात. या सामाजिक विषमतेचा स्त्रियांच्या मन, बुद्धी आणि आचरणावर इतका प्रभाव पडलेला आहे की, स्त्रीचे असे असणे नैसर्गिक आहे असे सगळ्यांना वाटायला लागते. आर्थिक क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व, विवाह व कुटुंबसंस्थेला असलेले महत्त्व आणि पुरुषप्रधान व्यवस्थेचे अस्तित्व यामुळे आजही स्त्रिया इतिहासामध्ये उपऱ्या किंवा इतर ठरतात.

**स्त्री जीवनव्यव्हारातील मिथकांची भूमिका**

स्त्री जीवनाविषयी लिंगभाव आधारे धर्म, भाषा, परंपरा, साहित्य,गीत, चित्रपट इत्यादी विविध क्षेत्रांत स्त्रियांविषयी निर्माण केलेल्या मिथकांचा आढावा घेतलेला आहे! प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत विविध देशातील स्त्रीविषयक मिथके आणि प्रतिमा स्त्रियांचे लिंगभाव विषमता निश्चित करताना कोणती भूमिका बजावलेली आहे, याचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्यासाठी विविध विचारवंत, लेखक, साहित्यिक, धार्मिक ग्रंथ इत्यादी साहित्याचा परामर्श घेतलेला आहे. स्त्रीला लिंगभाव आधारे दुय्यम मानण्याची पद्धत अत्यंत प्राचीन आहे. प्राथमिक अवस्थेत असलेल्या समाजातील पुराणकथांमध्ये द्वैताच्या कल्पना मांडलेल्या आहेत.पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रियांना मिथके आणि प्रतिमांमध्ये बद्ध करून लिंगभाव दुय्यमत्वाच्या पातळीवर ढकलेले आहे. मिथकांच्या माध्यमातून स्त्रियांना काल्पनिक विश्वात रममाण होण्यास भाग पाडले जाते. त्यामुळे मिथकांमधून उभ्या राहणाऱ्या बाईपणाच्या संकल्पनांमधून समाजात स्त्रीविषयी परस्परविसंगती प्रतिमा निर्माण होते. लैंगिक मिथके स्त्री-पुरुष विषमतेला खूतपाणी घालतात. जगाच्या जडणघडणीत पुरुषांच्या कार्याची दखल घेतात, तर स्त्रीला निसर्गासमान मानून क्षमतेच्या पलीकडे इतर बनविलेले असते. स्त्री शरीराविषयी घृणा निर्माण करणारी अनेक मिथके पुरुषांनी उभी केलेली आहेत. स्त्री म्हणजे गूढ वा अनेक परस्परविरोधी भावनांचे मिश्रण असणारी व्यक्ती ही प्रतिमा उभी राहते, तर पुरुष म्हणजे बुद्धिवान, सामर्थ्यशाली, तर्कशुद्धता आणि जगतनिर्माता ही प्रतिमा विकसित होते. स्त्रियांच्या दुर्बलता वारंवार विशद करणे हा धर्मोपदेशक, आणि तत्त्वज्ञानी व्यक्तींचा आवडता विषय होता आणि ही दुर्बलता अनेकदा सरळ भाषेत व्यक्त करण्यापेक्षा मिथकातून मांडणे सोईस्कर होते, असे तिला वाटते.

सिमॉन द बूव्हा यांच्या मते स्त्री जन्मला येत नाही तर ती घडवली जाते या अर्थाने स्त्री जडणघडण लिंगभावच्या आधारे घडवली जाते त्याची प्राथमिक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे :

१. बालपण लिंगभाव माध्यमातून विश्लेषण करताना पुरुषी दृष्टिकोनाचा विचार करते. बालपणापासून मुलांचे संगोपन करताना लिंगभाव त्याच्यावर बिंबविले जातो. म्हणजेच लिंग विभक्तकरणची प्रक्रिया सामाजिक पातळीवर कुंटूबच्या माध्यमातून भविष्यातः मुलाचे स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगेल या प्रकारचे पालनपोषण केले जाते. तर मुलीचे संगोपन करताना त्यांनी इतरांच्या सुखासाठी जगले पाहिजे, त्याग केला पाहिजे ही मूल्ये रुजवून त्यांचे वस्तूकरण केले जाते. मुलींना जिवंत बाहुलीचे रूप देऊन स्वातंत्र्य नाकारले जाते. स्त्रियांमध्ये निर्माण झालेली न्यूनगंडाची भावना सामाजिकीकरण प्रक्रियेचा परिणाम असते. बालपणापासून स्त्रियांचे सामाजिकीकरण करताना दुय्यमत्व बिंबविले जाईल, यासाठी सभोवतालचे घटक प्रयत्न राहतात. मुलगा आणि मुलगी यांचे भिन्न पद्धतीने केल्या जाणाऱ्या सामाजिकीकरणामुळे मुलांना शिक्षण लाभदायक कवच आहे, याची जाणीव विकसित होते. लिंगाच्या आधारावर अनेक सवलती मुलांना प्राप्त होतात, तर मुलींना मासिक पाळी हा शाप आहे या सामाजिक जाणिवेतून भावना निर्माण होते. बालपणातील सामाजिकीकरणाच्या माध्यमातून स्त्रियांना दुय्यम मानले जाते ढकलले जाते. वयात येण्याच्या अवस्थेत स्त्री आणि पुरुषाबाबत समान मूल्यांच्या अभावामुळे दोघांच्या सामाजिकीकरणात फरक पडतो. मुलींचे सामाजिकीकरण होताना पुरुषलिंग नसल्यामुळे आपल्याला अधिकारापासून वंचित केले जाते ही भावना

विकसित होते. भिन्न सामाजिकीकरणामुळे लहान मुली एका अपराधीपणाच्या भावनेने भावी जगात मार्गक्रमण करतात.

२. तरुण मुली – तरुण वयातील मुलींच्या शरीरात हार्मोन्सच्या प्रभावामुळे होणाऱ्या परिणामांची दखल बूव्हा घेते. सामाजिक चालीरीती, प्रथा आणि परंपरेमुळे स्त्री जीवनावर होणाऱ्या परिणामांचे वास्तव मांडते. सामाजिक चालीरीती आणि प्रथा व परंपरांमुळे पौगंडावस्थेतील मुलींना कृतिशील आणि धाडसाचे जीवन नाकारले गेल्यामुळे त्या काल्पनिक विश्वात रममाण होतात. कल्पनाविश्वालाच वास्तव विश्व समजू लागतात. समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या नीतीनियमांमुळे मुलींवर लैंगिकता दाबून ठेवण्याची सक्ती केली जाते. मुलींच्या मानसिक आणि शारीरिक दृष्टिकोनातून निर्माण होणाऱ्या कोंडीचा तिच्या व्यक्तिमत्त्वावर गंभीर परिणाम होतो. बंड करण्याच्या शक्यता समाज मुलींना नाकारत असल्यामुळे सभोवतालचे जग आपले नशीब आहे, असे समजू लागतात. स्त्रियांचे स्वातंत्र्य सामाजिक चालीरीतींनी विकसित केलेल्या चौकटीत आधारावर नियंत्रित केले जाते. समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या चालीरीतींच्या प्रभावामुळे स्त्रियांच्या जीवनात लैंगिकतेविषयी उदासीनता निर्माण होते. स्त्री आणि पुरुष या दोघांनी परस्परांच्या शरीराविषयी उदारता दाखविली पाहिजे; परंतु, पुरुषी अहंकारामुळे आणि स्त्रीच्या भित्रेपणामुळे उदारता कुंठित होते, असे बूव्हाला वाटते.

३. प्रौढ अवस्था – सिमॉन द बूव्हा यांनी प्रौढ अवस्थेत स्त्री जीवनातील महत्त्वपूर्ण भूमिकेचे विश्लेषण केलेले आहे. त्यात स्त्रीच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणाऱ्या विवाहसंस्थेचा सर्वप्रथम विचार केला आहे. बूव्हा स्वतः विवाहसंस्थेच्या विरोधात होती. विवाहसंस्था स्वीकारली की तिचे नियम स्वीकारावे लागतात. नियम मोडले म्हणजे शिक्षा भोगावी लागते. मग शिक्षा टाळण्यासाठी खोटारडेपणा करावा लागतो. आयुष्यभर मनाविरुद्ध जगावे लागते. हे सर्व टाळण्यासाठी ती विवाहसंस्थेला विरोध करते आणि लग्न न करता स्वातंत्र्य जपण्याला महत्त्व देते. विवाहसंस्थेविषयीचे परिणाम प्राचीन काळापासून दोन्ही लिंगांसाठी भिन्न भिन्न आहेत. पुरुष हा सामाजिकदृष्ट्या स्वतंत्र आणि परिपूर्ण व्यक्ती मानला जातो. पुरुष जीवनाची सार्थकता उत्पादकतेच्या कार्यातून सिद्ध होते. याउलट जीवशास्त्रीय कारणासाठी स्त्रीने विवाह केला पाहिजे, हा संकेत समाजव्यवस्थेत रूढ आहे. या संकेतानुसार पुरुषांच्या लैगिक गरजांची पूर्ती, अपत्यजन्म घडविणे आणि कुटुंबाची काळजी घेणे इत्यादी स्वरूपाच्या सेवा पुरविल्या पाहिजेत. त्या सेवेच्या बदल्यात स्त्रियांची देखभाल व सांभाळ पुरुषांनी करावी, ही अट आहे.

सिमॉन द बूव्हा यांनी स्त्रियांचे दुय्यमत्व निश्चित करणाऱ्या विविध घटकांची सविस्तर चिकित्सा केली आहे. स्त्री जीवनातील महत्त्वपूर्ण अवस्था वा टप्पे आणि स्त्रिया पार पाडत असलेल्या विविध भूमिकांचा अभ्यास केलेला आहे. स्त्रियांच्या नागरी हक्काचा विचार करताना मतदानाच्या हक्काचा विचार केला जातो. मतदान हक्काच्या माध्यमातून कागदावर तरी स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने राजकीयदृष्ट्या समान वाटतात; परंतु, मतदान हक्काच्या अनेक मर्यादा दिसून येतात. मतदानाचा हक्क प्राप्त होऊनही राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग मर्यादित प्रमाणात दिसून येतो. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय मतदान आणि नागरी स्वातंत्र्याला फारसा अर्थ नाही. स्त्रिया जोपर्यंत उत्पादक घटक म्हणून समाजात पुढे येणार नाहीत, तोपर्यंत त्यांना जबाबदारीची

खरी जाणीव होणार नाही. समकालीन समाजाची सामाजिक आणि आर्थिक संरचना दोन्ही लिंगाच्या स्वातंत्र्यास पूरक नाही, असे बूव्हाला वाटते. स्त्री-पुरुषामधील लिंगभाव विषमतेचे आकलन लैंगिक घटकांच्या आधारावर करता येत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेने विकसित केलेली सामाजिक चौकट, संकेत, रूढी, परंपरा, संस्कृतीतून स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित झालेले आहे. या दुय्यमत्वाला नष्ट करण्यासाठी समाजव्यवस्थेवरची पुरुषी पकड सैल करण्याची गरज आहे. ही पकड़ आपोआप सैल होणार नाही, तर त्यासाठी स्त्रियांना संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल. लैंगिकतेच्या आधारावर लावलेली लेबले 'काढून' टाकावी लागतील. पुरुषाने स्त्रियांना दिलेल्या सवलतीवर पाणी सोडावे लागेल. स्त्रीत्वाची पुरुषांनी उभी केलेली एकसत्त्वी संकल्पना मोडीत काढून समता, स्वातंत्र्य, समन्वय आणि परस्पर देवाणघेवाणीवर आधारित नवी संस्कृती निर्माण करावी लागेल. स्त्री आणि पुरुष दोन्ही घटक एकमेकांना समानता प्रदान करतील, त्या दिवशी बाईपणाच्या संकल्पनेचा ऱ्हास होईल, असा विश्वास बृव्हाला वाटतो.

स्त्रियांच्या आर्थिक परिस्थितीतील परिवर्तनातून दुय्यमत्व कमी होईल, यावर बूव्हाचा विश्वास नाही. आर्थिक घटक हा स्त्रियांच्या प्रगतीतील निर्णायक घटक असला तरी त्यासोबत सामाजिक, सांस्कृतिक,राजकीय, नैतिक घटकांत अपेक्षित परिणाम झाले नाही तर स्वतंत्र आणि स्वायत्त स्त्री निर्माण होणार नाही. समान कामासाठी स्त्री-पुरुषांना समान वेतन देणारी व्यवस्था विकसित करणे गरजेचे मानते. गर्भपात आणि कुटुंबनियोजन साधने वापरण्याचा अधिकृत अधिकार मान्य केला गेला पाहिजे. मातृत्वाची निवड स्त्रीच्या इच्छेवर अवलंबून राहिली पाहिजे. गरोदरपणाच्या काळात राज्याकडून अधिकृतपणे पगारी रजा मंजुरी केली जाणे गरजेचे आहे अपत्य संगोपनाच्या व्यापक व्यवस्था राज्याने निर्माण केल्या पाहिजेत. जेणेकरून त्यांचा भार एकट्या स्त्रीवर पडणार नाही. समानता आणि बंधुभावावर आधारित नवी समाजरचना स्त्री-पुरुष संबंधांमध्ये गुणात्मक बदल घडवून आणेल. बूव्हाच्या कल्पनेतील समाज अजूनपर्यंत कोणत्याही देशात अस्तित्वात आलेला नाही; परंतु, भविष्यात निर्माण होईल, ही तिला अपेक्षा वाटते. स्त्री स्वातंत्र्याचा विचार करताना बूव्हा स्त्रियांचे पुरुषांशी बांधलेले नाते नाकारते; पण याचा अर्थ ती -पुरुषाला नाकारत नाही. सिमॉन द बूव्हाने स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे केलेले विश्लेषण दुर्दैवाने अजूनही बहुसंख्य स्त्रियांना लागू पडते

कायद्याने स्त्रियांना अनेक हक्क आज मिळालेले असले तरी ते प्रत्यक्षात अमलात आणण्यास आवश्यक सामाजिक परिस्थिती निर्माण झालेली नाही, हे खेदाने नमूद करावे लागते. लिंगआधारीत स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी पुरुषांमधील सत्तेची ईर्षा आणि मालकी हक्कांची भावना कमी होणे आणि कौटुंबिक जीवनातील आर्थिक सत्तेचे व प्रापंचिक जबाबदारीचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. बुव्हाच्या योगदानाचे वर्णन करताना डॉ. विद्युत भागवत आपल्या 'स्त्रीवादी सामाजिक विचार पुस्तकात सांगतात की, द बूव्हाच्या लेखनाचा सर्वोच्च दर्जा नाकारणे मूर्खपणाचे ठरेल. स्त्रीवादी विचारांच्या सर्व विचारप्रवाहांवर तिने प्रभाव टाकलेला आहे. तिच्या संकल्पनात्मक विश्लेषणाच्या चौकटीपलीकडे जाणे अद्यापपर्यंत कोणत्याही प्रवाहाला जाणे शक्य झाले नाही. या डॉ. भागवतांच्या विधानावरून बूव्हा लेखन व कार्याची उपयुक्तता व गुणवत्ता लक्षात येते.

केट मिलेट जहालवादी स्त्री चळवळीच्या पाया विकसित करणारी प्रमुख विचारवंत मानली जाते:

केट मिलेट यांनी 'Congress of Racial Equality' चळवळीत सहभाग घेतला. 'National Organization of Women' समितीचें सदस्य म्हणून देखील कार्य केले.

मिलेट ही अमेरिकन स्त्री चळवळीच्या दुसऱ्या लाटेतील प्रमुख कार्यकर्ती आणि अभ्यासक मानली जाते. मिलेटने लिहिलेल्या लैंगिकतेचे राजकारण (Sexual Politics) पुस्तकाने अल्पकाळात स्त्रीवादी लेखिका म्हणून नावलौकिक मिळविला. पुस्तक प्रसिद्धीनंतर महाविद्यालयातील नोकरीचा त्याग करून स्त्रीवादी चळवळीत पूर्ण वेळ कार्यकर्ता आणि संघटक म्हणून कार्य करू लागली. स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी संपुर्ण अमेरिका हा प्रवास केला. Change Magazine, Red Cley Reader या जहाल स्त्रीवादी मासिकांचे वार्ताहर म्हणून काही काळ काम केले. १९६८ साली कोलंबिया विद्यापीठातील स्त्रीमुक्ती संघटनेसाठी लैंगिकतेचे राजकारण... क्रांतीसाठी जाहीरनामा (Sexual Politics a Manifesto for Revolution) लिहिला. १९७१ साली वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांची परिषद घेतली. वेश्या व्यवसायासंदर्भात The Prostitution Papers हे दुसरे पुस्तक लिहिले. १९७९ मध्ये इराणमधील तेहरान येथे भेट दिली. आंतरराष्ट्रीय स्त्री दिनानिमित्त आयोजित तेहरान विद्यापीठात निदर्शन व रॅलीत सहभाग घेतला. तिच्या 'Mother Millet' पुस्तकाला उत्कृष्ट पुस्तकाचे पारितोषिक मिळाले.तिच्या लेखनावर कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्सच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. मिलेट यांनी लेखिका, शिल्पकार, चित्रपट निर्माती आणि कृतिशील स्त्रीवादी इत्यादी विविधांगी भूमिका आयुष्यात पार पाडल्या.

**लैंगिकतेच्या राजकारणासंदर्भात मिलेटचे विचार**

लैंगिकतेचे राजकारण पुस्तकाच्या माध्यमातून मिलेट सामाजिक आणि खासगी जीवनातील पुरुषी वर्चस्वाच्या रचनेला आव्हान देऊन नष्ट करू पाहते. १९७०च्या राजकीय व्यवस्थेच्या माध्यमातून पुरुषांचे स्त्रियांवर प्रस्थापित होणाऱ्या सत्तेचे विश्लेषण करते. लिंगाच्या दर्जाविषयी समकालीन समाजात उपलब्ध असलेल्या संबंधात सत्तासंदर्भ अस्तित्वात आहे, या सत्तासंबंधाचा शोध घेणे, लिंग आणि लैंगिकता हा राजकीय घटक आहे ही जाणीव विकसित करणे, पुरुषप्रधान व्यवस्था ही सामाजिक संस्था नसून राजकीय संस्था आहे, हे सिद्ध करून देणे आणि २०व्या शतकात स्त्री आणि पुरुष लिंगामधील परंपरागत संबंधांमध्ये आलेल्या बदलाचा आढावा घेऊन भविष्यकालीन लैंगिक क्रांतीचे घटक स्पष्ट करणे ही उद्दिष्टे लक्षात घेऊन मिलेटने पुस्तकांची रचना केलेली आहे..

लिंग आणि लैंगिकतेच्या राजकीय परिणामांकडे झालेल्या दुर्लक्षाकडे लक्ष वेधते. मिलर, मिलेरट आणि जेनेटच्या लेखनात लैंगिक वर्चस्वासंदर्भातल्या सत्ता आणि वर्चस्व संकल्पनेचे परिणाम अभ्यासते. मिलेटसारखे लेखक संभोगसारख्या लैंगिक कृतीस राजकीय घटनेत रूपांतरित करतात. तिन्ही लेखकांच्या लिखाणाद्वारे पुरुषी वर्चस्वामागील प्रमुख घटक स्पष्ट करण्याचा मिलेट प्रयत्न करते. अमेरिकन हेरिटेज डिक्शनरी आणि मॅक्स वेबरच्या 'लॉ इकॉनॉमी इन सोसायटी' या ग्रंथातील राजकारणाची व्याख्या केट मिलेटने स्विकारलेली आहे. ना. त्या सत्तासंबंधात एक गट दुसऱ्या गटाकडून नियंत्रित केला जातो, त्याला 'राजकारण' असे म्हणतात. स्त्री आणि पुरुष लिंगामधील सापेक्ष दर्जाचे आकलन करून घेण्यासाठी राजकारण

ही संज्ञा वापरते; कारण प्रस्थापित राजकीय संरचनेमध्ये प्रतिनिधित्व नसलेल्या गटांना दुय्यमत्व प्राप्त होते; त्याप्रमाणे लैंगिक संबंधामध्येही स्त्रियांना दुय्यमत्व प्राप्त होते. स्त्री आणि पुरुष लिंगातील नातेसंबंधात जन्मदत्त प्राधान्यक्रमाच्या आधारावर पुरुष स्त्रियांवर सत्ता गाजवितात. हे सामाजिक वास्तव वर्गीय स्तरीकरणापेक्षा जास्त काळ टिकणारे आहे. लैंगिक वर्चस्वाच्या माध्यमातून पुरुषी सत्ता प्रभावीपणे व्यक्त होते. पुरुषसत्ताक व्यवस्थेचे विश्लेषण करताना स्त्रियांवरील पुरुषांचे लैंगिक वर्चस्व हे गृहीतक मिलेटने समर्थपणे मांडलेले आहे. समाजव्यवस्थेतील सर्व महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर पुरुषांचे वर्चस्व आढळते. लिंगाच्या आधारावर जन्माधिष्ठित दर्जा बहाल केला जातो, त्याला राजकीय आशय प्राप्त होऊन पुरुषसत्ताक व्यवस्था अस्तित्वात येते. पुरुषसत्ताक व्यवस्था सर्वव्यापी आणि सर्वकालीन व्यवस्था आहे. लैंगिकतेच्या राजकारणाला मान्यता मिळविण्यासाठी दोन्ही लिंगांचे सामाजिकीकरण पुरुषप्रधान व्यवस्थेला अनुकूल केलेले आहे. पुरुषांबद्दल प्रभावीपणा वा वर्चस्ववादी स्वरूप सिद्ध करणाऱ्या व्यक्तिमत्त्व वा गुणांची रचना केली आहे. उदा. बुद्धिमत्ता, तत्परता, धाडसीपणा याउलट पराधीनता व्यक्त करणारे गुणविशेष वा व्यक्तिमत्त्वाची रचना स्त्रियांसाठी केलेली आहे. उदा. सहनशील, उदासीनता, घरकाम आणि अपत्यसंगोपनासारखी कामे स्त्रियांवर सोपविली, तर गुणवत्ता आणि महत्त्वाकांक्षेला प्राधान्य देणारी कामे पुरुषांकडे सोपविलेली आहेत. धर्म, संपत्तीचा अधिकार, कुटुंब, विवाह इत्यादी सर्व संस्थांमध्ये पुरुषी वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या मूल्यांचा अंतर्भाव करून पुरुषांची सत्ता समाजव्यवस्थेवर निर्माण केली.

**लिंगभावाआधारित पुरुषप्रधान व्यवस्थेवर प्रभाव पाडणारे घटक**

सामाजिकीकरणाच्या माध्यमातून स्त्री आणि पुरुष मधील मिलेट यांनी राजकारण आणि सत्तासंकल्पना समान अर्थाने वापरली.

**विचारप्रणालीचा परिणाम**

सत्तेच्या नियंत्रणाखाली असलेल्या व्यक्तीविशिष्ट विचारप्रणालीच्या प्रभावातून सत्तेला सहमती प्रदान करतात. पुरुषसत्ताक व्यवस्थेची मूल्ये, आदर्श आणि नियमाचे सामाजिकीकरणाच्या माध्यमातून बीजारोपण करून लैंगिक राजकारणात स्त्रियांकडून सहमती प्राप्त करून घेता येते. स्वभाव, भूमिका आणि दर्जा या आधारावर स्त्री आणि पुरुष यांतील संबंधांची तपासणी करता येते. मानवी व्यक्तिमत्त्वाची घडण लिंग (जाती) ने निश्चित केले जाते. लैंगिकतेच्या आधारावर स्त्रियांना कौटुंबिक आणि पुनरुत्पादनाशी संबंधित भूमिका बहाल केल्या जातात, तर पुरुषांना कुटुंबाबाहेरील म्हणजे जीवनाच्या ध्येयसिद्धीच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण भूमिका सोपविल्या जातात. याचा अर्थ समाजव्यवस्थेत स्त्रियांना मर्यादित भूमिका बहाल करून जैविक नियतीशी बद्ध केले जाते. पुरुषी लिंगाला समाजव्यवस्थेत उच्च स्थान दिले जाते आणि स्त्रीला कनिष्ठ पातळीवरचा दर्जा बहाल केला जातो. मानवी स्वभाव मानसशास्त्रीय पातळीवरून, भूमिका समाजशास्त्र पातळीवरून आणि दर्जा राजकीय पातळीवर निश्चित होतो. या तिघांमध्ये असलेल्या परस्पर सामंजस्यामुळे सामाजिक उतरंड निर्माण होते. या उतरंडीत पुरुषी वर्चस्वाची निश्चिती होते.

**जीवशास्त्रीय परिणाम**

लिंगभाव हा धर्म, सामाजिक विज्ञान यातील तथ्य स्त्री आणि पुरुष लिंगामध्ये असलेल्या जैविक भिन्नतेवर आधारलेली आहेत. मिलेटच्या मते, पुरुषी वर्चस्वाच्या जैविक आधाराला विज्ञानाचा आधार नाही. शरीरशास्त्राच्या आधारावर पुरुषी वर्चस्व सिद्ध करता येत नाही. दोन्ही लिंगांमध्ये असलेला भाविनक वा बौद्धिक भेद आनुवंशिक शास्त्राच्या आधारे सिद्ध करता येत नाही. लायोनेल टायगर आणि कॉमरॅड लॉरेंस यांनी पदार्थविज्ञान शास्त्रातील संकल्पना जीवशास्त्रात वापरून पुरुषी वर्चस्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, त्याला प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केला. लैंगिक व्यक्तिमत्त्वाची घडण जैविक घटकांतून होत नसते, तर सांस्कृतिक घटकातून होत असते असे मिलेटला वाटते. पुरुषसत्ताक व्यवस्थेतून लिंगांना जे स्वभाव आणि भूमिका प्रदान केल्या जातात त्यात सांस्कृतिक आशयाचा फार मोठा वाटा असतो. मनोलैंगिकतेच्या दृष्टीने स्त्री आणि पुरुष लिंगामध्ये जन्मतः कोणत्याही प्रकारची भिन्नता नसते. अर्भक अवस्थेनंतर मनोलैंगिक व्यक्तिमत्त्वाची घडण होत असते याचा अर्थ सामाजिकीकरणाच्या माध्यमातून विशिष्ट संस्कारांचे बीजारोपण करून स्त्री आणि पुरुष यांच्यात स्वतंत्र संस्कृती निर्माण केल्या जातात.

**समाजशास्त्रीय परिणाम**

लिंगभाव आधारित पुरुषप्रधान व्यवस्थेतील प्रधान संस्था म्हणजे कुटुंबव्यवस्था होय. कुटुंब, समाज आणि राज्यसंस्था या संस्था एकमेकांपासून भिन्न वाटत असल्या तरी परस्पर संलग्न असतात. या तिन्ही संस्थांमध्ये एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे जातात स्त्रियांना कमीत कमी दर्जाचे स्थान दिले जाते. कुटुंबात पुनरुत्पादन आणि अपत्य संगोपन भूमिका पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांकडे सोपविल्या आहेत. पतीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करून मूल जन्माला घालण्याचा अधिकार स्त्रियांना आहे. जीवशास्त्रीय आधाराशिवाय अपत्य संगोपन आणि मुले जन्माला घालण्याची कृती कुटुंबव्यवस्थेशी जोडली गेली. ज्यांनी बंडखोरी मार्गाने ही व्यवस्था नाकारण्याचा प्रयत्न केला त्यांना अपयश आलेले दिसते; म्हणून पुरुषसत्ताक व्यवस्थेचा समाज आणि कुटुंब सदस्यांवर किती प्रभाव आहे, हे सिद्ध करता येते.

**लिंगभावात्मक सामाजिक वर्ग**

लिंगभावात्मक वर्गवारीमध्ये स्त्रिया या वंचित वा शोषित वर्गातील आहेत. स्त्रियांचे पुरुष वर्गांशी वर्गीय दर्जाचे नाते समानतेवर आधारलेले नसते, तर श्रेष्ठ-कनिष्ठतेवर आधारलेले असते. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगत समाजातील विशिष्ट वर्गातील स्त्रियांना कनिष्ठ वर्गांतील पुरुषांपेक्षा थोडा वरचा दर्जा मिळतो; हा आभास निर्माण होतो असे मिलेटला वाटते. पुरुषप्रधान व्यवस्थेत विविध वर्गानुसार कमी-जास्त स्वरूपाचा दर्जा प्राप्त होतो. कनिष्ठ वर्गात स्त्रिया उत्पादक असल्यामुळे काही प्रमाणात स्त्रियांना सत्ता बहाल करावी लागते. कनिष्ठ वर्गातील पुरुष लिंगाच्या आधारावर श्रेष्ठत्व प्राप्त करतो. याउलट, उच्च आणि मध्यम वर्गांतील पुरुष पुरुषप्रधान व्यवस्थेच्या आधारावर सत्तेचा अधिक वाटा प्राप्त करतो. परिणामतः त्या वर्गांतील स्त्रियांना अधिक शोषणाला सामोरे जावे लागते. वर्गीय स्तरीकरणाच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रिया स्त्रियांच्या शत्रू बनतात. उदा. करियर करणाऱ्या स्त्रिया विरुद्ध गृहिणी. आवश्यक

संसाधने आणि संधीच्या अभावामुळे स्त्रियांमध्ये वर्गजाणीव निर्माण होत नाही. त्यामुळे त्यांची वर्गीय व्यवस्थेतील गुंतवणूक कमी प्रमाणात असते. मिलेट सांगते की, स्त्रिया नावाचा परावलंबी गट पुरुष नावाच्या मालकावर अवलंबून असतो. त्यांचे परिघावरचे स्थान कायम रहावे म्हणून त्यांना सनातनी बनविले जाते. प्रेम नावाच्या भावनिक साधनाच्या जोरावर पुरुष स्त्रीचे सहजपणे शोषण करू शकतो, तिला हवे तसे वळवू शकतो.

**आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्र**

पुरुषसत्ताक लिंगभाव व्यवस्था स्त्रियांवर आर्थिक नियंत्रण प्रस्थापित करते. स्त्रियांच्या घरगुती श्रमाला उत्पादक मानले जात नाही. कायद्याच्या दृष्टीने घरगुती समाजाला स्थान नसल्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या दुय्यम ठरतात. रोजगाराच्या क्षेत्रात दुय्यम दर्जा, शारीरिक कष्ट आणि कमी वेतनाचे रोजगार स्त्रियांना बहाल केले जातात; म्हणून पुरुषप्रधान व्यवस्थेच्या राज्यात स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व निश्चित केले जाते. व्यवस्था भांडवलशाही असो की समाजवादी, शेवटी समाजव्यवस्था पुरुषप्रधान असते, हा निष्कर्ष मिलेट काढते. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरकाम आणि नोकरीच्या ठिकाणी श्रम दोन्ही ठिकाणचे ओझे उचलावे लागते. तंत्रज्ञान आणि उत्पादनाच्या क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग अत्यल्प असतो. त्या करत असलेल्या घरगुती आणि वैयक्तिक सेवांना बाजारपेठीय मूल्य नसते. ज्ञानावरचे नियंत्रण सत्ता मानली जाते आणि ज्ञानाच्या प्रक्रियेत स्त्रियांचा कमी सहभाग हे दुय्यमत्व निश्चित करण्यासाठी पुरेसे आहे. शिक्षण व्यवस्थेतदेखील विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात शिक्षण व प्रशिक्षणात सहभाग अत्यंत कमी असतो. मानवतावादी शिक्षणामध्ये स्त्रियांना प्रवेशित केले जाते. शिक्षणाच्या माध्यमातून बालपणातील संस्कार अधिक भक्कमपणे रुजविण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षणातून पुरुषांच्या वाट्याला येणारी गुणवत्ता स्त्रियांना मिळत नसल्यामुळे त्या सांस्कृतिकदृष्ट्या दुय्यम ठरतात; म्हणून स्त्रियांचे दुय्यमत्व नैसर्गिक प्रक्रियेत येत नसून सामाजिक प्रक्रियेतून निर्माण होत असते

**दमनयंत्रणा**

राजकीय व्यवस्थेप्रमाणे पुरुषप्रधान व्यवस्था लिंगभाव आधारित दमनयंत्रणेच्या माध्यमातून आपले वर्चस्व सिद्ध करत असते. स्वतः निर्माण केलेल्या वैधानिक व्यवस्थेच्या मार्फत लिंगभाव पुरुषप्रधान व्यवस्था दमनयंत्रणा पद्धतीशीरपणे कार्यरत असते. उदा. स्त्रियांना गर्भपाताचा अधिकार नाकारणे. स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराला दिला जाणारा प्रतिसाद विसंगतियुक्त स्वरूपाचा असतो. एका बाजूला स्त्रीला संरक्षण देण्यात पुरुष कमी पडला या स्वरूपाचा, तर दुसऱ्या बाजूला त्यात उत्तेजितता व मनोरंजनाची भावना असते. दमनप्रक्रिया पुरुषप्रधान व्यवस्थेचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य असते. पुरुषांची दमनयंत्रणा शारीरिक हिंसाचार आणि बलात्कारसारख्या कृतीतून अभिव्यक्त होत असते. पुरुषप्रधान व्यवस्थेतील दमन आणि हिंसाचाराला वैचारिक बैठक प्रदान केलेली आहे. या बैठकीच्या आधारावर दोन लिंगांमधील हिंसाचार समर्थनीय मानला जातो. मिलेटच्या मते, पुरुषप्रधान व्यवस्थेतील क्रौर्य आणि लैंगिकतेचे समीकरण पाप आणि सत्ता या दोन्ही संकल्पनांशी जोडलेले आढळते..

**मानसशास्त्रीय परिणाम**

दर्जा, स्वभाव आणि भूमिकेसंदर्भातील मूल्यव्यवस्थांना मानसशास्त्र दोन्ही लिंगांसंदर्भात विविध अर्थ प्रदान करतात. पुरुषसत्ताक व्यवस्थेने निर्माण केलेल्या मूल्यांमुळे स्त्रियांच्या अहंगंडाला जी इजा पोचते त्याचा अभ्यास मानसशास्त्राने अद्यापपर्यंत केलेला नाही. पुरुषप्रधान सामाजिक समज, विचारप्रणाली आणि परंपरेच्या परिणामातून स्त्रियांना वेदनादायक अनुभवांना सामोरे जावे लागते. त्यामुळे स्त्रिया अल्पसंख्याक गंडाने ग्रासून परिघाबाहेरचे जीवन व्यतीत करतात. पुरुषप्रधान व्यवस्था जगभर पसरलेली आहे. ती नैसर्गिक आहे. हा समज विकसित केला गेला आहे. या व्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या पुरुषी सत्तेला प्रश्नांकित करून तिचे खरे स्वरूप उघडे केले; तर चर्चेला जागा उपलब्ध होऊन सद्यकाळात अपेक्षित परिवर्तन घडून येईल, असे मिलेटला वाटते.

अशा पद्धतीने मिलेट समाजातील विविध क्षेत्रांत पुरुषप्रधान व्यवस्थेने उभ्या केलेल्या रचिताचे अध्ययन करून पुरुषी वर्चस्व जैविक घटकांच्या आधारावर नव्हे, तर सामाजिक परिस्थितीतून निर्माण होते हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करते.

**लैंगिक क्रांतीची संकल्पना**

लैंगिक क्रांतीविषयी मिलेटने आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात सिद्धांकन केलेले आहे. १९६८ साली लिहिलेल्या क्रांतीच्या जाहीरनाम्यात लैंगिक क्रांतीविषयीचे विचार मांडलेले आहेत. त्यात लैंगिकतेविषयीचे पारंपरिक प्रतिबंध आणि योग्यायोग्यतेचे निकष नष्ट करावे. पुरुषप्रधान व्यवस्थेतील एक पती-पत्नी विवाहाला घातक सिद्ध होणाऱ्या लैंगिक कृतीविषयीचे (समलिंगी संभोग, अवैधतेची संकल्पना) असमज कमी झाल्याशिवाय लैंगिकतेविषयीची नकारात्मक भावना कमी होणार नाही. स्त्री-पुरुषांच्या लैंगिक स्वातंत्र्यासाठी एकच निकष लागू करणे, हे लैंगिक क्रांतीचे ध्येय आहे. प्राथमिक पातळीवरील लैंगिक क्रांतीतून पुरुषाच्या वर्चस्ववादी प्रवृत्तीचा ऱ्हास होण्यास सुरुवात होईल. परिणामतः पारंपरिक सामाजिकीकरण प्रक्रियेतून दर्जा, भूमिका आणि प्रवृत्ती निर्माण होतात, त्यांचाही ऱ्हास होईल आणि स्वतंत्र लैंगिक उपसंस्कृती एकात्म होण्याची प्रक्रिया सुरू होईल. लैंगिक स्वातंत्र्यामुळे एक पती-एक पत्नी हे विवाहाचे स्वरूप नष्ट होईल. कुटुंबव्यवस्थेद्वारा निर्माण होणारी पुरुषप्रधान मालकी हक्कांची संकल्पनादेखील लोप पावेल. स्त्रियांचा देवी दर्जा आणि दुय्यमत्वदेखील नष्ट होईल, तेव्हा खऱ्या अर्थाने स्त्रिया संपूर्ण स्वातंत्र्याचा आविष्कार करतील.

लैंगिक क्रांतीमुळे कुटुंबव्यवस्थेची जागा घेण्यासाठी सामूहिक वा व्यावसायिक बालसंगोपन व्यवस्था निर्माण कराव्या लागतील. स्त्री जोपर्यंत बाई आहे म्हणून मूल जन्माला घालते. तोपर्यंत बालसंगोपनाची जबाबदारी तिच्यावरच सोपविली जाईल आणि तिला माणूस होण्यापासून वंचित केले जाईल; म्हणून बालसंगोपनाची सार्वजनिक व्यवस्था लैंगिक क्रांतीसाठी मिलेटला आवश्यक वाटते. पुरुषप्रधान व्यवस्थेने दोन्ही लिंगांसाठी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची रचना उभी केलेली आहे. ती रचना मानवी मनाची सवय आणि जीवनपद्धतीतून प्रदर्शित होत असते; म्हणून लैंगिक क्रांती होण्यासाठी आवश्यक पृष्ठभूमी निर्माण करण्यासाठी

मानवी जाणिवेच्या रचनेमध्ये क्रांती होण्याची आवश्यकता आहे. स्त्री आणि पुरुषांमधील प्राथमिक सामाजिक आणि राजकीय विभेद संपत्ती आणि दर्जाच्या आधारावर ठरत नसून लैंगिक निकषावर निश्चित होतात. आपल्या संस्कृतीचा पाया पुरुषप्रधान व्यवस्थेने रचलेला आहे. ही संस्कृती उखडून फेकण्यासाठी लैंगिक क्रांतीची आवश्यकता आहे, असे मिलेटला वाटते.

**पहिला टप्पा**

मिलेटने १८३० ते १९३० हा कालखंड लैंगिक क्रांतीचा पहिला टप्पा मानलेला आहे. हा कालखंड क्रांतिकारी (युरोप व अमेरिकेतील क्रांत्या) आणि नागरी सुधारणेच्या (उदा. मतदान हवा दृष्टीने महत्त्वाचा आहे. या कालखंडात जॉन मिल यांनी Subjection of Women ग्रंथात स्त्रियांविषयी उदारमतवादी भूमिका मांडली; त्यांना योग्य स्थान देण्याची शिफारस केली, तर जॉन रस्किनने व्हिक्टोरियन विचारधारेचा वापर करून स्त्रियांचे उदात्तीकरण करून त्यांचे दुय्यमत्व झाकण्याचा प्रयत्न केला. मिलच्या विचारांतून क्रांतीची संभाव्यता व्यक्त होते, तर रस्किनच्या विचारातून पुरुषी उदारपणाचे दर्शन घडते, असे. मिलेटला वाटते. पुरुषसत्ताक कुटुंबव्यवस्थेच्या रचनांबद्दल सिद्धांकन करणारा एंगल्स हा सर्वाधिक बंडखोर विचारवंत होता, असे मिलेटला वाटते. लैंगिक वर्चस्वातून दर्जा, वर्ग आणि संपत्तीबाबत उतरंडी निर्माण झाल्या. पुरुषांनी स्त्रियांवर स्वामित्व मिळविणे हीच वर्गीय दडपणुकीची सुरुवात होती, ही जाण एंगल्सला सर्वप्रथम झाली, असे मिलेटला वाटते. एंगल्सने लैंगिक क्रांतीसंदर्भात दिलेल्या योगदानाचे महत्त्व मिलेट अधोरेखित करते. त्याने पुरुषप्रधान विवाह आणि कुटुंबसंस्थेच्या विवेचनात तिला बंडखोरीचा नवा मार्ग दिसतो. एंगल्सने ऐतिहासिक द्वंद्ववादाच्या आधारावर स्त्रियांच्या दडपणुकीचा विचार केलेला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या दडपणुकीचा एकत्रित विचार करणे शक्य आहे. एंगल्सच्या स्त्रीविषयक आकलनात असलेल्या उणिवांवरदेखील मिलेट बोट ठेवते. एंगल्स स्त्रियांच्या लैंगिकतेविषयीचा विचार व्हिक्टोरियन संस्कृतीतील पुरुषवादी गृहीतकावर आधारलेला आहे. तसेच तो स्त्रियांच्या दुय्यमत्वाचा विचार वर्गीय चौकट आणि आर्थिक नियतवादाशी जोडतो. सामाजिक आणि मानसशास्त्रीय चौकटीत स्त्रियांच्या दुय्यमत्वाचा विचार करत नाही. एंगल्सच्या लिखाणातील उणिवा मान्य करून एक पति-पत्नी विवाहातील दुटप्पी भूमिका स्पष्ट करतो; कारण अशा विवाहामुळे पुरुष इतरांशी लैंगिक संबंधाला मुक्त असतो परंतु स्त्रीला तो अधिकार नसतो. तो वेश्या व्यवसायाविषयीदेखील स्पष्ट मत व्यक्त करतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेविषयी त्याने केलेली चिकित्सा सर्वस्वी क्रांतिकारी स्वरूपाची वाटते. कुटुंब हे वित्तीय संस्थेचे एकक असते. त्याचा खरा पाया आर्थिक असतो. मिलेटला असे वाटते.

**मिलेटच्या विचारांचे योगदान**

केट मिलेटचे लैंगिकतेचे राजकारण हे पुस्तक जहाल स्त्रीवादी सिद्धांकनात अत्यंत वरच्या दर्जाचे मानले जाते. लैंगिकतेच्या राजकारणाचा जो आढावा घेतला आहे, तो लक्षणीय स्वरूपाचा मानला जातो. लैंगिक क्रांतीसाठी पुरुषप्रधान व्यवस्थेच्या सर्वसमावेशक विश्लेषणाची गरज ती व्यक्त करते. पुरुषप्रधान व्यवस्थेच्या

विश्लेषणाद्वारे स्त्रियांच्या दडपणुकीचे सर्वसमावेशक सिद्धांकन करून मानवी समाजात पुरुषप्रधान व्यवस्था कशी स्थिर झाली याविषयी विविध पुराव्यांच्या आधारावर समज विकसित करते.

**सत्तेचे राजकारण :** लिंगभावसंबंधात 'राजकारण' असते. येथे 'राजकारण' हा शब्द कोणत्याही नातेसंबंधांमध्ये सत्तेचा खेळ चालू असतो, ही वस्तुस्थिती सुचवतो. कारण समाजात संसाधने, निर्णयक्षमता इत्यादींबाबत सत्ता, अधिकार आणि नियंत्रणाचे विषम वाटप झालेले असते. त्यामुळे कुटुंबातील स्त्री पुरुषांत उघडपणे वा गुप्तपणे, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हा सत्तेचा खेळ चालू असतो. हे जसे कुटुंबात घडते, तसेच कामाच्या ठिकाणीही घडते. लिंगभावसंबंधातील राजकारणासोबतच समाजात सर्वत्र जात, वर्ग, वंश इत्यादींवर आधारलेले सत्तेचे राजकारण खेळले जात असते.लैंगिक दडपणूक संपून अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य निर्माण होईल आणि लैंगिक ऊर्जा मुक्त होईल. जरी काही प्रमाणात लैंगिक स्वातंत्र्य आत्ताच्या समाजात प्राप्त केले असले, तरी आता त्याचे रूपांतर स्वातंत्र्यशीलतेच्या पलीकडे असणाऱ्या शोषणात्मक परवान्याच्या रूपात होऊन, त्यातून पुरुषसत्ताकता आणि प्रतिगामी सनातन हिंसकताच निर्माण होते.

**लिंगभावात्मक पुरुषसत्ताक शिक्षण :** शिक्षण आणि सर्वांगिण आधुनिकता किंवा विकास यामुळे स्त्री पुरुषांमध्ये समानता प्रस्थापित खरे तर व्हायला हवी, परंतु होईलच असे नाही. कारण बऱ्याचदा शिक्षण हेच पुरुषसत्ताक असते, आणि स्त्री-पुरुषातील प्रस्थापित विषमता न्याय्य ठरवून ती रुजवण्याचा किंवा विषमतेकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न त्यात केलेला असतो. पाठ्यपुस्तकांच्या आणि मुलांच्या साहित्याच्या विश्लेषणातून हेच सिद्ध झालेले आहे की लिंगभावात्मक पूर्वग्रह जोपासताना पाठ्यपुस्तकातील लिखाणाचा कल पुरुषांकडे अधिक झुकलेला असतो. अशाप्रकारचे पूर्वग्रह साधारणतः सर्व शैक्षणिक संबंधाना लिंगभावात्मक संबंध किंवा लिंगभावसंबंध असे म्हणतात, लिंगभावात्मक संबंध ही संकल्पना स्त्री-पुरुषांतील सत्तासंबंधांशी संबंधित असून त्याचा प्रत्यय अनेक प्रकारच्या कल्पना, प्रथा, प्रतिरूपणाच्या विस्तृत पटातून येत असतो. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषांतील श्रमविभाजन, भूमिका व संसाधनांचे वाटप यविषयीच्या व्यवहारातून हा प्रत्यय येत असतो. स्त्रीपुरुषांच्या क्षमता, इच्छा व व्यक्तिमत्त्वातील गुण आणि वर्तणुकीच्या पद्धती लिंगभावात्मक संबंधांमुळे निश्चित केल्या जातात आणि त्या भिन्नच असतात, असे सांगितले जाते. लिंगभावात्मकसंबंध अशा धारणा, तत्त्वप्रणाली व व्यवहारातून घडतात

**भूमिका आणि जबाबदारी :** लिंगभावाच्या माध्यमातून पुरुष हा कुटुंबप्रमुख, मुख्य कमावता, मालमत्तेचा मालक आणि मालमत्ता सांभाळण्याचे निर्णय घेणारा मानला जातो. पुरुषाने मुख्यतः व्यापार उदीम, राजकारण, धर्मकारण व व्यवसाय या क्षेत्रात कार्यरत असावे, अशी अपेक्षा असते. तर याउलट स्त्रीने मुलांना जन्म द्यावा, त्यांचा योग्य सांभाळ करावा, त्यांच्यावर योग्य संस्कार करावेत; घरातील आबालवृद्ध, आजारी व्यक्तींची मनोभावे सेवा करावी, घरातील इतर कामे चोखपणे करावी, असे मानले जाते. लिंगभावा आधारित मुलामुलींच्या ह्या समाजाने नेमून दिलेल्या भूमिकांनुसार कोण पुढे जाऊन शिक्षण घेणार किंवा नाही, कोणते शिक्षण घेणार किंवा कोणता व्यवसाय, नोकरी करणार किंवा नाही याचे निर्णय किंवा त्यांची पूर्वतयारी करीत असतो. मात्र स्त्रिया किंवा पुरुषांच्या भूमिकांविषयीच्या अपेक्षा विविध समाजात बऱ्याच भिन्न असतात. अनेकदा त्याविषयीचे नियम केवळ नोंदवलेले असतात आणि स्त्रीपुरुषातील भूमिकांच्या तात्पुरत्या

अदलाबदलीविषयीही स्त्री आणि पुरुष दोन्ही बाजूंनी फारशी काळजी दाखवली जात नाही हे लिंग लिंगभावचे मुख्य वैशिष्ट म्हणावे लागेल.

**आर्थिक कार्ये:** स्त्रीपुरुषांची आर्थिक कार्ये वेगवेगळी असली तरी स्त्रीपुरुषांनी एकमेकांची कामे करणे गैर समजले जात नाही. याउलट स्त्री पुरुषांची किंवा पुरुष स्त्रियांची कामे करू शकत असतील तर अशी पूरक कौशल्ये असणे, हे प्रशंसनीय समजले जाते. स्त्रिया उपजीविका सांभाळतात व पुरुष आर्थिक सौदे करतात. परंतु अनेक पुरुष मनापासून बागकाम करत तर बायकांकडे आर्थिक कौशल्ये असतात. काही संस्कृतीत मात्र बागकाम हे बायकांचेच काम आहे, असे मानतात. म्हणून मग पुरुषांची बागकामाची आवड हीदेखील त्यांच्या नामर्दपणाची खूण ठरते. काही ठिकाणी तर ज्या स्त्रिया स्त्री-पुरुष दोघांचीही कामे करू शकतात, त्यांना 'विशेष' मानले जाते.

**लिंगभाव सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक प्रारूप**

| | |
|---|---|
| स्त्री | पुरुष |
| शरीर | मन / बुद्धी |
| निसर्ग / प्रकृती | संस्कृती |
| भावना | विचार |
| खाजगी | सार्वजनिक |

**लिंगभाव आणि श्रमविभागणी**

आजच्या जगात दिसणारे स्त्रियांचे काम, पुरुषांचे काम अशी विभागणी 'नैसर्गिक' नाही, उत्क्रांतीच्या प्रक्रियेत सहज घडलेली नाही हे सांगण्यासाठी स्त्रीवादी अभ्यासक लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी ह्या विषयी बोलू लागल्या. स्त्रियांना भोगावी लागणारी विषमता त्यांच्या बाईपणाशी अथवा देहाशी निगडीत नसून सामाजिक परिस्थितीतील भौतिक वास्तवाशी आहे हे स्त्रीप्रश्नाचा विचार करणाऱ्यांना जाणवले. स्त्रिया दुय्यम का झाल्या ह्याची अनेक स्पष्टीकरणे दिली गेली आहेत. काहींच्या मते

खाजगी संपत्तीच्या उदयामुळे स्त्रियांनाच खाजगी मालमत्ता मानले जाऊ लागले व काहींच्या मते मानवी समाजातील युद्धखोरीमुळे स्त्रिया दुय्यम झाल्या.

भारतीय संदर्भात पाहता स्त्रिया घरकाम करीत असतानाच अनेक तऱ्हेचे उत्पादक काम करीत असतात. उदाहरणार्थ, अडत व्यापाऱ्यांच्या घरात मोठ्या प्रमाणावर आणलेले धान्य साफ करण्याचे, जपून ठेवण्याचे काम स्त्रिया करतात. इतकेच नाही तर अनेक घरात त्या अनेक तऱ्हेचे हस्तोद्योग करतात. अन्नपदार्थ तर सर्वच स्त्रिया तयार करतात. परंतु ह्या प्रक्रियेतील विषमता लक्षात घेतली पाहिजे. स्त्रियांचे भांडवलावर नियंत्रण नसते. ज्ञान, संपत्ती, कला, कौशल्ये, साधनसामग्री ह्या कशावरही त्यांचा हक्क नसतो. आपली स्वतःची श्रमशक्ती आणि आपण उत्पन्न केलेल्या वस्तूंची विक्री ह्यावर स्त्रियांचे नियंत्रण नसते. त्यामुळे

स्त्रियांचे श्रम म्हणजे लवचिक साधनसामग्री असते. म्हणजेच, पुरुषप्रधान कुटुंब व्यवस्थेत स्त्रियांच्या उत्पादक कामावर नियंत्रण ठेवलेले असते. गरज पडली तर त्यांनी काम करावे नाहीतर घराण्याची इज्जत सांभाळावी असा हा अलिखित करार असतो. म्हणूनच आपल्या सांस्कृतिक संदर्भात जात वर्ग ह्यांच्या विषमतेची मुळे स्त्रीच्या दुय्यम स्थानाशी निगडीत आहेत असे म्हणता येईल. शासन संस्थाही आपल्या कल्याणकरी योजनांद्वारे अथवा विकासाच्या विशिष्ट ढाच्यातून हेच घडवीत असते. 'कुटुंबातील' स्त्रिया हाच एक चष्मा सर्वांनी घालेला असतो. मग म्हणूनच घरात आणि घराबाहेर स्त्रियांना पापड, लोणची करण्याचे काम मिळते. त्यातही घातक प्रकार असा असतो की, मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी हे पदार्थ करताना स्त्रियांची त्यातील निर्मितीक्षमता आणि आत्मीयताही मारली जाते.

**लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणीचे महत्त्वाचे घटक :**

१. लिंगभावच्या आधारे स्त्री कामगारांना विशिष्ट प्रकारचे, विशिष्ट क्षेत्रात काम मिळते.

२. लिंगभेद च्याआधारे स्त्रियांना कमी वेतन मिळते आणि अकुशल कामगार मानले जाते.

३. त्यांचे स्वतःच्या श्रमशक्तीवर नियंत्रण नसते.

४. कृषी विषयक आणि अन्य प्रकारची अनेक कामे स्त्रियांकडून करवून घेतली जातात, परंतु ती 'अदृष्य', 'विनावेतन' असतात.

५. घरात आणि घराबाहेर कामाचे दुहेरी ओझे स्त्रिया आपल्या खांद्यावर वागवितात

६. जातीय वरच्या जातीवर्गाच्या स्त्रिया चार भिंतीत, पडदानशीन जगतात.

७. लिंगभाव आधारित पुरुषप्रधानतेमुळे स्त्रियांच्या कामाचे अवमूल्यन तर होतेच, पण जेथे स्त्रिया स्वतः घर चालवित असतात तेथेही स्त्रियांचे अर्थार्जन पूरकच मानले जाते.

### **४.२.३ भारतातील लिंगभावाचे राजकारण** (Gender Politics in India):

समाजातील अनेक महत्त्वपूर्ण घटकांपैकी स्त्री हा एक घटक आहे. परंतु पूर्वीपासूनच स्त्रीला समाजात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नव्हते. भारतात तर स्त्रियांना अत्यंत हीन दर्जाची व तुच्छतेची वागणूक दिली जात आली आहे. शतकानुशतके त्यांना रूढी, परंपरा, धर्माज्ञा व कायदे याद्वारे पारतंत्र्यात ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे आपल्या देशात बालविवाह, हुंडाप्रथा, पडदा पद्धती, देवदासी आणि वेश्या व्यवसाय आदी सामाजिक समस्या निर्माण झाल्या. स्त्रिया शिक्षणापासून ही वंचित राहिल्या त्यांचे हक्क व स्वातंत्र्य नाकारले गेले. त्यांना सहाय्यक व सहधर्मिणी बनण्याऐवजी घरकाम करणारी दासी व आपल्या भोगविलासाचे साधन बनविले गेले. भारतात प्रबोधनाच्या आगमनाने उपरोक्त मानवी मुल्यांची जाणीव झाली आणि स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध विचार व चळवळी निर्माण झाल्या. त्यासाठी अनेक विचारवंतानी प्रयत्न केले. स्त्री-पुरुष यांच्यात प्रचलित असलेले सर्व प्रकारचे भेदभाव नाकारून संविधानाद्वारे लिंगभाव समानता प्रस्तापित करण्यात आली पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना सर्व अधिकार देण्यात आले. त्यांचे अत्याचारापासून व

शोषणापासून संरक्षण होण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. तरीपण समाजात स्त्री-पुरुष समानता निर्माण होऊ शकली नाही लिंगभावाधारित भेदभाव केला जातो. विविध प्रकारे शोषण केले जाते. जागतिकीकरणाच्या आगमनाने काही बाबतीत खुलेपणा जरी वाटत असला तरी स्त्रियांच्या शोषणात आणि अत्याचारातवाढ होताना दिसत आहे.

भारतीय संदर्भात लिंगभाव पुरुषशाही व्यवस्था समजावून घेताना भिन्न जात, वर्ग, जमाती, धर्म ह्यातील भिन्न अभिव्यक्तीचा विचार केला पाहिजे. उदाहरण घ्यायचे तर पावित्र्याच्या प्रश्नावरून सीतेला अग्निदिव्य करायला लावणाऱ्या आपल्या सांस्कृतिक इतिहासात चक्रवर्ती मुले जन्माला घालणाऱ्या ययातीच्या मुलीला, माधवीला, अनेक सम्राटांना 'देऊन टाकलेले' दिसते. माधवीचे चक्रवर्ती मुलांना जन्म घालण्याचे यंत्र बनविणे ही घटना समजावून घेण्यासाठी पुरुषशाही व्यवस्था ही संकल्पना महत्त्वाची ठरते. तसेच चार घराच्या भिंतीत राहणे ह्यातच स्त्रीजातीची प्रतिष्ठा मानण्यातून ज्या स्त्रियांना पोटासाठी घराबाहेर राबावे लागते, त्यांना ही प्रतिष्ठा नाकारली जाते. स्त्रियांच्या जाणिवेत अशा तऱ्हेने पवित्र विरुद्ध अपवित्र स्त्रिया असा भेद निर्माण केला जातो. वरच्या जाती, वर्गातील स्त्रीला देवी बनविले जाते तर अन्य स्त्रियांना दासी, वेश्या वा मोलकरीण. पुरुषांपेक्षा स्त्रीचे चारित्र्य मापण्याचे मापदंड, नितीनियम, कायदे, बंधने वेगळी होती. त्याशिवाय पुरुषाच्या वर्चस्वाखाली राहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. अशा अनेक समस्यांनी स्त्री जीवन व्यापून टाकले होते. त्यामुळे स्त्रीला जीवन जगणे असह्य झाले होते. म्हणून स्त्रीच्या या दुर्बलतेस कारणीभूत असणारी समाज व्यवस्था बदलणे गरजेचे होते; या दृष्टिकोनातून एकोणिसाव्या शतकात सुरुवात झाली.

**१) भारतातील स्त्रियांचे दास्यत्व विरोधी व समाजसुधारणेसाठी झालेल्या चळवळी:**

१९७० चे दशक हे भारतात नव्या सामाजिक चळवळीच्या संदर्भात लक्षणीय ठरले युरोप अमेरिकेतील विद्यार्थी व कृष्णवर्णीय चळवळी बरोबरच जगभरातील युद्धविरोधी चळवळी शांतता चळवळी वंशवाद विरोधी नागरी हक्काच्या चळवळी स्त्रियांच्या चळवळी याचा संदर्भ होता भारतात स्वतंत्र उत्तर काळातील पहिली दोन दशके इच्छा आकांक्षा पूर्ततेची कल्याणकारी व रचनात्मक कार्य पूर्ततेची दशके होती हरितक्रांती पंचवार्षिक योजना जमीन सुधारणा यामुळे भारतीयांच्या अशा जागृत झाल्या होत्या परंतु सत्तरच्या दशकामध्ये वंचित दबला गेलेला समाज या कालावधीत अधिकच दबला गेला मात्र याच कालावधीत स्त्री आत्मभान जागृत होण्यास मदत झाली आणि स्त्री संघटित होऊन स्त्रीमुक्ती चळवळ उभी राहिलेली दिसून येते स्त्री चळवळीकडे पाहिल्यास त्याचे स्थूलमानाने दोन टप्पे दिसून येतात १९७० पासून १९८५-९० पर्यंतचा पहिला टप्पा १९८५-९० पासूनचा स्त्रीमुक्ती चळवळीचा दुसरा टप्पा पहिल्या टप्प्यातील स्त्री मुक्ती चळवळीला एक वेगळी धार होती ती अधिक कृती प्रवरण व लढाऊ होती १९८५ नंतर मात्र तिची प्रखरता काही प्रमाणात कमी झालेली दिसून येते तिच्यामुळे नवी आव्हाने उभे राहू लागली आणि १९७० च्या दशकात सुरू झालेल्या स्त्री मुक्ती चळवळीचे बिजारोपण १९व्या शतकातील स्त्री हक्काच्या सुधारणावादी चळवळीमध्ये असल्याचे दिसून येते. भारत स्वतंत्र होण्यापूर्वी झालेले प्रयत्न प्रामुख्याने परंपरेने चालत आलेल्या अमानवी, रूढी प्रथा, परंपरा, मधून मुक्त करण्यासाठी आणि स्त्रिया यांना सामाजिक प्रवेश मिळवून देण्यासाठी झालेले दिसून येतात.

भारतात पूर्वीपासूनच महिलावर अन्याय अत्याचार होत आहेत सर्व बाजूंनी तिचे शोषण होत आहे. यापासून स्त्रियांची मुक्ती होण्यासाठी भारतात १९व्या शतकापासून समाजसुधारकांनी व स्त्रियांनी चळवळी सुरू केलेल्या दिसून येतात. उदाहरणार्थ राजा राममोहन, दयानंद सरस्वती, केशव चंद्रसेन, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, महात्मा फुले सावित्रीबाई फुले, गोदावरी परुळेकर अनुताई वाघ इत्यादी सारख्या समाजसुधारकांनी चळवळीच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये जागृती घडवून त्यांना स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न केला १९३२ च्या सुमारास अनेक स्त्रियांच्या संघटना निर्माण झाल्या असल्या तरी राष्ट्रीय पातळीवर नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन अँड वुमेन्स इंडिया असोसिएशन या संस्था स्त्रियांच्या हक्कासाठी कार्यात होत्या. १८२८ मध्ये राजाराममोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाची स्थापना करून सती प्रतीच्या विरोधात चळवळी निर्माण केली १९२९ मध्ये सती प्रथा बंदीचा कायदा केला. तसेच बालविवाह बंदी करण्यासाठी व विधवांचे पुनर्विवाह त्यासाठी समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या या प्रयत्नामुळे १८५६मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा बनविण्यात आला केशव चंद्रसेन यांच्या प्रयत्नातून १८७२ मध्ये विशेष विवाह कायदा लागू झाला त्यामुळे विधवा पुनर्विवाह व आंतरजातीय विवाहास मान्यता मिळाली त्याप्रमाणे रमाबाई रानडे डॉक्टर कामा नोरदत्त मार्गरेट नोबेल या महिलांनी तसेच अखिल भारतीय महिला संमेलन, भारतीय महिला समिती विद्यापीठ, महिला संघ अखिल भारतीय स्त्री शिक्षण संस्था व गांधी स्मारक ट्रस्ट इत्यादी संघटना यांनी स्त्रियांना अधिकार प्राप्त होण्यासाठी जागृती घडवून आणण्यासाठी अविरत प्रयत्न केले. महात्मा गांधी स्त्री पुरुष समानतेचे समर्थक होते. स्त्रियांनी राष्ट्रीय आंदोलन सहभाग घ्यावा याकरिता महात्मा गांधी यांनी त्यांना प्रोत्साहित केले. १९ व्या शतक स्त्री मुक्तीचा लढा समाजसुधारकांनी दिला असला तरी तो सर्वसामान्य स्त्रिया पर्यंत पोहोचण्याचे कार्य महात्मा गांधींनी केले १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या लढ्यात हजारो स्त्रियांनी प्रतिसाद दिला परिणामी स्त्री पुरुष मतभेद विसरून स्त्रीया स्वतंत्र्याच्या चळवळीत मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. १९४२ च्या स्वतंत्र लढ्यास स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला त्या लढाईचे स्वरूप करेंगे या मरेंगे असे होते त्यामुळे स्त्रियांना कमी लेखण्याचा विचार कोणी केला नाही

महाराष्ट्रात देखील पंडिता रमाबाई यांनी महिला समाजाची स्थापना केली ही १८९२ मध्ये समाजसुधारकासाठी सुधारणावादी कार्यक्रम राबविण्यात आला. रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई जोशी यांनी स्त्री शिक्षणाचा अर्थ सामाजिक परिवर्तन असा घेऊन सामाजिक कार्यक्रम सुरू केले होते. महाराष्ट्रात स्त्रियांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यात व्यवस्थेविरुद्ध लढा पुकारून स्त्रियांवरील अत्याचार रुढी परंपरा तोडण्याचे धाडस सावित्रीबाई फुले यांनी केले खऱ्या अर्थाने त्यांना स्त्रीमुक्तीच्या आद्यप्रणेत्या म्हटले जात स्त्री म्हणजे भोग वस्तू, पायाची दासी, नरकाचे द्वाराच्या कल्पना लिंगाभाव आधारित असलेल्या समाजात सर्वप्रथम प्रयत्नांची सुरुवात सती प्रतीला विरोध करण्यापासून झाली. धर्मांधाकडून या प्रथेचे उदातीकरण केले जात होते. सन १८२३सरकारचे अधिकारी लॉर्ड बेंटिक यांनी केले त्याला राजाराम मोहन रॉय यांनी पाठिंबा दिला व या प्रथेविरुद्ध जोरकस प्रचार केला शेवटी ही प्रथा बंद झाली. लॉर्ड बेंटिक यांनी मुलीची भृणहत्या व स्त्रियांचा व्यापार या प्रथा ही बंद केल्या राजाराममोहन रॉय, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, पंडिता रमाबाई, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले

फातिमा शेख, छत्रपती शाहू महाराज, न्यायमूर्ती रानडे, गोखले, ईश्वरचंद्र विद्यासागर, महर्षी कर्वे, बेहरामजी मालबरी, या व अशा अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी मूलभूत असे कार्य केले. राष्ट्रीय काँग्रेसने ही स्त्रियांना पक्षात स्थान दिले महात्मा गांधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठा होता. सामाजिक सुधारणेचे भारतात बिजारोपण झाले ते बंगाल पाठोपाठ महाराष्ट्रात ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले आणि शूद्रातिशूद्र बरोबर स्त्री दास्याचे ही अत्यंत प्रखर मांडणी केली. सती आणि सता सवत आणि सवता असा भेद मांडत थेट स्त्री-पुरुष विषमतेच्या प्रश्नाला हात घातला फुले दाम्पत्यांनी विधवा विवाहला पाठिंबा देऊन बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. त्यातून नढलेल्या विधवांना जीवनाचा मार्ग मोकळा करून दिला. फुलेंच्या सत्यशोधक परंपरेतील ताराबाई शिंदे यांनी स्त्री पुरुष तुलना हे पुस्तक १८८२ मध्ये लिहून स्त्री-पुरुष विषमतेसंबंधी मूलगामी प्रश्न उपस्थित केले.

अस्पृश्यता उन्मूलन हे आपल्या जीवनाचे देह मानलेल्या याच परंपरेतील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्त्री पुरुष समानतेची मूल्ये जोपासली. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला मुरळी प्रथेविरुद्ध लढा उभारला छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात कायदे केले कृष्णाबाई केळकर आणि छत्रपतीच्या सुनबाई इंदुमती रानी साहेब या दोघींचे आयुष्य म्हणजे छत्रपतीच्या स्त्री शिक्षण विचाराचे प्रतिबिंब होते. फुले, शिंदे शाहू छत्रपती यांचा प्रयत्न बहुजन समाजातील स्त्रियांना उन्नतीचा समतेचा मार्ग दाखवण्याचा होता. न्यायमूर्ती रानडे, आगरकर गोपाळकृष्ण गोखले, लोकहितवादी,बहरामजी मलबारी, कर्वे यासारख्या अनेकांच्या प्रयत्नांनी समाजातील उच्चवर्णीय मध्यमवर्गीय स्त्रियांच्या उत्कर्षाच्या वाटा खुल्या झाल्या. स्त्री शिक्षण व सहशिक्षणाचा आग्रह, संमती वयाची कल्पना, विधवा विवाह, केशवपन निषेध बालविवाहास विरोध इत्यादीचा पुरस्कार करीत या सुधारकांनी पतदर्शक कार्य केले या कार्यात पुरुष समाजसुधारक आग्रहणे असले तरी पंडिता रमाबाई रमाबाई रानडे इत्यादी उच्च शिक्षित स्त्रियांचे भरीव योगदान राहिले स्त्रियांच्या प्रत्यक्ष सहभागामुळे शारदा सदन, आर्य महिला समाज, सेवा सदन, लेडीज होम क्लास, हिंद सेविका संघ, याद्वारे स्त्री शिक्षणाच्या व स्त्री उन्नतीच्या कार्याला संस्थात्मक रूप प्राप्त झाले त्यामुळे स्त्री शिक्षण प्रसारासाठी महाराष्ट्र अग्रेसर राहिला भारतातून शिक्षणाकरता परदेशी जाणाऱ्या महिला स्त्री आनंदीबाई जोशी पंडिता रमाबाई या महाराष्ट्राच्या कन्या होत्या युरोपातील मानवतावादी उदरवादी वैचारिक प्रेरणा या सर्वांच्या होत्या.

स्त्रियांनी ज्याप्रमाणे गांधीजींच्या विधायक कार्याला वाहून घेतले त्याप्रमाणे अनेक क्रांतिकारी आणि डावी पुरोगामी चळवळ कामगार चळवळ दलित चळवळ विद्यार्थी चळवळ राष्ट्र सेवा दल या माध्यमातूनही अनेक कार्यकर्त्या महाराष्ट्रात तयार झाले मुंबई प्रांतात स्त्रियांना मताधिकार मिळावा म्हणून १९१८ ते १९२३ या काळात स्त्री मताधिकार्याची चळवळ झाली. त्यातही अनेक स्त्रियांचा सहभाग होता रमाबाई रानडे चळवळीच्या प्रमुख आधारस्तंभ होत्या स्वातंत्र्याच्या चळवळीत उच्च वर्गातील स्त्रिया अग्रेसर राहिले असले तरी कनिष्ठ जातीतील स्त्रियांचा व्यापक सहभाग होता विशेषतः प्रतिसरकारची चळवळ दलित उद्धाराची चळवळ यात तळागाळातल्या स्त्रिया सामील झाल्याने क्रांतीचे लोण महाराष्ट्रात पसरवले लिंगभाव आधारित

स्त्रियांचे स्वतंत्र चळवळीतील एक व्यापक आंदोलनाचा भाग होता. आणि प्रेरित होऊन त्या लढ्यात सहभागी झाल्या होत्या स्वतंत्र चळवळीपेक्षा विभक्त अशी स्त्री चळवळ तोपर्यंत विस्तारली नव्हती स्त्रीमुक्तीचा सर्वांगीण विचार या चळवळीच्या केंद्रस्थानी कधीही नव्हता लिंगभाव  आधारित स्त्री शोषण पुरुषप्रधान समाज यामध्ये स्त्री पुरुष समता कशी नाकारली जाते त्याचे शोषण कसं होतं यासंबंधीची दिशा स्त्री संघटनांनी केलेल्या जनजागृती अजिबात नव्हती असे असले तरी स्वतंत्रपूर्व काळात स्त्रियांचा माणूस म्हणून जगण्याच्या हक्काला आदी मान्यता मिळाली स्त्री आत्मभान व समाजभान प्राप्त झाले स्त्री पुरुष समता आणि स्त्रियांचे व्यक्ती स्वतंत्र या मूल्याचे बीजारोपण या कालावधीमध्ये झाल्याचे दिसून येते.

**संविधानिक कायदेशीर तरतुदी**

भारतात स्वतंत्र पूर्व स्त्रियांच्या मुक्तीसाठी झालेल्या प्रयत्नमुळे स्त्रिया बाबत बरेच सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते म्हणून घटनेद्वारे लिंगभाव समानतेचे तत्व स्वीकारून सर्व प्रकारची स्त्री-पुरुष लिंगभाव आधारित विषमता कालबाह्य ठरविण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क व राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे या भागात स्त्री-पुरुष समानतेबाबत महत्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत संविधान मध्ये सर्व मूलभूत हक्क हे स्त्री-पुरुष दोहोमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभावा शिवाय निर्माण करण्यात आले आहेत यामध्ये नागरिक किंवा व्यक्ती असा उल्लेख जेव्हा येतो तेव्हा सर्व व्यक्तींना कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण असेल असे नमूद केले आहे अनुच्छेद १५(एक) नुसार राज्य धर्म वंश जात लिंग जन्मस्थान यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही अनुच्छेद तीन मध्ये राज्यात स्त्रिया आणि बालकांसाठी विशेष तरतुदी करता येतील अनुच्छेद १६ (एक) मध्ये राज्याच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक सेवांमध्ये समान संधी असेल अनुच्छेद १६ (दोन) नुसार याबाबत सेवा योजना पदनियुक्ती नोकरीमध्ये धर्म वंश जात लिंग जन्मस्थान वास्तव यापैकी कोणत्याही कारणा आधारे व्यक्तीमध्ये भेदभाव केला जाणार नाही व तिला अपात्र ठरविले जाणार नाही अनुच्छेद १९ ते २२ मधील स्वातंत्र्याचा अधिकार सर्व स्त्री-पुरुषांना देण्यात आलेला आहे भाषण स्वातंत्र्य व्यक्तिस्वातंत्र्य शांततेने व विना शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य संघटना बनवण्याचे स्वातंत्र्य भारताच्या कुठल्याही क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच पिळवणुकी विरुद्धचा हक्क २३ आणि २४ धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क २५ ते २८ सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क २९ ते ३३ संविधानिक उपाययोजनाचा हक्क ३२ हे सर्व हक्क स्त्री व पुरुषांना देण्यात आलेले आहेत याबरोबरच राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ही स्त्री व पुरुष समानतेविषयी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत अनुच्छेद ३९ (ए) मध्ये स्त्री व पुरुष नागरिकांना उपजीविकेचे पुरेसे साधन प्राप्त करण्याचा हक्क असावा (डी) मध्ये स्त्री पुरुष दोघांना समान कामासाठी समान वेतन मिळावे. (ई) मध्ये कामगार पुरुष स्त्रिया यांचे आरोग्य आणि क्षमता तसेच बालकाचे नाजूक वय याचा गैरवापर प्रतिबंध करणे आणि आर्थिक गरजे पोटी नागरिकांना आपले वय व क्षमतेस विपरीत काम करण्याची सक्ती केली जाणार नाही अनुच्छेद ४२ मध्ये कामगारांना कामाच्या ठिकाणी न्याय आणि मानवी वातावरणाची हमी द्यावी तसेच स्त्रियांना मातृत्व प्रसुती विषयक सहाय्य मिळवून देण्यासाठी तरतूद करावी अशा तरतुदी मार्गदर्शक तत्त्वात करण्यात आलेल्या आहेत अनुच्छेद ५१ (अ) मध्ये समाविष्ट करण्यात

आलेल्या मूलभूत कर्तव्यातील पाचव्या कर्तव्यात धर्म भाषा प्रदेश वर्ग मध्ये भेदभाव विसरून भारतीय जनतेत एकोपा व बंधुभाव वाढीस लावणे स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणं अशा माध्यमातून संविधानिक पातळीवरती त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी अनेक कायदेही करण्यात आलेले आहेत. यामध्ये स्त्रिया विषयीचे महत्त्वपूर्ण कायदे लिंगभाव आधारित स्त्री शोषण होऊ नये यासाठी यासाठी विशेष विवाह १९५४, हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू दत्तक निर्वाह कायदा १९५६, अनैतिक देह व्यापार प्रतिबंध कायदा १९५६, विवाहित स्त्रीयांचा संपत्तीचा कायदा १९५९, प्रसुती सुधारणा कायदा १९६१, मातृत्व लाभासंबंधीचा कायदा १९६१ समान वेतन कायदा १९७६ कुटुंब न्यायालय कायदा १९८४ वेश्या वृत्ती निवारण कायदा१९८६, हुंडा निषेध कायदा १९८६, मुस्लिम स्त्री घटस्फोट संरक्षण कायदा १९८६, मानसिक आरोग्य कायदा १९८७, राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०, मानवी हक्क संरक्षण कायदा १९९६, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा २००५, महाराष्ट्र देविदासी प्रतिबंध व निर्मूलन कायदा २००५, बालन्याय मुलांची काळजी व संरक्षण सुधारित विधी नियम २००६, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण २०१२, कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ प्रतिबंध कायदा विधीनियम २०१३, या कायद्याबरोबरच शासनाकडून अनेक योजनाही अमलात आणल्या आहेत दरवर्षी अनेक नवीन योजना अमलात आणल्या जातात संविधानिक उपाययोजना जरी झाल्या असल्या तरी स्त्री-पुरुष लिंगभाव आधारित स्त्री दुय्यमत्व मोठ्या प्रमाणात होताना दिसतं लिंगभाव समानता निर्माण केली पण त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत केवळ राजकीय समानता प्रस्थापित करून भागणार नाही तर सामाजिक व आर्थिक समानता प्रस्थापित करावी लागेल असा इशारा दिला होता हा इशारा स्त्री-पुरुष यांच्यातील लिंगभाव आधारित विषमतेलाही लागू होतो त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते स्वातंत्र्य समता बंधुतेवर आधारित लोकशाहीचा स्वीकार भारताने केला. पण ती मूल्ये समाजात खऱ्या अर्थाने रुजली का हा प्रश्न आहे. येथील महिलांचे शोषण अनेक पातळीवरती होताना दिसून येते. पितृसत्ता जातीय व्यवस्था धर्म या सर्व व्यवस्था विविध मार्गाने लिंगभावाच्या माध्यमातून स्त्री शोषण करताना दिसून येतात, यामध्ये मागासवर्गीय महिलांचे शोषण मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसते. लिंगभाव समानता प्रस्थापित होण्यात मोठा अडथळा असलेली पितृसत्ता जोपासली गेली आहे स्त्रीने पुरुषाच्या इच्छेनुसार वागले पाहिजे असा सामाजिक सुर निघताना दिसतो व्यवस्था पुरुषप्रधान जातीप्रधान व धर्मदिष्टीत असून ती स्त्री पुरुष विषमतेला पोषक ठरत आहे.

**सत्ता राजकारण आणि लिंगभाव**

लोकशाहीत धोरण निश्चित करणाऱ्या संस्थांमध्ये व निर्णय घेणाऱ्या संस्थांमध्ये समाजातील सर्व घटकांना समूहांना वर्गांना जातींना स्थान मिळणे लोकशाही पोषक असते पण भारतामध्ये मात्र एकूण लोकसंख्येच्या ४८.२% असणारे स्त्रिया या प्रक्रियेपासून वंचित राहिल्या आहेत लिंगभावाच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकात स्त्री मतदारांचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात वाढले असले तरी स्त्री पुरुष मतदाराच्या संख्येत आठ ते ११ टक्के इतकी तफावत नेहमीच राहिलेली आहे बिहार उत्तर प्रदेश राजस्थान राज्यामध्ये स्त्री मतदारांचे प्रमाण इतर राज्यातील स्त्री मतदाराच्या तुलनेत कमी आहे याच राज्यात स्त्रियांचे

साक्षरतेचे प्रमाण कमी आहे आणि मुलींच्या बालमृत्यूचे प्रमाणही जास्त आहे भारतीय स्त्रियांचा मतदार म्हणून सहभाग चांगला असला तरी स्त्रिया स्वतंत्र विचार करून मतदान करताना आढळत नाहीत बहुतेक वेळा त्यांच्यावर कुटुंबप्रमुख पुरुषांचाच प्रभाव पडल्याचं आढळून येतं त्यांच्या जोडीला जात धर्म वर्ण यांचाही प्रभाव पडतोच सर्वसाधारणपणे उमेदवार राजकीय पक्ष कार्यकर्ते आणि अभ्यासक यांचे स्त्री मतदाराबद्दलचे मत व विशद केल्याप्रमाणेच असते आणि ते बहुतांश खरी असते निदान आतापर्यंत तरी तसा प्रवाह दिसतो परंतु अलीकडेच झालेल्या एका पाहणीनुसार स्त्रिया स्वतंत्रपणे मतदान करतात असे आढळून आले आहे १९९६ सालच्या लोकसभा निवडणूक घेतलेल्या पहिल्या पाहणीनुसार एकूण स्त्री मतदारांपैकी ६५ टक्के स्त्री मतदार मतदान करण्यापूर्वी कोणाचाही सल्ला घेत नाहीत अथवा चर्चा करत नाहीत स्त्री आणि पुरुष या दोघांवर परस्पर प्रभाव हा असतोच उरलेले पाच पस्तीस टक्के मतदान करण्यापूर्वी कोणाचा ना कोणाचा सल्ला घेतात त्यापैकी १७% स्त्रिया आपल्या पतीचा ११ टक्के स्त्रिया कुटुंबास तर सात टक्के स्त्रिया इतरांचा सल्ला घेतात म्हणजेच सर्वसामान्य स्त्रिया अधिक स्वतंत्रपणे निर्णय घेतात हे अलीकडेच वास्तव्य आहे राजकारणात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी काम करणाऱ्या 'शक्ती' या स्वयंसेवी संस्थेने केलेल्या सर्व्हेनुसार जवळपास ८२ टक्के लोकांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त महिला निवडून याव्यात असं वाटतं. नेता या मोबाईल ॲपव्दारे हा सर्व्हे केला होता ज्यात १०लाखाहून अधिक मतदारांनी आपला प्रतिसाद नोंदवला.

**भारतीय स्त्रियांची वर्तमान स्थिती**

भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्याची सुरुवात आकडेवारीपासूनच करायला हवी. स्त्रियांच्या हलाखीच्या परिस्थितीचे दारुण वास्तव पाहताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे 'गरीब बिचाऱ्या स्त्रियांची समस्या' एवढेच या स्थितीचे रूप नाही. स्त्रीप्रश्न एकूण भारतीय समाजाच्या संरचनेचा प्रश्न आहे. आणि तो वेगळा काढून केवळ कल्याणकारी योजनांच्या किंवा सुधारणांच्या साह्याने दुरुस्त होण्यासारखा नाही. खरे तर, भारतात स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा कमी आहे किंवा त्या असंघटित क्षेत्रात काबाडकष्टाचे काम करतात हे दाखविण्यामागे आपला एक विशिष्ट हेतू आहे. तो असा की स्त्री पुरुष लिंगभावत्मक विषमतेचे तत्व आपल्या जीवनाच्या सर्व अंगात भिनले आहे आणि निर्माण होणाऱ्या कोणत्याही सामाजिक प्रश्नामध्ये या विषमतेचे प्रतिबिंब दिसते हे दाखवून देणे. ज्या समाजरचना जातीय वर्गीय, स्त्री-पुरुष विषयक विषमतेवर उभारलेल्या असतात त्यातील रोजगार, आरोग्य, राजकीय सहभाग, कुटुंब, रचना, धर्म, जमातवाद आणि हिंसाचार आदिबाबतींत त्यांचे प्रतिबिंब आणि विशिष्टता दिसत असतात. म्हणून ह्या सर्व चर्चेतून आपण यालिंगभाव विषमता असणाऱ्या समाजात पुरुषाचे वर्चस्व आणि स्त्रीचे दुय्यमत्व यांना भौतिक पायाच्या आधाराने आणि सांस्कृतिक प्रथा परंपरांच्या प्रभावाखाली कशी अधिमान्यता (legitimacy) मिळते हे पाहण्याचा प्रयत्न करीत आहोत.

**स्त्रियांचा राजकारणातील सहभाग**

राजकीय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे संख्या जशी वाढते आहे तशीच मतदान करणाऱ्या स्त्रियांची संख्याही वाढते आहे. परंतु राजकारणात कृतिशील असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण मात्र घटते आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्त्रियांना मतदानाची किंवा निवडणुकीच्या प्रक्रियेत भाग घेण्याची संधी मिळावी असे वातावरण होते; परंतु आता दृश्य असे दिसते की राजकीय पक्ष काम करणाऱ्या स्त्रियांना संधी न मिळाल्याने पक्षांवर नाराज असतात. महाराष्ट्रात अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, प्रमिला दंडवते अशी काही थोडी नावे स्वातंत्र्य चळवळीच्या वातावरणातून वर आलेली दिसतात. त्यांना पाठिंबा देणारे, त्यांचे काम उचलून धरणारे नव्या पिढीतील स्त्री नेतृत्व मात्र दिसत नाही. सत्ताधारी पक्षात तर स्त्रिया फक्त संख्येच्या रूपात उपस्थित दिसतात. १९८९-९० च्या महाराष्ट्र राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत २८८ जागा ६,२६८ पुरुष उमेदवारांनी लढविल्या तर स्त्री उमेदवार फक्त १४८ होत्या आणि त्यातल्या फक्त ५ निवडल्या गेल्या. १९८९ सालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये असाच साचा दिसतो. ४८ जागांसाठी ५७३ पुरुष उमेदवार आणि २० स्त्री उमेदवार लढले. शेवटी फक्त दोन स्त्रिया लोकसभेपर्यंत पोहोचल्या.१७ वी लोकसभा निवडणूक वेगळी ठरली; कारण गतवर्षीच्या तुलनेत विजयी महिला उमेदवारांची संख्या मोठी आहे. देशभरात ५४३ जागांपैकी एकूण ८२ जागांवर  महिला उमेदवार निवडून आल्या आहेत. आतापर्यंतचा निवडणुकीच्या निकालातील हा सर्वांत मोठा आकडा आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत विजेत्या महिलांची संख्या ६१ इतकी होती, तर २००९ मधील १५ व्या लोकसभा निवडणुकीत ती केवळ ५८ होती. महाराष्ट्रापेक्षा वेगळे चित्र संपूर्ण देशात दिसत नाही. १९५७ पासूनचा आढावा घेतला तर असे दिसते की तेव्हा एकही स्त्री कॅबीनेट दर्जाची मंत्री नव्हती आणि एकही स्त्री राज्यमंत्रीही नव्हती. ३ स्त्रिया उपमंत्रीपदावर होत्या. १९६२ मध्ये ह्यात वाढ होऊन कॅबीनेट दर्जाच्या २ मंत्री स्त्रिया होत्या, ५ उपमंत्री होत्या आणि २ राज्यमंत्री होत्या. १९६७ पासून ह्या संख्येत घट दिसते. १९८५ मध्ये एक कॅबीनेट दर्जाची स्त्री-मंत्री आणि ४ राज्यमंत्री आहेत, उपमंत्रीपदावर एकही स्त्री नाही. बरेचसे पक्ष स्त्री उमेदवारांना उभे करण्यास नाराज असतात. महाराष्ट्र विधानसभेच्या २०१९ च्या २८८ जागेसाठी एकूण २३५ महिला उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरल्या होत्या. त्यापैकी २४ महिला आमदारांचा विजय झाला आहे. २४ पैकी सर्वाधिक म्हणजे १२ महिला आमदार भाजपच्या आहेत. तर काँग्रेसच्या पाच आमदार निवडून आल्या आहेत. शिवसेनेच्या दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन महिला आमदार विधानसभेत दिसतात. याशिवाय दोन अपक्ष महिला आमदारही विधानसभेत आपापल्या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत आहेत. २८८ जागांच्या महाराष्ट्र विधानसभेत ३३ टक्के आरक्षणाचा विचार केल्यास ९५ महिला आमदार असणं अपेक्षित आहे.  २०१४ च्या निवडणुकीत फक्त २० महिला आमदार निवडून आल्या होत्या. त्यामुळे २०१४ च्या तुलनेत यंदा त्यात चार महिला आमदारांची भर पडली असून हा आकडा २४ वर पोहोचला आहे.

लिंगभाव विषमतेतून राजकीय प्रक्रियेमध्ये स्त्रियांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी विपरीत असते. त्यांना स्त्रिया म्हणजे एखादे ओझे असेच वाटते. स्त्रियांपाशी आर्थिक बळ, अनुभव काहीच नसते असे त्यांचे मत असते. कुटुंबाचा किंवा मोठ्या पुढाऱ्याचा पाठिंबा नसेल तर स्त्रियांना राजकारणात स्थान मिळविणे अशक्य

असते. राजकीय पक्षांना स्त्री उमेदवार म्हणजे जोखीम वाटते कारण राजकारणात यांनी भाग घेण्यासाठी द्यावा लागणारा वेळ किंवा इतर क्षमता त्या स्त्रियांपाशी कमी असतात; राजकारण गुंतागुंतीचे आणि गलिच्छ आणि म्हणून स्त्रीयांच्या दृष्टीने अयोग्य असते असेच समज सर्वत्र दिसतात. राजकीय पक्षांना समाजातील, कुटुंबातील पुरुषप्रधानता खटकत नाही. स्त्रियांच्या जीवनाचे श्रेय गृहिणी आणि माता या भूमिकांशी निगडीत असते ह्याबद्दलही त्यांना काही आक्षेपार्ह वाटत नाही. एखाद्या स्त्रीने ह्या सर्व बंधनांवर मात करून राजकारणात प्रवेश मिळविला तर मग तिच्यावर चारित्र्यहननाचे शस्त्र उगारले जाते. तिला मग आपल्या खाजगी आयुष्याचे पंचनामे मांडावे लागतात. अशा तऱ्हेने सार्वजनिक जीवनात एकदा बदनामी झाली की निवडणुकीच्या प्रक्रियेत ती स्त्री आपोआपच मागे पडत जाते.

विधानसभा, विधानपरिषदा किंवा संसदेत काम करणाऱ्या स्त्रिया आर्थिकदृष्ट्या संपन्न कुटुंबातून किंवा राजघराण्यातून आणि उच्च हिंदू कुटुंबातून आलेल्या असतात. दलित चळवळीतून दलित जातीतील पुरुषांचे नेतृत्व निर्माण झाले; परंतु या स्तरातील स्त्रिया राजकारणाच्या चौकटीत आतापर्यंत येऊ शकलेल्या दिसत नाहीत. ग्रामीण भागातील स्त्रियांना तर प्रचंड दहशतीला तोंड द्यावे लागते. लोकसभा, विधानसभा, जिल्हापरिषद, पंचायत समिती ह्यामध्ये राजकारण घडविले जाते त्याप्रमाणेच कल्याणकारी योजना राबविणाऱ्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांमार्फतही राजकारण केले जाते. अशा सामाजिक सांस्कृतिक संस्थांच्या कार्याकडे पाहिले तर त्यातही स्त्रीयांचे नेतृत्व एका विशिष्ट चौकटीत का होईना पण घडले असे म्हणावे लागेल. अशी अनेक नावे घेता येतील. प्रतिभा पाटील, प्रेमलाबाई चव्हाण, प्रभा राव, शालिनी पाटील अशी काँग्रेस पक्षाच्या चौकटीत तयार झालेली स्त्री नेतृत्वाची यादीच करता येईल. लिंगभाव विषमता विरोधी स्त्रीवादी राजकारण करण्याचा प्रयत्न  शारदा साठे, नीलम गोऱ्हे, ह्या पश्चिम महाराष्ट्रातील स्त्रीया यांबरोबरच माया वानखेडे, सरोज काशीकर, चंद्रकला भार्गव, शैला लोहिया, मंगल खिंवसरा, निशा शिवूरकर, रजिया पटेल असे खंबीर नेतृत्व निर्माण झालेले दिसतात. काहीजणी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेत असतीलही परंतु ह्यातील प्रत्येकीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे आणि ते सोडविताना स्त्रीप्रश्ना कडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माण केली आहे.

राजकारणामध्ये 'खाजगी' आणि 'सार्वजनिक' जी फारकत केली जाते त्यावर बोट ठेवून 'जे जे खाजगी ते ते राजकीय' अशी घोषणा दिली. घरात बायकोला होणारी मारहाण, तिला टाकणे किंवा वारसा हक्काची अंमलबजावनी न होणे ह्या प्रश्नांसाठी संघर्ष उभे करणे हेही राजकारणच आहे असा त्यांनी दावा केला. तसेच आताच्या राजकारणाच्या प्रक्रियेत इतकी लिंगभाव पुरुषप्रधानता आहे की चार दोन स्त्रियांना त्यात स्थान मिळाले तर उलट बहुसंख्य स्त्रियांचे दुय्यमत्व पक्के होईल असे काही स्त्री संघटनांना वाटते. राजकारणाचीसुद्धा पर्यायी रीत उभी करणे आवश्यक आहे असा त्यांचा दावा आहे. महिलांना राजकारणात ३३ टक्के आरक्षण आहे. स्त्रिया सुरुवातीला पुरुष नेत्यांचे आदेश मानतील परंतु हळूहळू त्यांना बाईपणाच्या अवमूल्यनाची जाणीव होईल आणि त्या लढाऊ बनतील. स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे प्रश्न सोडविण्यासाठी खरेतर ५०% राखीव जागा दिल्या गेल्या पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे.महाराष्ट्रात स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के राखीव जागा दिल्या गेल्या पुढे सातत्याने  मागणी केल्यामुळे महाराष्ट्रात महिलांना स्थानिक स्वराज्य

संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागली आणि २०१२ साली तसा निर्णय घेण्यात आला. आज घडीला देशातल्या २२ राज्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. महराष्ट्रात ही आता ते ५० टक्के लागू करण्यात आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणासाठी कायदा केला आहे. जरी 'महिलांचे प्रॉक्सी प्रतिनिधित्व' बाबत सुरुवातीच्या काळात चिंता होती, परंतु कालांतराने महिला प्रतिनिधी त्यांच्या राजकीय अधिकारांबद्दल अधिक जागरूक झाल्या आहेत आणि शासनाच्या अनुभवांशी परिचित झाल्या आहेत, ज्यामुळे त्यांना भारतातील तळागाळातील राजकीय निर्णय घेण्याचे खरे प्रतिनिधी बनले आहे. स्वतंत्र भारतात ४३ वर्षानंतर, स्त्रियांची सर्व क्षेत्रात झालेली पीछेहाट पाहून ही तरतूद केली गेली. अजून स्त्रियांच्या ह्या सहभागाचे परिणाम अभ्यास ने गरजेचे नसले तरी निवडून आलेल्या स्त्रियांना योग्य प्रशिक्षण मिळावे ह्यासाठी नेटाने प्रयत्न शेतकरी संघटनेसारख्या चळवळीतून वर आलेल्या स्त्रिया जेव्हा निवडून येतात तेव्हा आपल्याला स्त्रियांच्या प्रतिनिधीत्वाचा प्रभावही समजतो. परंतु अशी चळवळीची पार्श्वभूमी नसलेल्या स्त्रिया मात्र राजकारणाच्या समुद्रात ढकलल्या गेल्या तर त्यातून फारसे काही साधेल असे दिसत नाही. उलट लिंगभाव पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेत आणि जातीवर्गाच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या पारंपारिक कल्पनेत वाढलेल्या स्त्रिया दलित, आदिवासी अशा भिन्न जाती वर्ग संस्कृतीतील लोकांच्या, विशेषतः स्त्रियांच्या विरोधात उभ्या राहतील की काय अशी शंका वाटते. सामाजिक, राजकीय परिस्थितीची सखोल जाणीव आणि सर्व स्त्रियांच्यात दर्जाबद्दल अथवा प्रतिष्ठेबद्दल आस्था असे स्त्री-पुरुष निर्माण झाले तर मग स्त्रियांसाठी राखीव जागांची गरज उरणार नाही.

**स्त्रियांची लिंगभावात्मक राजकीय उपेक्षा**

लिंगभाव समानता निर्माण झाली आहे का; घटनेच्या अंमलबजावणीनंतर ७० वर्षाच्या काळात आपण किती प्रमाणात लिंगभाव समानता निर्माण करू शकलो याचा आढावा घेणे गरजेचे आहे. यातून वास्तव परिस्थितीचा आकलन होईल लिंगभाव समानतेच्या तत्त्वामुळे महिलांना पुरुषाच्या बरोबरीने विविध क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्या विविध क्षेत्रात सक्षमपणे कार्य करताना दिसत आहेत. या ७० वर्षाच्या काळात ज्या ज्या क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळाली त्या क्षेत्रात त्यांनी महत्वपूर्ण कामगिरी केल्याचे दिसते. समाजकार्यापासून ते माहिती तंत्रज्ञान आणि अंतरिक्षेत्रापर्यंत सर्वच क्षेत्रात महिला दिसत आहेत हे प्रगतीचे लक्षण निश्चितच आहे सन १९५१ मध्ये लिंगभाव समानता बाबत महिलांची परिस्थिती चिंताजनक होती. महिलांचे साक्षरतेचे प्रमाण केवळ ८.८६% होते लोकसभेतील स्त्रियांचा सहभाग केवळ ४.४% होता सन १९६२ मध्ये पुरुष मतदान प्रमाण ६३.३.% तर महिला मतदार प्रमाण ४६.६.होते. दोन्हीतील फरक १६.७% होता आता या परिस्थितीत बरीच प्रगती झाली असून सन २००१ च्या जनगणनेनुसार महिलांचे साक्षरतेचे प्रमाण केवळ ६५एवढे वाढले आहे लोकसभेतील प्रतिनिधित्व वाढ होऊन २०१४ मध्ये ११.२ % एवढा तर २०१९ मध्ये २७% एवढी वाढ झाली आहे तर मतदानाचे प्रमाण २०१४ च्या निवडणुकीत ६५.५% म्हणजे जवळपास पुरुषाबरोबर आले आहे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्त्रियांसाठी ५०% आरक्षणाची तरतूद केल्यामुळे ते निम्मे प्रतिनिधित्व स्त्रिया करत आहेत महिलांचे श्रमातील भागीदारीचे प्रमाण वाढत असून सन २०१७ -१८ च्या अहवालानुसार शहरी भागातील महिलांचे हे प्रमाण ५२.१ % म्हणजे

पुरुषापेक्षा ४५.७% जास्त झाले आहे यावरून महिलांचा देशाच्या विकासातील सहभाग आणि योगदान दिसून येतं

वरील परिस्थिती जरी आशादायक दिसत असली तरी काही बाबतीत मात्र गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे संख्येने जवळपास निम्मे असणाऱ्या महिलांचे राजकीय सहभागाचे प्रमाण त्याच प्रमाणात असणे गरजेचे आहे. पण लोकसभेतील प्रतिनिधित्वाचे प्रमाण २०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकापर्यंत केवळ ११.२% होते २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते २७% पर्यंत गेले आहे. घटक राज्यातील चित्रे यापेक्षा फार वेगळे नाही. सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जे राजकीय पक्ष भाग घेतात ते सर्व पुरुष वर्चस्व असलेले आहेत पितृसत्ताक संस्कृतीने प्रेरित आहेत त्यामुळे या पक्षाद्वारे महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी स्वतंत्र आरक्षणाची गरज होती पण ३३% आरक्षणाचे विधेयक अजून मंजूर होऊ शकले नाही. महिलांचे प्रश्न घेऊन निवडणुका लढविणारा एकही राजकीय पक्ष नाही त्यामुळे महिलांचे प्रश्न दुर्लक्षित केले जातात प्रत्येक राज्यातील निवडणुका आधी आणि त्या नंतर घोषणा केल्या जातात ज्या पंचायतराज निवडणुकीत महिला मोठ्या संख्येने निवडून आल्या होत्या तेथे राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या वार्षिकी आकडेवारीनुसार असे दिसून आले की निवडणुका नंतर महिला वरील गुन्ह्यांची संख्या २६ टक्क्यांनी वाढली बलात्कार प्रकरणात ११% तर अपहरण १२ टक्क्यांनी वाढले स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊनही त्यांच्यावरील होत असलेल्या अत्याचार हा कमी न होता वाढताना दिसत आहे. लिंगभाव समानता प्रस्थापित होण्यासाठी स्त्रियांना सामाजिक आर्थिक राजकीय सांस्कृतिक शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रात निर्भयपणे स्वाभिमानाने प्रतिष्ठेने सन्मानाने सहभाग मिळणे अपेक्षित होतं लिंगभाव समानतेची संस्कृती निर्माण होणे आवश्यक होतं पण तसं न झाल्याने महिलांना दुय्यम समजून त्यांच्यावर अन्याय अत्याचार केले जातात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या २०१९ च्या लैंगिक असमानता निर्देशांक अहवालानुसार १२९ देशाच्या सूचीमध्ये भारताचा ९५ वा क्रमांक असून घाना, रवांडा, भूतान या देशापेक्षाही भारताची वाईट स्थिती आहे. जागतिकीकरणाच्या आगमनाने काही प्रगतीचे नव क्षेत्र उपलब्ध झाले असले तरी महिलांची सुरक्षितता व त्यांच्यावर होणारे अत्याचाराचे प्रमाण यात वाढ झालेली दिसते. भारतात महिलावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण व स्वरूप मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते.

## ४.३ सारांश:

लिंगभावभेद नष्ट करून स्त्री पुरुष समानता साध्य होण्यासाठी समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन अभिप्रेत आहे. कोणत्याही व्यवस्थेत भाषा आणि साहित्याच्या माध्यमातून सर्वप्रथम परिवर्तन होते. त्यासाठी भाषा आणि साहित्यातील पारंपरिक स्त्रीविरोधी मांडणी नाकारणे आवश्यक आहे. संस्कृतीतील लिंगभावात्मक नीतितत्त्वे आणि धर्म ग्रंथातील स्त्रीविषयक भूमिकेची चिकित्सा करून नव्याने वैचारिक मांडणी केली पाहिजे. परंपरागत समाजाच्या अनिष्ट प्रथा मोडीत काढणे गरजेचे आहे. आधुनिक काळात स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्य आणि कायदेशीर हक्कामुळे सर्व क्षेत्रांत त्यांचा वावर वाढलेला आहे. मात्र, धर्मवाद, कर्मकांड, बुवाबाजी यांच्या माध्यमातून पुरुषप्रधान लिंगभावभेद व्यवस्था कायमस्वरूपी स्थिर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यास योग्य मार्गाने शह देण्याऐवजी स्त्रीमुक्ती चळवळी पुरुषाविषयी गैरसमज, असहयोग, पुरुषद्वेष,

कुटुंबव्यवस्था व विवाहसंस्थेला विरोध,पुरुषी वर्चस्वास मोडून टाकण्यासाठी अतिरेकी भूमिकांचा स्वीकार केला जात आहे. स्त्री स्वातंत्र्याऐवजी स्वैराचारास प्राधान्य देत आहेत. त्यातून नवीन समस्या जन्माला येतात. त्यामुळे स्त्री स्वातंत्र्य होण्याऐवजी अधिक असुरक्षित होण्याची शक्यता जास्त दिसते. ही भूमिका वैचारिकदृष्ट्या गोंधळ निर्माण करणारी आहे. ही भूमिका बदलून स्त्री प्रश्नाबद्दल सहानुभूती असलेल्या पुरुषाचे सहकार्य घेऊन ही चळवळ यशस्वी करता येईल, याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

अद्यापही अनेक देशात स्त्रियांना किमान प्राथमिक हक्कसुद्धा बहाल केलेले नाहीत. जातीय दंगली, युद्धे, दुष्काळ, स्थलांतर इत्यादी काळात सर्वात जास्त स्त्रियांलाच अन्याय अत्याचाराला सामोरे जावे लागते. अनेक देशांत अजूनही लिंगभावाआधारित पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्यामुळे साधे साधे हक्कही स्त्रियांना दिले जात नाहीत. उदा. सौदी अरेबियामध्ये वाहन चालविण्याचा अधिकारसुद्धा स्त्रियांना नाही. या उदाहरणावरून स्त्रियांची परिस्थिती समजण्यासारखी आहे. जगातील अनेक देशांत स्त्रियांना कायदेशीर संरक्षण दिलेले असले तरी अनेक स्त्रिया कायद्याचा वापर करत नाहीत. एखाद्या स्त्रीने त्याविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला तर दहशतीच्या मार्गाने त्या स्त्रीला नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. मलाला नावाच्या मुलीने पाकिस्तानात मुलीच्या शिक्षणासाठी तालिबानच्या धमकीकडे दुर्लक्ष केल्यामुळे तालिबानी दहशतवाद्यांनी तिच्यावर गोळ्या झाडल्या. अशी अनेक उदाहरणे सांगता येतात. महिलांच्या हक्काप्रती आजही असंवेदनशील वृत्ती समाजात दिसून येते. जोपर्यंत समाजात स्त्रियांकडे पाहण्याच्या वृत्तीत सकारात्मक बदल झाल्याशिवाय लिंगभाव विषमता नष्ट होऊ शकत नाही. स्त्रियांमध्ये जाणीव जागृती निर्माण झाल्यास किंवा राजकीय सत्तेत स्त्रियांना समान भागीदारी मिळाल्यास स्त्रीयांचे भवितव्य उज्ज्वल होऊ शकते. स्त्रीचळवळी समोर दारिद्र्य, अज्ञान, गुलामगिरी, स्त्री भ्रूणहत्या, मातृत्व नाकारण्याची वृत्ती, स्त्रियांची कमी होत जाणारी लोकसंख्या, लैंगिक शोषण व कुमारी माता हे भीषण प्रश्न आहेत; म्हणून पुरुषवर्गाचा तिरस्कार हा चळवळीचा आधार न ठेवता पुरुषी सहयोगातून ही चळवळ यशस्वी करणे काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या युगात स्त्री चळवळीला गती येत आहे. स्त्री-पुरुष समानतेवर नागरी व्यवस्थेची प्रस्थापना केल्याशिवाय मानवी जातीला उज्ज्वल भवितव्य नाही.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१) लिंग : स्त्रीयत्व आणि पुरुषत्व यांच्या गुणवैशिष्ट्यांना लिंग म्हणतात.

२) लिंगभाव : सामाजिक, सांस्कृतिक यामध्ये भूमिका, गुण, वर्तनप्रकार व जबाबदाऱ्या इ. स्त्रियोचत आणि पुरुषोचित अशी विभागणी करतो त्यास लिंगभाव म्हणतात.

३) पुरुषसत्ताक : पुरुषप्रधानता, कुटुंबामध्ये चालणारी पित्याची सत्ता अशा शाब्दीक अर्थ सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या कार्यरत असणारी संरचना यामध्ये स्त्रियांना दुय्यम पुरुषसत्ता व्यवस्थेमध्ये दिले जाते.

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न:

१) लिंगभाव म्हणजे काय

२) स्त्री जन्मला येत नाही तर ती घडवली जाते असे कोणी म्हटले जाते

३) केट मिलेट यांनी लिंगभाव संदर्भात कोणते पुस्तक लिहिले आहे

४) हिंदू विवाह कायदा कोणत्या वर्षी करण्यात आला

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे:

१) लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक असतो. तो भूमिका, गुण, वर्तनप्रकार व जबाबदाऱ्या इत्यादींची स्त्रियोचित आणि पुरुषोचित अशी विभागणी करतो त्यास लिंगभाव म्हणतात.

२) सिमॉन द बूव्हा

३) लैंगिकतेचे राजकारण

४) १९५५

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय:

१) लिंगभावाचा अर्थ सांगून लिंगभावाचे स्वरूप स्पष्ट करा.

२) लिंगभावासंदर्भात वैशिष्टाची वेगवेगवेगळ्या स्त्रीविचारवंताच्या भूमिकांची सविस्तरपणे चर्चा करा.

३) भारतातील लिंगभाव चळवळची वाटचाल स्पष्ट करा.

४) लिंगभाव विषमता आणि राजकारण स्पष्ट करा.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ:


१) पाटील महेंद्र २०१८ 'विसाव्या शतकातील राजकीय विचारप्रवाह' डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

२) पाटील भारती २०१४, स्त्रीया समाज आणि राजकारण हर्मिस प्रकाशन पुणे

३) भसीन कमला अनु. तांबे श्रुती २०१०, लिंगभाव समजून घेताना लोकवाङ्मय गृह मुंबई

४) भागवत विदुत २०१६ 'सकालीन भारतीय समाज' डायमंड पब्लिकेशन्स पुणे.

५) सुमंत यशवंत २०१२ स्त्रीवादाचे ओळख मराठी वाचन मालिका : क्र.६ पुणे

६) पवार वैशाली २०१२ महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख डायमंड पब्लिकेशन्स पुणे.


❑❑❑